
मुस्लीम सत्यशोधक पत्रिका

वर्ष : ६, अंक : ४
एप्रिल-मे-जून २०२०



मुस्लीम सत्यशोधक मंडळ

अभिष्टचिंतन



महाराष्ट्रातील ज्येष्ठ सत्यशोधक कार्यकर्ते, कामगार वर्गाचे नेते आणि परिवर्तनवादी चळवळीचे मित्र **डॉ. बाबा आढाव** यांनी १ जून रोजी वयाची नव्वदी पार केली. डॉ. बाबा आढाव हे मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेपासून मंडळाचे दोस्त आणि मार्गदर्शक राहिले आहेत. आजही बाबांची तब्येत उत्तम आहे. आम्हा कार्यकर्त्यांचे ते ऊर्जास्थान आहेत. बाबांचे महाराष्ट्राच्या समाज प्रबोधनातील, सत्यशोधक चळवळीतील आणि तळागाळातील गटांच्या कल्याणाचे कार्य सर्वपरिचित आहे. बाबा आणि शीलाताईंना मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या हार्दिक शुभेच्छा !



मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या आरंभकाळातील कार्यकर्ते माजी सचिव **मा. अब्दुल कादर मुकादम** यांनी १४ जून रोजी नव्वद वर्षे पूर्ण केली. 'दास्तान', 'चंद्रकोरीच्या छायेखाली', 'इस्लाम : ज्ञात आणि अज्ञात' ह्या मुस्लीम समाज चिंतनातील महत्त्वाच्या पुस्तकांचे लेखन त्यांनी केले आहे. प्रसार माध्यमांतून उदारमतवादी भूमिका घेऊन मांडणी करीत असतात. मा. अ. का. मुकादम यांना आरोग्यदायी दीर्घायुष्य लाभो ही शुभेच्छा !



मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे सुरुवातीपासूनचे साथी ज्येष्ठ समाजवादी नेते आणि परिवर्तनवादी चळवळीतील मार्गदर्शक कार्यकर्ते **मा. पन्नालाल सुराणा** यांनी ९ जुलै रोजी अठ्ठ्याऐंशी वर्षेपूर्ण केली. भाऊ, आजही विविध राज्यांत प्रवास करतात. समाजहिताच्या विविध राजकीय-सामाजिक-आर्थिक विषयांवर लेखन करतात. नव्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देतात. भाऊंचे विविध आंदोलनातील योगदान सर्वपरिचित आहे. मुस्लीम प्रश्नावरसुद्धा भाऊंनी लेखन-अनुवाद कार्य केले आहे. भाऊंना आम्हा कार्यकर्त्यांकडून हार्दिक शुभेच्छा !

खाजगी वितरणासाठी

मुस्लीम सत्यशोधक पत्रिका

वर्ष : ६ **एप्रिल-मे-जून २०२०** **अंक : ४**

स्वागतमूल्य : रु. ४०/-

पत्रव्यवहाराचा पत्ता : सी/८/२३ स्टेट बँक नगर, पंचवटी, पाषाण, पुणे ४११००८.

भ्रमणध्वनी : ९८२२६७९३९१ Email : tambolimm@rediffmail.com

वार्षिक वर्गणी : रुपये २००/- **पंचवार्षिक वर्गणी : रुपये १,०००/-**

आजीव सदस्यत्व : रुपये ३,०००/-

मुस्लीम समाजाचे प्रबोधन करणाऱ्या मुस्लीम सत्यशोधक मंडळाने ५१ व्या वर्षात पदार्पण केले आहे. मंडळासाठी आपली देणगी व मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचे वर्गणीदार होण्यासाठी, जाहिरात देण्यासाठी बँक खाते तपशील पुढीलप्रमाणे -

मुस्लीम सत्यशोधक मंडळ
कॅनरा बँक, भवानी पेठ, पुणे ४२.
बचत खाते क्र.: 0361101081297
IFSC Code : CNRB0000361

मुस्लीम सत्यशोधक पत्रिका
बँक ऑफ इंडिया, शिवाजीनगर, पुणे ५.
बचत खाते क्र.: 051710100004342
IFSC Code : BKID0000517

अंतरंग....

संपादकीय......

मुस्लीम सत्यशोधक मंडळाने २२ मार्च रोजी पन्नास वर्षे पूर्ण करून एक्कावन्नाव्या वर्षांत पदार्पण केले. मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्यात आयोजित केलेले पुरस्कार वितरण, परिसंवाद आणि प्रकाशन हे रद्द करावे लागले. यानिमित्ताने मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचा सुवर्णमहोत्सवी विशेषांक निर्माण झाला. वैयक्तिक संपर्कातील आणि प्रत्यक्ष भेट झालेल्या वाचक-वर्गणीदारांना ते पोहोचले; मात्र टपाल खाते अद्याप पूर्ववत् नसल्याने अनेक वर्गणीदारांना हा विशेषांक पाठवता आला नाही. या संदर्भात निर्माण झालेली अडचण आपण समजून घ्याल अशी अपेक्षा.

मित्रांनो, कोव्हिड १९ विषाणूने जगात धुमाकूळ घातला. लाखोंच्या संख्येने लोक बळी गेले. भारतातही कोरोनाचा प्रादुर्भाव वाढला आणि अद्यापही हे आटोक्यात आलेले नाही. हातावर पोट असणारे मजूर, असंघटित कामगार, स्थलांतरित अशांना मोठी किंमत मोजावी लागली. अनेकांना भाकरीविना जीव गमवावा लागला. आता तर कोरोना ग्रामीण भागात पोहोचला आहे. वित्त आणि मनुष्यहानी मोठ्या प्रमाणात झाली. अनेकांनी आत्महत्या केल्या. अनेकांचे मानसिक आरोग्य धोक्यात आले. अनेकांनी धार्मिक द्वेष-धृवीकरण वाढवण्याचे प्रयत्न केले. राजकीय नेते आणि पक्षांनी श्रेय घेण्याचे- सत्तातंरांचे प्रयत्न केले. अनेक ठिकाणी भ्रष्टाचार झाल्याचे सांगण्यात येते. भारतासह जगाला कोरोनाच्या सावटाखाली अजून किती दिवस- किती महिने राहावे लागेल हे भाकीत करता येत नाही. अद्याप त्यावर औषध किंवा प्रतिबंधात्मक लस उपलब्ध नाही. एकूणच अनिश्चितता, भीती आणि अस्थैर्य जनजीवन विस्कळीत करीत आहे.

या काळात शासन, आरोग्य विभाग, पोलिस, पत्रकार यांनी मोलाची भूमिका केली. या योद्ध्यांनासुद्धा प्राण गमवावे लागले.

आरंभीच्या काळात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या स्वागतासाठी हजारो परदेशातील प्रशासकीय-राजकीय नेते, पत्रकार आले. भारतातही या

निमित्ताने स्वागत सोहळे झाले. मध्य प्रदेशात सत्तांतर झाले. अनेक आश्रमांत, शिबिरांत लोक अडकले. राजकीय लोकांनी लग्नसोहळ्यास उपस्थिती लावली तसेच तबलिग जमातच्या 'इस्तेमा'साठी दिल्लीतील निजामुद्दीन 'मरकज'मध्ये स्थानिक आणि परदेशातील तबलिगी आले. मिडियाने याचा पुरेपूर उपयोग केला. 'कोरोना जिहाद', 'हिरवा कोरोना' म्हणून मुस्लिमांना संबोधण्यात आले. बनावट व्हिडिओ, कथानक तयार करून मुस्लीम द्वेष वाढवणाऱ्यांनी या परिस्थितीचा लाभ घेतला. तबलिगींचेही काही प्रमाणात चुकले. गडबडीत का होईना त्यांच्याकडून चुका झाल्या. तबलिग जमात प्रमुख अमीर मौलाना साद यांनी देशातील जनतेची माफी मागावी, अशी भूमिका मंडळाने घेतली. या काळात तर ते लपूनच बसले होते. केंद्र शासन आणि दिल्ली सरकार सुद्धा याला जबाबदार आहेच. नंतरच्या काळात जे तबलिगी कोरोना रुग्ण होऊन बरे झाले, ते आपला 'प्लाझ्मा' देण्यास पुढे आले. मौलाना साद यांनी तसे आवाहन केले. या भूमिकेचे मंडळाने स्वागत केले. अनेक मुस्लीम संघटना, कार्यकर्ते पुढे आले आणि स्वयंसेवक म्हणून धान्यवाटप, अत्यावश्यक मदतकार्य, आणि भिन्न धर्मियांच्या अंत्यविधीच्या कार्यात योगदान दिले. कोरोना विषाणूने जगातील मानवाला एका मंचावर आणले. अनेकांनी जात-धर्म-देश-लिंग या पलीकडे जाऊन एकमेकांना आधार दिला. लॉकडाऊनमुळे वातावरण स्वच्छ झाले. प्रदूषण कमी झाले या काही सकारात्मक बाजू आहेतच.

लॉकडाऊन काळात रमजान महिना, आंबेडकर जयंती, बौद्ध पौर्णिमा, रामनवमी आणि इतर धार्मिक सण-सोहळे होते. सर्वधर्मियांनी या काळात संयम, शिस्त बाळगून प्रशासनाला पाठिंबा दिला. जनजीवन विस्कळीत होणार नाही याची काळजी घेतली. आता बकरी ईद, गणेशोत्सव आहे. या काळात पुन्हा संयम बाळगून शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे, हे स्वत:साठी आणि नागरी कर्तव्य म्हणून पार पडले पाहिजे.

भारतात नागरिकत्व कायदा, राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी प्रक्रिया (सीएए-एनआरसी) संदर्भात केंद्र शासन आग्रही होते. यानिमित्ताने वाद-प्रतिवाद वाढले होते. धार्मिक दंगली वाढतील असे वातावरण तयार झाले होते. आंदोलक लोकशाही मार्गाने आंदोलन करीत होते. त्यांना लोकसहभाग आणि पाठिंबा मिळत होता. या काळात दिल्लीत दंगल झाली. सामान्यांची घरे जळाली, माणसं मेली, विषारी वक्तव्ये करणारे आणि दंगल घडवणारे गुन्हेगार बाजूला राहिले. गुन्हे मात्र आंदोलनकर्त्यांवर नोंदवण्यात येत आहेत. हे लोकशाही, अभिव्यक्ती

स्वातंत्र्य असणाऱ्या देशाला शोभण्यासारखे नक्कीच नाही.

'शाहीनबाग आंदोलन' देशातील विविध राज्यांत पोहचले. त्यांना पाठिंबा देणारे आंदोलने उभी राहिली. सर्वधर्मीय लोकांचा यात सहभाग असला तरी शाहीनबाग आंदोलनात असलेला मुस्लीम महिलांचा सहभाग लक्षणीय आणि प्रशंसनीय होता. बुरखा घातलेल्या, न घातलेल्या मुस्लीम महिला व तरुणींनी राष्ट्रगीत, 'हम होंगे कामयाब', 'हमे चाहिए आझादी' म्हणत संविधान आणि तिरंगा हातात घेऊन दिलेला प्रदीर्घ लढा भारताच्या आणि मानवमुक्तीच्या इतिहासात नक्कीच नोंदवला जाईल; पण प्रश्न इथं संपत नाही. या आंदोलनाचे पुढे होणार काय ? हा प्रश्न शिल्लक राहतोच. या महिलांच्या मागण्यांकडे शासन लक्ष देणार का ? कोरोनामुळे विसावलेला लढा पुन्हा नव्या ताकदीने सक्रीय होईल; पण ती वेळ शासनाने येऊ देऊ नये असे आम्हाला वाटते. इतर संघटनांबरोबर मुस्लीम सत्यशोधक मंडळाने या लढ्यात सहभाग घेतला आणि सी. ए. ए. - एन. आर. सी.ला विरोध केला आहे, हे पुन्हा नोंदवत आहोत.

भारतीय सैनिक सीमाभागात डोळ्यात तेल घालून देशाचं रक्षण करीत आहेत. पाकिस्तानने काढलेल्या कुरापती आणि त्यात झालेले शहीद याची जाणीव आहेच; परंतु अलीकडे चीन आक्रमक होऊन भूभागावर आक्रमण करून कुरापती काढत आहे. यातही सैनिक शहीद झाले. मंडळ या सैनिकांच्या कुटुंबियांसोबत सहसंवेदना व्यक्त करीत शहिदांना श्रद्धांजली वाहत आहे. कोरोना काळात देशांतर्गत सुरक्षा राखणाऱ्या पोलिसांना शहीद व्हावे लागले. त्यांना आणि या काळात जीव गमावलेल्या सर्वांना आम्ही श्रद्धांजली वाहत आहोत. आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करताना गांधी-नेहरू-वाजपेयी यांनी घालून दिलेली परंपरा या काळातही महत्त्वाची आहे. त्याच मार्गाने आम्ही पुढे गेल्यास सर्वांचे कल्याण होईल असे वाटते.

आज देशासमोर जसे कोरोनाचे संकट आहे, देशांर्तगत अनेक सामाजिक, आर्थिक, धार्मिक अंगाने निर्माण झालेले प्रश्न आहेत. नेपाळसह अनेक छोट्या-मोठ्या देशांनी आव्हाने उभे केले आहे. या काळात देशातील बुद्धिजीवी वर्गाने, अभ्यासकांनी आणि प्रसारमाध्यमांनी देशाला आणि देशातील जनतेला योग्य दिशेने घेऊन जाण्यासाठी भूमिका बजावली पाहिजे. जागतिक पातळीवरील विस्तारवाद, वांशिक आणि धार्मिक पक्षपात, धार्मिक वर्चस्व या गोष्टी कोरोना काळात स्पष्ट झाल्या. या काळातील विषमतावादी

घटनासुद्धा पटलावर आल्या. अमेरिकेतील कृष्णवर्णीय लोकांना दुजाभाव करण्यात आला. कुपोषित अशा कृष्णवर्णीय वर्गाची संख्या मृत्यूमुखी पडणाऱ्यांत जास्त आहे. चीनमध्येसुद्धा उगूर मुस्लीम या मुस्लीम समाजाला लक्ष करण्यात येत आहे. अप्रगत, कट्टरता आणि लोकसंख्या वाढीच्या नावाखाली छळ करण्यात येत असल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमातून आल्या आहेत. तुर्कस्थानमध्ये कमाल पाशाच्या निमित्ताने धर्मनिरपेक्षता, उदारमतवाद निर्माण झाला होता. आता प्रतिगामी शक्ती सत्तेवर आल्यापासून चक्र उलट्या दिशेने फिरवले जात आहे. इस्तंबूलमधील हागिया-सोफिया अर्थात आया सोफिया या सहाव्या शतकातील चर्चचे न्यायालयीन निर्णयामुळे अध्यक्ष रिसेप तय्यीप एर्देगन यांनी मशिदीत रूपांतर केले आहे. काही काळ ही वास्तू संग्रहालय म्हणून वापरात होती. युरोपमधील काही देशांत मशिदीचे चर्चमध्ये रूपांतर करण्यात आले. या प्रकारच्या धार्मिक वर्चस्ववादाचे परिणाम जागतिक पातळीवर उमटण्याची आणि नवे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

आपणा सर्वांना या अस्थैर्याच्या काळात सामना करण्याचे मनोबळ लाभावे ही सदिच्छा !

■ ■

मुस्लीम समाजाच्या जुन्या धार्मिक, परंपरागत मनोवृत्तीला धक्के द्यावे लागतील, आघात करावे लागतील आणि हे सर्व परंपरागततेचा त्याग केलेल्या मुसलमानांनीच केले पाहिजे. आपल्या खऱ्या अथवा काल्पनिक गाऱ्हाण्यांचा बागुलबुवा उभा न करता, बहुजन समाजाच्या इच्छा-आकांक्षांशी समरस होण्याची प्रवृत्ती मुसलमान समाजात निर्माण होणे आवश्यक आहे. हिंदू समाजाच्या मनात असलेला अविश्वास कृतीने नष्ट केल्याने आणि त्यांचा विश्वास संपादन करूनच मुसलमानांना स्वतःचे रास्त स्थान प्राप्त करून घेता येईल. त्याचबरोबर सारा मुसलमान समाज हा १९४७च्या मनोभूमिकेत वावरत असल्याचे गृहीत धरण्याचा मूर्खपणा करूनही आपण त्यांच्या मनोवृत्तीत बदल घडवून आणू शकणार नाही. आज त्या समाजातही विचारमंथन सुरू झाले आहे. नेटकी, अचूक दिशा दाखवण्याचे सततचे प्रयत्न त्या समाजातील काही माणसे जिद्दीने करीत आहेत, त्यांची दखल घेऊन बहुजन समाजाने त्यांना पाठिंबा दर्शविला पाहिजे. अखेर सर्वांबद्दल अविश्वास दर्शविल्याने आपण काहीच साध्य करू शकणार नाही.

– हमीद दलवाई

अंकविशेष

नरहर कुरुंदकरांचे विचारविश्व

• विनोद शिरसाठ

१९३२ ते ८२ असे जेमतेम ५० वर्षांचे आयुष्य लाभलेल्या नरहर कुरुंदकर यांच्या ८८ व्या जयंतीनिमित्त, आजपासून पाच वर्षांपूर्वी (१५ जुलै २०१५ रोजी) नांदेड येथील कुरुंदकर प्रतिष्ठानमध्ये त्यांच्या स्मृतीनिमित्त केलेले हे भाषण आहे. या भाषणाचे हे शब्दांकन.

कार्यक्रमाचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, आदरणीय सदाशिवराव पाटील, शामलताई पत्की आणि मित्रहो...

नांदेडला यापूर्वी दोन वेळा येण्याचा योग आला होता आणि दोन्ही वेळा मी येऊ शकलो नाही, त्याबद्दल सुरवातीलाच दिलगिरी व्यक्त करतो. 'निवडक नरहर कुरुंदकर' या संचाचं काम चालू आहे आणि त्याचं मी संपादन करतो आहे. त्यातला पहिला खंड 'व्यक्तिवेध' या नावाने ऑक्टोबर २०१३ मध्ये इथे गिरीश कुबेर यांच्या हस्ते प्रकाशित करायचं ठरलं होतं; पण आपणा सर्वांना माहीत आहे की, त्याच्या एकच महिना अगोदर डॉ. नरेंद्र दाभोलकरांची हत्या झाली होती. इथे कार्यक्रम ठरला होता, त्याच दिवशी सातारा नगरपालिकेने डॉ. दाभोलकर स्मृती : पाहिले व्याख्यान ठरवले होते, मला तिकडे जावं लागणं साहजिक होतं. त्यानंतर गेल्या वर्षी पीपल्स कॉलेजमध्ये कार्यक्रम ठरला होता; पण त्याच्या आदल्या दिवशी इथे ज्येष्ठ पत्रकार सुधाकर डोईफोडे यांचं निधन झालं. मग तो कार्यक्रम पुढे ढकलावा लागला आणि माझं वेळेचं गणित पुन्हा एकदा कोलमडलं. त्यामुळे दोन्ही वेळा मी येऊ शकलो नाही. या दोन्ही वेळा येऊ न शकण्याचा माझ्या मनात थोडासा अपराधी भाव होता. त्यामुळे विश्वास कुरुंदकरांनी मला जेव्हा विचारलं की, 'यावेळी १५ जुलैला बाबांचा ८३ वा जन्मदिवस आहे, तर येणार का?' तेव्हा माझ्या मनामध्ये प्रचंड मोठा संकोच असूनही, मी नाही म्हणू शकत नव्हतो.

माझ्या मनात संकोच का आहे, याची कारणं तुमच्यापैकी बहुतेक लोक समजू शकतील. एकतर नांदेडमध्ये यायचं आणि कुरुंदकरांच्याविषयी बोलायचं हे फार अवघड आहे. कुरुंदकर जाऊन आता ३३ वर्षं एवढा कालखंड लोटला

आहे. त्यांच्या हयातीमध्ये किमान २०-२५ वर्षं तरी लोक त्यांना ऐकत होते. म्हणजे जवळपास ५० वर्षं नांदेडकरांच्या दृष्टीने जो माणूस आपला आयकॉन होता (अजूनही आहे) त्याच्या संदर्भात, आणि त्याच लोकांच्या समोर जाऊन बोलायचं ही खरोखरच कुणालाही अवघड वाटण्यासारखी गोष्ट आहे. माझ्यासमोर आज एल. एस. देशपांडे (ज्यांनी इंग्रजी आणि मराठीतून कुरुंदकरांवर पुस्तक लिहिलेलं आहे) बसलेले आहेत आणि तुम्ही सर्वांनी अनेक मोठ्या लोकांची भाषणं ऐकली आहेत, कुरुंदकरांचं लेखन वाचलेलं आहे. त्यामुळे मी तुमच्यासमोर नवीन काय सांगणार असा माझ्या मनातला प्रश्न होता.

पण विश्वास कुरुंदकरांचे व माझेही मित्र अभय दातार आणि अन्य काही लोकांनी 'नरहर कुरुंदकर यांचं विचारविश्व' असा म्हटलं तर फार सोपा विषय समोर केला. त्यामुळे मी पटकन होकार दिला. मात्र भाषणाच्या दृष्टीने या विषयाचा विचार करायला लागलो, तेव्हा माझ्या मनात एक विचार प्रकर्षाने आला. तो असा की, कुरुंदकर हा खरं तर समजून देण्याचा किंवा समजावून सांगण्याचा विषय नाही; कुरुंदकर हा वाचायला देण्याचा विषय आहे ! म्हणजे कुरुंदकरांचा ग्रेटनेस जर समजावून सांगायचा असेल तर त्यांचा कोणताही एखादा छोटासा लेख किंवा एखाद्या लेखातले काही परिच्छेद समोरच्याला वाचायला द्यायचे. ज्याला थोडंसं सोशिओ-पोलिटिकल अंडरस्टँडिंग आहे अशा कोणाही माणसाकडे, त्यांच्या लेखनातील काही उतारे दिले तर पुढचं काम आपल्याला करावं लागत नाही, असा माझा गेल्या दहा-बारा वर्षांतला अनुभव आहे.

एक गोष्ट मला हीपण जाणवली की, कोणत्याही काळातील तरुण वर्गाला काही लेखकांचं विशेष आकर्षण असतं. उदाहरणार्थ, कुमार वयातील मुलांना साने गुरुजी पटकन भावतात, किशोर वयातील मुलांना वि. स. खांडेकर विशेष भावतात. अगदी तसेच, राजकीय - सामाजिक विषयांबाबत कुतूहल निर्माण व्हायला लागलेल्या तरुणांच्या मनात कुरुंदकरांविषयी आकर्षण निर्माण होतं. गेल्या दहा-बारा वर्षांतला माझा अनुभव तसा आहे. आणि मागच्या पिढीतल्या काही लोकांशी मी बोललो, तर त्यापैकी बहुतेकांचं मत हेच होतं की, कुरुंदकर तरुण मनावर गारूड करतात म्हणजे ते प्रत्येक नव्या पिढीपर्यंत पोहचतात.

कुरुंदकरांच्या विचारविश्वातले जे काही टप्पे किंवा माईलस्टोन्स मला दिसतात त्यांच्याबद्दल मी जरासं सांगेन; पण त्याच्या आधी मला माझ्या काही मर्यादा सांगितल्या पाहिजेत. पहिली मर्यादा अशी की, कुरुंदकर गेले तेव्हा माझं वय जेमतेम पाच-सहा वर्षांचं होतं. त्यामुळे त्यावेळचा माहौल, ते भारावून जाणं

यापैकी काहीही मला माहीत असणं शक्य नाही. दुसरं म्हणजे, कुरुंदकरांच्या दोन मुख्य ओळखी सांगितल्या जातात. लेखक आणि वक्ता या दोन ओळखी आहेतच; पण त्यांच्या अभ्यासाचे आणि लिहिण्याचे जे विषय आहेत, त्यानुसार दोन ओळखी सांगितल्या जातात. पाहिली ओळख साहित्य व संस्कृतीचे अभ्यासक आणि दुसरी ओळख राजकारण व समाजकारण यांचे अभ्यासक. अर्थातच या दोन्हींमध्ये अनेक विभाग - उपविभाग येऊन जातात. माझी अडचण अशी की, कुरुंदकरांनी ज्या साहित्यकृतींबद्दल लिहिलेलं आहे, त्यांतल्या फारच कमी साहित्यकृती मी वाचलेल्या असल्यामुळे त्याबद्दल मला काही बोलता येणार नाही. शिवाय, साहित्यातल्या किंवा वाङ्मयातल्या लोकांनी त्याबद्दल बोलणं अधिक योग्य ठरेल.

मला थोडासा अधिकार आहे, तो त्यांच्या राजकीय व सामाजिक विषयांवरील लेखनाबाबत बोलण्याचा. तोच माझ्या विशेष अभ्यासाचा व आकलनाचा प्रांत राहिला आहे. शिवाय, साधना साप्ताहिकात मी मागील दहा-बारा वर्षं लेखन व संपादन या स्वरूपाचं काम केल्यामुळे; कुरुंदकर ज्या महनीय लोकांच्या बरोबर राहिले, वाढले त्यांच्यापैकी अनेकांशी चर्चा करण्याची संधी मिळाली. या सगळ्या प्रक्रियेतून माझ्या मनावर कुरुंदकरांच्या संदर्भात खोलवर ठसलेली पहिली गोष्ट ही आहे की, ते सॉक्रेटिस परंपरेतले होते. 'व्यक्तिवेध' या पुस्तकाला जी छोटेखानी प्रस्तावना मी लिहिली, तिच्यामध्ये हा मुद्दा अधोरेखित केला आहे. वापरून वापरून गुळगुळीत झालेले शब्द थोर माणसांना लावले तर त्यात फार काही नवीन वाटत नाही. म्हणून 'सॉक्रेटिस परंपरा' या शब्दाचा अर्थ त्याच्या सगळ्या आयामांसकट समजून घेतला, तरच कुरुंदकरांचं अनन्यसाधारणत्व आपल्या लक्षात येईल.

लक्षात घ्या, सॉक्रेटिसची परंपरा अडीच ते तीन हजार वर्षांपासून सुरू आहे, असं सांगितलं जातं आणि युरोपातलं सगळं तत्त्वज्ञान 'रिपब्लिक' या ग्रंथाच्या फुटनोट्स आहेत, इथपर्यंत काही विचारवंत भाष्य करतात. 'रिपब्लिक'मध्ये सॉक्रेटिस आणि प्लेटो व इतर शिष्य यांच्यातले जे काही संवाद आहेत, त्यातून मानवी मनोव्यापारांच्या संदर्भात किंवा मानवी जीवनव्यवहारांच्या संदर्भात इतकं काही मूलभूत मांडलेलं आहे की, आजही जगभरातल्या कोणत्याही तत्त्वज्ञानामध्ये किंवा सामाजिक शास्त्रामध्ये सॉक्रेटिसला वगळून पुढे जाता येत नाही. किंबहुना बऱ्याचदा स्टार्टिंग पॉईंट हा सॉक्रेटिस असतो. तर या सॉक्रेटिसचं स्वतःबद्दल काय मत आहे किंवा लोकांपर्यंत तो कसा पोहोचला आहे ? तो असं म्हणतो की, 'मी रेडिमेड विचार दिलेला नाही, लोकांना विचार व पुनर्विचार करायला प्रवृत्त केलं आहे.'

म्हणजे विचार कसा करावा हे शिकवण्याचा प्रयत्न त्याने केला. आपणा सर्वांना सॉक्रेटिसचं एक प्रसिद्ध विधान माहीत आहे : ‘मी या जगातला सगळ्यात ज्ञानी मनुष्य आहे, याचं कारण आपलं अज्ञान किती सखोल व गहन आहे, याची मला चांगली जाणीव आहे.’

कुरुंदकरांच्या बाबतही असेच आहे. त्यांनी कोणता नवा विचार दिला, हा प्रश्न सहसा कोणी विचारत नाही. आणि स्वतः कुरुंदकरांनीही असं म्हणून ठेवलेलं आहे की, विचार करणं, पुनर्विचार करायला लावणं आणि विचार कसा करावा हे शिकवणं, याच प्रकारचं काम संपूर्ण आयुष्यामध्ये मी केलेलं आहे. त्यांनी तेविसाव्या वर्षी पहिला लेख लिहिला आणि पन्नाशी पूर्ण होण्याच्या आत ते गेले. दरम्यान २५ वर्षांच्या लेखन काळात त्यांच्या नावावर चांगली म्हणावी अशी २५ पुस्तकं आहेत. आणि त्या २५ पुस्तकांमधले विषय पाहिले तर कुणीही थक्क होतं. त्यांचा हा आवाका समजून घेणं हे मोठं आव्हान आहे. एका पीएचडीच्या प्रबंधात तो विषय बसणार नाही. दोन-तीन-चार असे वेगवेगळे घटक करावे लागतील. अनेक प्रबंध लिहावे लागतील...

कुरुंदकरांचं कोणत्याही काळातलं, कोणतंही लिखाण वाचायला घेतलं तर एका पाठोपाठ एक धक्के बसतात. ते थोडे आश्चर्याचे असतात. त्यातला मुख्य भाग असा असतो की, ‘अरे, हे आपल्या इतक्या जवळ होतं आणि तरीही आपल्या लक्षात कसं नाही आलं ? किंवा आपण हे इतकं स्वीकारलेलं होतं की हेच ॲबसोल्युट ट्रुथ आहे असे समजत होतो; पण हे असं नाहीये.’ म्हणजे आपल्या हाताशी असलेली सिम्पल ट्रूथ्स आपल्याला सापडत कशी नाहीत, हा धक्का कुरुंदकरांचं कोणतंही लेखन वाचताना बसतोच. आणखी एक नोंदवावा असा भाग म्हणजे, त्यांच्या लिखाणातली कोणतीही पानं घेतली आणि त्यांच्यावर रँडमली खुणा करत गेलो तरी ती कोटेशन्स म्हणून वापरता येतात. इतकी कोटेशन्स -तुलना करायची झाली तर- वेगळ्या अर्थाने खांडेकरांच्या लिखाणामध्ये येतात; पण खांडेकरांची कोटेशन्स ही अलंकारिक, फ्लॉवरी लँग्वेजमधली, थोडीशी रोमँटिक किंवा भाबडी अशा स्वरूपातली आहेत. कुरुंदकरांच्या लिखाणातली कोटेशन्स मात्र ‘येस, आय गॉट इट - मला काही तरी नव्याने सापडलं’ असा अनुभव देणारी आहेत. म्हणजे काहीतरी गहन सत्य सापडलं का, हा भाग बाजूला ठेवला तरी, मला काहीतरी दिशा सापडली असं कुरुंदकरांच्या सर्व लेखनातून जाणवतंच !

गंमत म्हणजे कुरुंदकरांचं स्वतःचं त्याबद्दलचं आकलन इतकं परिपूर्ण होतं की, सॉक्रेटिसच्या पद्धतीने विचार करणं किंवा तर्कशुद्ध पद्धतीने विचार करणं

याच्या काही मर्यादासुद्धा आहेत, हे त्यांना पुरेपूर माहीत होतं. त्यामुळे त्यांनी असं म्हणून ठेवलं आहे की, इतर कोणाच्या बरोबर स्वर्गात राहण्यापेक्षा सॉक्रेटिसबरोबर नरकात राहणं मी केव्हाही पसंत करेन आणि त्याच्या आधी ते म्हणतात की, सॉक्रेटिस तर्कशुद्ध विचार करत होता, तर्कशुद्ध विचार करायला सांगत होता; पण व्यक्तिगत जीवनात तो प्रत्येक वेळी तर्कशुद्ध पद्धतीने वागत होताच असं नाही. अन्यथा अथेन्सच्या देवतेला तो नवस बोलला नसता. सॉक्रेटिसच्या आयुष्यातल्या अशा विसंगती दाखवून कुरुंदकर पुढे म्हणतात, तरीही मी सॉक्रेटिसबरोबर नरकात राहणं पसंत करेन.

वयाच्या फक्त ३६ व्या वर्षी कुरुंदकरांची स्वतःबद्दलची जाणीवदेखील किती पक्की होती याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे, मे. पुं. रेगे यांनी ‘रूपवेध’ची अतिशय कठोर चिकित्सा केली; सत्यकथेमध्ये परीक्षण लिहिलं, ते बरंचसं गाजलं; तेव्हा त्याचा प्रतिवाद कुरुंदकरांनी (माझ्या माहितीप्रमाणे) नाही केलेला; पण त्याबद्दल एका खासगी पत्रात लिहिलंय. ते पत्र त्यांनी आपले प्रकाशक देशमुख पती-पत्नींना पाठवलं होतं, नंतर ते ‘निवडक पत्रे’ या पुस्तकात समाविष्ट केलेलं आहे. त्यातला एक परिच्छेद ‘व्यक्तिवेध’ या पुस्तकाच्या ब्लर्बवर घेतलेला आहे. तो परिच्छेद इंटरेस्टिंग आहे. त्यात ते म्हणतात, मी ज्या परीक्षणाला भीत होतो, ते हे नाही. तर्कशुद्ध युक्तिवाद करून माझं म्हणणं खोडून काढणं किंवा खंडण करणं, असं झालं असतं तर मला त्याचा आनंद वाटला असता. मला त्याची भीतीही होती आणि मला त्याचं आकर्षणही होतं. तिथेच ते म्हणतात, माझं खरं मरण कशात आहे ? तार्किक पद्धतीने माझं म्हणणं जर कोणी खोडून काढलं तर मी माझी मतं सोडून त्याचं मत स्वीकारायला केव्हाही तयार होईन. तेच माझं खरं मरण आहे आणि त्या मरणाचं मला आकर्षण आहे.

म्हणजे तर्कशुद्ध पद्धतीने विचार करण्याच्या मर्यादा कुरुंदकरांना पुरेपूर माहीत होत्या; पण जसं आपण लोकशाहीबद्दल म्हणतो की, ‘सर्व मर्यादा लक्षात घेऊनही कमीत कमी दोष असणारी शासनप्रणाली कोणती, तर लोकशाही !’ अगदी तसंच विवेचनाची, विश्लेषणाची, चिकित्सेची (सगळ्या मर्यादा लक्षात घेऊनही) सर्वोत्तम पद्धत म्हणजे तार्किक पद्धतीने विचार करणं. तर्कशुद्ध पद्धतीने विचार करण्याची सवय कुरुंदकरांना कशी लागली असावी, हाही एक मोठा गहन प्रश्न आहे. कारण त्यांचं सगळं विवेचन, विश्लेषण बघायला गेलं तर असं वाटतं की, केवळ तार्किक पद्धतीने नाही तर त्याच्याही पलीकडे ते जात होते. ‘प्रतिभा’ हा शब्द साहित्यामध्ये वापरला जातो, तशी काहीतरी देणगी (मी ‘दैवी’ म्हणणार

नाही) त्यांना लाभलेली असावी. सुरेश द्वादशीवार यांनी त्यांचं वर्णन 'प्रज्ञावंत' या एका शब्दामध्ये केलेलं आहे, ते मला योग्य वाटतं. कुरुंदकरांनी स्वतः 'माळरानावरील कवडसे' या लेखामध्ये असंही म्हटलं आहे की, मी गणितामध्ये १०० पैकी १०० गुण मिळवणारा विद्यार्थी नव्हतो; पण ९२ ते ९५ टक्के मला मिळत होते. म्हणजे त्यांनीसुद्धा स्वतःमधील तर्कशुद्ध विवेचन, विश्लेषणाचं नातं गणित या विषयाशी जोडलेलं आहे, असं म्हणता येईल का ? त्याच्याबद्दल फार तपशील मला मिळालेले नाहीत, पण तसे संदर्भ मिळाले तर ते जोडून बघायला पाहिजेत.

कुरुंदकरांचं विचारविश्व कसं घडलं याच्याबद्दल संभ्रमात टाकणारं, चकित करणारं लेखन मला अगदी सुरुवातीच्या टप्प्यावरच वाचायला मिळालं. ते होतं मधु कुरुंदकर यांचं 'संगत नरहरची' हे पुस्तक. ते वाचलं मी आणि काही मित्रांनी. त्यावेळेला आम्ही विशी-पंचविशीतले विद्यार्थी होतो. एका मित्राने दुसऱ्या मित्राबद्दल वय वर्ष १० ते २२ या दहा-बारा वर्षांच्या काळाबद्दल खूप बारकाईने, खूप तपशिलाने, कौतुकाने व आपुलकीने लिहिलं आहे. (मराठीमध्ये याप्रकारचं अन्य पुस्तक उपलब्ध नाही). कुमार आणि तारुण्य या दोन्हींच्या सीमारेषेवर असताना नरहरी हा तरुण कसा होता, हे त्यातून कळतं. त्यातले अफलातून किस्से, प्रसंग आणि त्यातल्या गमतीजमती बाजूला ठेवल्या तरी; नरहर कुरुंदकरांचा त्यावेळचा बिनधास्तपणा, बौद्धिक आव्हान पेलण्याची ताकद आणि हिम्मत याबाबतही सखोल संशोधन होणं गरजेचं आहे. अर्थातच, त्याच्याही संदर्भात आपल्याकडे रिसोर्सेसची बरीच वानवा आहे. पण तो त्यांचा सुरुवातीचा मुख्य कालखंड समजून घेता आला तर त्यांचं विचारविश्व कसं घडत गेलं आणि त्याला किती आयाम आहेत, हे आपल्याला जास्त चांगल्या पद्धतीने समजू शकेल.

'कुरुंदकरांचे विचारविश्व' या मुद्याकडे आपण आलो की, उत्तरं मिळत नाहीत तर अनेक प्रश्न निर्माण होतात. दोन-तीन उदाहरणे देतो.

मी बारावीच्या नंतर जी पुस्तकं अगदी सुरुवातीला वाचली त्यामध्ये एक होतं 'श्रीमान योगी'. (त्याच्या आधी 'बुवाबाजी आणि समाज' हा एक धडा आम्हाला अभ्यासक्रमामध्ये होता, तो सोडला तर फार काही त्यांच्याबद्दल मला माहीत नव्हतं.) काही वर्षांनंतर जेव्हा माझे काही मित्र विचारायचे की, आम्हाला 'श्रीमान योगी' वाचाविशी वाटते, काय करावं, कशी वाचावी, की आत्ता नको ? तेव्हा मी त्यांना सांगायचो, तुम्ही 'श्रीमान योगी' वाचू नका. ती आठशे-हजार पानं वाचायची गरज नाही. मात्र त्या कादंबरीला ४० पानी प्रस्तावना आहे, ती तुम्ही

वाचा. ते मित्र मला विचारायचे, कोणाची प्रस्तावना आहे ? तर मी म्हणायचो, मला आठवत नाही, मी बरीच पूर्वी वाचली आहे ती प्रस्तावना. मग एके दिवशी मनात विचार आला, आपण चार-पाच वर्षं इतरांना सांगतो आहोत की, ती तुम्ही प्रस्तावना वाचा, पुस्तक वाचायची गरज नाही. तर बघू कोणाची आहे ? मग बघायला गेलो तर लक्षात आलं, अरे ही तर कुरुंदकरांची प्रस्तावना ! आत्ताही मला अनेक लोक, अगदी तरुण मुलं भेटतात तेव्हा ते म्हणतात, 'श्रीमान योगी' या पुस्तकापेक्षा आम्हाला ती प्रस्तावना अधिक भावली.

मी सर्वप्रथम वाचलेलं कुरुंदकरांचं पुस्तक होतं, 'अभयारण्य'. त्याची अनुक्रमणिका पाहूनच मी थरारून गेलो होतो. (सव्वाशे पानांचे ते पुस्तक 'स्वातंत्र्य' या संकल्पनेशी जोडलेले आहे.) म्हणजे मुख्य अनुक्रम आणि त्यातले सब-टॉपिक्स, अशी ती तीन-चार पानांची अनुक्रमणिका आहे. ती वाचूनच माझ्या लक्षात आलं की, या पुस्तकाला 'अभयारण्य' हे नाव किती व कसं बरोबर आहे ! स्वातंत्र्य या संकल्पनेला किती आयाम असतात, हे आपण वाचतो तेव्हा थक्क होतो. त्या पुस्तकाच्या प्रारंभीच कुरुंदकर असं सांगून जातात की, बरेचसे शब्द आपण अचूक वा सुपरफिशियल पद्धतीने वापरतो, पण त्या शब्दांचा अर्थ आपल्याला कळलेला असतोच असं नाही, त्यांपैकी 'स्वातंत्र्य' हा एक शब्द आहे. 'स्वातंत्र्य म्हणजे काय' हा लेख लिहायला बसल्यानंतर त्यांना 'स्वातंत्र्य' या शब्दाचा अर्थ नेमकेपणाने जाणून घेण्याची गरज वाटली आणि मग त्यांनी ते मांडलं. ते पुस्तक वाचल्यावर मी कमालीचा चकित झालो होतो कारण त्यातून असेही पुढे येत होते की, स्वातंत्र्य, समता, बंधुता, हिंसा, अहिंसा, न्याय हे शब्द आपण बिनचूक पद्धतीने वापरतो खरे; पण त्यांचा अर्थ आपल्याला नेमकेपणाने सांगता येईलच असं नाही, ते शब्द डिफाईन करता येतीलच असं नाही.

२००४-०५ मध्ये कुरुंदकरांच्या लेखनातून सापडलेलं एक छोटंसं सूत्र घेऊन एक लेख मी लिहिला होता. त्याचं शीर्षक, '९८ टक्यांशी कसं लढायचं ?'. तो लेख आता १० वर्षांनंतर मी साधनात रिप्रिंट केला आणि त्याला जी काही दाद मिळाली तेव्हा मी लोकांना सांगत होतो, त्यातलं विवेचन-विश्लेषण माझं असलं तरी, बीज मात्र कुरुंदकरांचं आहे आणि ते जर सापडलं नसतं तर माझं पुढचं विवेचन- विश्लेषण आकार घेऊच शकलं नसतं. त्याची थोडक्यात पार्श्वभूमी सांगतो. कुरुंदकरांनी 'मी आस्तिक का नाही' या शीर्षकाच्या लेखामध्ये असं म्हटलं आहे की, शेकडा ९८ माणसं अशी असतात, जी त्यांना परमेश्वराविषयी नेमकं काय वाटतं हेसुद्धा प्रामाणिकपणे सांगू शकत नाहीत. आणि मग पुढे त्यांचं विवेचन

आणि विश्लेषण येतं. मी त्यावेळी असा साधा विचार केला की, हे ९८ टक्के का म्हणत आहेत ? ९९ टक्के किंवा ९५ टक्के का नाही ? कारण ढोबळमानाने बोलताना आपण दोन मिनिटं, पाच मिनिटं, दहा मिनिटं असं म्हणतो. 'चार मिनिटांत ये किंवा सात मिनिटांत येतो' असं आपण म्हणत नाही. तर मग त्यांनी ९८ टक्के का म्हटलं, असा एक साधा प्रश्न माझ्या मनात आला. पण त्याचं उत्तर त्या लेखात मिळालं नाही. तो प्रश्न बरेच दिवस मनात राहिला. मी नंतर वाचत गेलो आणि एकदा त्यांच्या अन्य लेखनातूनच असा संदर्भ लागला की, 'समाजामध्ये खरी आस्तिक माणसं एक टक्काच असतात.' म्हणजे आपण असं गृहीत धरून चालतो की, नास्तिक माणसं एक टक्का असतात. (विवेचनाच्या सोयीसाठी एक टक्का म्हणू, खरं तर ती एक टक्कासुद्धा नसतात. ती ०.०० समथिंग अशी काहीतरी असतील.) पण आस्तिक माणसंसुद्धा एक टक्काच असतात, हे आपल्या लक्षातच येत नाही. मी जे मघाशी म्हणालो की आपल्या हाताशी असलेली सिम्पल ट्रुथस, साधी सत्यं ते दाखवतात ते हे ! तर कुरुंदकर म्हणतात की, 'ईश्वर' या संकल्पनेबद्दल खरोखर काहीतरी विचार केलेला आहे; आतून, मनापासून काहीतरी भक्तिभाव आहे अशी माणसं ९९ टक्के नाहीत तर फक्त एकच टक्का आहेत. याचाच अर्थ, उरलेल्या ९८ टक्क्यांनी आस्तिक आणि नास्तिक या दोन्हींच्या सीमारेषेवर गर्दी केलेली असते.

मला या एका सूत्रामुळे एक स्वतंत्र विचारविश्वच खुलं झाल्यासारखं वाटलं. नंतर हे सूत्र मी एक्सटेंड करत गेलो आणि मग म्हणू लागलो, या जगामध्ये चांगली माणसं एक टक्का असतात, तशी वाईट माणसंही एक टक्काच असतात; उरलेल्या ९८ टक्क्यांनी चांगल्या-वाईटाच्या सीमारेषेवर गर्दी केलेली असते. त्यागी माणसं समाजामध्ये एक टक्का असतात, पण खऱ्या अर्थाने भोगी माणसंही समाजामध्ये एक टक्काच असतात; उरलेल्या सर्वांनी त्याग आणि भोग या दोहोंच्या सीमारेषेवर गर्दी केलेली असते. खरेखुरे पुरोगामी एक टक्का असतात, पण खरेखुरे प्रतिगामीही एक टक्काच असतात; उरलेल्या सर्वांनी पुरोगामी व प्रतिगामी यांच्या सीमारेषेवर गर्दी केलेली असते. आणि मग असा सारांश काढला की, सत् आणि असत् या जर दोन प्रवृत्ती असतील तर जगामध्ये सत्प्रवृत्त एक टक्का असतात, आणि असत्प्रवृत्तही एक टक्काच असतात.

२००५ साली साधनेत माझी अगदी सुरुवात होती तेव्हा 'थर्ड अँगल' या युवा सदरात तो लेख लिहिला होता. त्यात मी असंही म्हटलं होतं की, हे एक टक्का सत्प्रवृत्त आणि एक टक्का असत्प्रवृत्त या दोहोंमध्ये थेट लढाई झाली तर सत्प्रवृत्तांचा पराभव निश्चित असतो. प्रमाण भाषेत सांगायचं तर, सत्प्रवृत्तांमध्येही

दोन मुख्य गट असतात, एक सुधारक आणि दुसरा क्रांतिकारी. आणि थोड्या अनौपचारिक भाषेत सांगायचं तर, असत्प्रवृत्तांमध्येही ढोबळमानाने दोन गट असतात. एक 'तापल्या तव्यावर पोळी भाजून घेणारे' आणि दुसरा 'टाळूवरचं लोणी खायला तयार असणारे'. तर मुद्दा असा की, सत् आणि असत् या दोहोंची लढाई झाली तर सत्प्रवृत्तांचा दणदणीत पराभव निश्चित असतो; पण दोहोंचाही खरा जय-विजय ठरतो तो ९८ टक्क्यांना कोण किती प्रभावित करतात यावर ! म्हणजे सत्प्रवृत्त लोक जर ९८ टक्क्यांना जास्तीत जास्त अलर्ट करू शकले, त्यांचं प्रबोधन करू शकले तर असत्प्रवृत्तांवर विजय मिळवणं त्यांना सोपं जातं. आणि असत्प्रवृत्तांचं असं असतं की, ते ९८ टक्क्यांना निष्क्रिय जरी ठेवू शकले तरी सत्प्रवृत्तांवर विजय मिळवता येणं त्यांना सोपं जातं.

अलीकडेच गोविंद पानसरे यांची हत्या झाली. त्यानंतर अनेक तरुण मुलं-मुली गटागटाने पुढील काही दिवस भेटायला येत होती. तेव्हा मला जाणवत होतं की, यांना एक प्रकारचं फ्रस्ट्रेशन आलं आहे. त्यांच्या मनात अशी प्रबळ भावना होती की, आपण संख्येने व बळाने फार कमी आहोत; आता आपलं काही खरं नाही; केंद्रात आणि राज्यात प्रतिगामी राजवट आलेली आहे; पुरोगाम्यांना पुढची दहा वर्षं वाव नाही. आपला लढा इतक्या मोठ्या गटाशी आहे, वगैरे. तेव्हा जे छोटेमोठे दहा-बारा ग्रुप मला भेटले, त्यातील मुलं-मुली फार तयारीची नव्हती. पण फार कच्चीदेखील नव्हती. त्यांना मी जेव्हा एक टक्का विरुद्ध एक टक्का आणि सीमारेषेवर ९८ टक्के हे सूत्र सांगायचो, तेव्हा त्यांना आपली सुटका झाल्यासारखं वाटायचं, रिलीफ मिळाल्यासारखं वाटायचं ! म्हणून तोच लेख मी साधनेत रिप्रिंट केला आणि कंसामध्ये टाकलं की, हा लेख १० वर्षांपूर्वी साधनेत प्रकाशित झाला होता. तेव्हा अनेक वाचक चकित झाले होते. त्यातील एकच इंटरेस्टिंग प्रतिक्रिया इथे सांगतो. चिपळूणच्या एका प्राचार्यांचा फोन आला की, मी विज्ञान शाखेचा माणूस आहे, त्यामुळे माझे अन्य वाचन कमी आहे. पण आमचे ग्रंथपाल आज साधनाचा अंक घेऊन आले आणि म्हणाले, 'सर, बाकी काही नका वाचू, पण हा लेख तुम्ही वाचायलाच हवा !' आणि आता या क्षणी (मी फेसरीडिंग मध्ये कच्चा आहे, पण तरीही मला दिसतेय) ९८ टक्के सिद्धांताविषयी मी हे जे काही सांगतोय, ते ऐकताना तुमचे चेहरे अधिक फुलले आहेत.

तर हा मुद्दा मी इतक्या विस्ताराने का सांगितला आहे ? इथे मला हे नोंदवायचे आहे की, आज हा ९८ टक्क्यांचा सिद्धांत माझ्या नावावर असला तरी, त्याचं पेटंट मात्र कुरुंदकर गुरुजींकडे आहे ! असो. सॉक्रेटिसपासून घेतलेला मुद्दा

मी थोडासा एक्सपांड करत गेलो आणि त्याच्या परिघावरचे काही मुद्दे आतापर्यंत मांडले. आता भाषणाच्या उत्तरार्धाकडे वळतो.

'कुरुंदकरांचं विचारविश्व' हा शब्द आपण वापरतो तेव्हा आपल्याला हे लक्षात घ्यायला हवं की, ते स्वतःला मार्क्सवादी आणि समाजवादी म्हणवून घ्यायचे. अगदी नेमकेपणाने सांगायचं तर 'लोकशाही समाजवादी' असं म्हणवून घ्यायचे. पण त्यालाही त्यांनी हळूवार अशी पुस्ती जोडलेली होती की, माझा समाजवाद हा राष्ट्रीय समाजवादापेक्षा निराळा आहे. त्याचं विवेचन, विश्लेषण मला फारसे कळलेलं नाही किंवा मी ते फार पूर्वी वाचलं, आता परत बघितलं तर काहीतरी निश्चितच सापडेल. तर मार्क्सवाद आणि समाजवाद हे दोन्ही शब्द ते स्वतःबद्दल वापरत होते. पण मला असं दिसतं की, कोणत्याही मार्क्सवाद्याला कुरुंदकर आपले वाटलेले नाहीत आणि समाजवाद्यांना कुरुंदकर आपलेच वाटतात, पण संपूर्ण कुरुंदकर समाजवाद्यांना कधी झेपत नाहीत, पचत नाहीत. याचा मी जेव्हा जेव्हा विचार करतो तेव्हा असं लक्षात येतं की, समाजवाद काय किंवा मार्क्सवाद काय अंतिमतः एक चौकट ते स्वतःला घालून घेतात आणि कुरुंदकरांना अशी चौकट मान्य नव्हती. त्याचं कारण पुन्हा एकदा हेच की, ते सॉक्रेटिस परंपरेतून आलेले होते.

कुरुंदकरांच्या बाबतीत आणखी एक आश्चर्य मला असं वाटलं की, अकादमिक स्तरावर म्हणजे साहित्य आणि संस्कृती या क्षेत्रांतील जे कुणी विद्यापीठीय स्तरावरचे अभ्यासक असतात, त्यांच्याकडूनही कुरुंदकरांना फार जास्त रेफर केलं गेलं किंवा वेगळ्या प्रकारची मान्यता दिली गेली असं मला कमी वेळा दिसलं. आणि कुरुंदकरांनी राजकीय व सामाजिक विषयांवर विपुल लेखन केलं, पण राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र यांच्या अभ्यासकांकडूनसुद्धा कुरुंदकरांना रेफर केलं गेलं आहे असं फार कमी वेळा दिसतं. यासंदर्भात मी काही लोकांशी बोललो की, हे असं का होतं ? तर मला असं उत्तर जास्त वेळा मिळालं की, अकादमिक क्षेत्रातील लोकांना कुरुंदकरांविषयी एक प्रकारची असूया वाटते. मला असं वाटतं की, हे फार सोपं उत्तर झालं. दुसरं उत्तर असं मिळतं की, अकादमिक क्षेत्रातील लोक एका चौकटीमध्ये असतात, आणि त्या चौकटीच्या बाहेर ते जाऊ शकत नाहीत, त्यांना तशी इच्छाही नसते. कदाचित ती त्या पदाची-जागेची मागणीही नसते.

तर मुद्दा असा की, कुरुंदकर सतत चौकटी तोडणारे आहेत. ते कोणत्याही एका विद्याशाखेचा अभ्यास व मांडणी त्याच चौकटीत करत नाहीत. ते कोणत्याही विद्याशाखेच्या भिंती तोडून पलीकडे जाऊन अन्य विद्याशाखांना भिडतात. उदा.

‘धार आणि काठ’ हे त्यांचं साहित्य समीक्षेचं पुस्तक वाचलं तर साहित्याचा कप्पेबंद पद्धतीने विचार करणारे लोक त्याने प्रभावित होत नाहीत. रूढार्थाने समीक्षेची टर्मिनॉलॉजी त्यामध्ये दिसत नाही. एवढंच नाही तर, ‘धार आणि काठ’मध्ये प्रत्येक वेळी ते चौकटीच्या बाहेर जाऊन सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा विषयांना भिडतात. पण त्याची दखल साहित्य वर्तुळात घेतली जात नाही. कुरुंदकरांच्या अनेक चाहत्यांना त्याचं दुःख आहे. मला मात्र तसं कधीच वाटलं नाही. उलट, मला ते कुरुंदकरांचं सर्वात मोठं बलस्थान वाटतं. ‘व्यक्तिवेध’मध्ये गिरीश कुबेरांनी जो लेख लिहिला आहे त्यातही त्यांनी असं म्हटलं आहे की, कुरुंदकर वेगवेगळ्या विचारसरणीच्या लोकांना थोडंसं चकित करून जात होते. काहींना ते थोडेसे गोंधळात टाकणारे वाटत होते आणि मला हे त्यांचं फार मोठं यश आहे असं वाटतं. म्हणजे हे केवळ माझं मत नाही, तर मराठीतला आजचा जो एक मोठा संपादक आहे आणि ज्याच्यावर कुरुंदकरांचा मोठा प्रभाव आहे त्याचंही मत असंच आहे.

‘व्यक्तिवेध’मध्ये एकूण चार विभाग केले आहेत. त्यातल्या चौथ्या विभागात चार वेगवेगळ्या पिढ्यांतल्या चार संपादकांचे लेख आहेत. त्यांना कुरुंदकरांनी कसं प्रभावित केलं, त्याची उदाहरणं म्हणून ते चार लेख घेतले आहेत. पहिला अनंत भालेराव - जे कुरुंदकरांना गुरुस्थानी होते. किंबहुना कुरुंदकरांचं पहिलंवहिलं लेखन अनंतरावांच्याच हाताखाली किंवा त्यांच्या बरोबरीने, संगतीने छापायला सुरुवात झाली. नंतरच्या पिढीचे यदुनाथ थत्ते. वयाच्या बाबतीत अनंतराव आणि यदुनाथ यांच्यात फार फरक नसला तरी, यदुनाथ आणि कुरुंदकर यांचं नातं समकालीन म्हणावं असं होतं. त्यानंतरची तिसरी पिढी म्हणजे आज सत्तरीच्या उंबरठ्यावर असलेले सुरेश द्वादशीवार. मी मघाशी उल्लेख केला, ‘प्रज्ञावंत’ हे शीर्षक त्यांनी कुरुंदकरांसाठी वापरलं ते मला विशेष आवडलं होतं. त्यांचा लेखही फारच वेगवेगळे आयाम दाखवणारा आहे. आणि मग चौथे गिरीश कुबेर. त्यांनी ‘आजच्या काळात कुरुंदकरांसारखी माणसं असायला हवीत’, अशा आशयाचं विवेचन लेखाच्या शेवटी-शेवटी केलं आहे आणि त्या लेखाच्या शीर्षकामध्येसुद्धा ते आलेलं आहे.

मी जेव्हा आजच्या काळाच्या संदर्भात विचार करतो -कुरुंदकरांचा म्हणजे अर्थातच त्यांच्या विचारविश्वाचा- तेव्हा असा प्रश्न मनात येतो की, आजपर्यंत ते राहिले असते तर त्यांनी कोणते विषय हाताळले असते ? (वस्तुतः ‘जर-तर’च्या प्रश्नांवर सहमती होणं फार अवघड असतं. प्रत्येकाचं मत वेगवेगळं असू शकतं. त्यामुळे मी जे आता बोलतो आहे, त्याच्याशी अनेक लोक सहमत होतीलच असं

नाही.) लक्षात घ्या, कुरुंदकरांचं सगळं लेखन हे त्यांच्या वयाच्या २५ ते ५० या कालखंडात झालं. ते स्वातंत्र्यानंतरचं पहिलं पाव शतक होतं. त्यामुळे आपली संस्कृती, आपला इतिहास, आपली लोकशाही, नवी राजवट, धर्म व समाजरचनेतील विषमता, विविध प्रकारचे शोषण, तत्त्व/ विचारप्रणाल्या यांच्या भोवतीचं ते सगळं लेखन असणं स्वाभाविक होतं. म्हणजे एका बाजूला पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणं आणि दुसऱ्या बाजूला महाभारत आणि मनुस्मृती यांच्याकडेही जाणं. पण आणखी २५ वर्षं ते हयात असते -आज तर केवळ ८३ वर्षं एवढंच त्यांचं वय असतं- तर त्यांनी कशाकशाचा अभ्यास केला असता ? कशावर त्यांनी लिहिलं असतं ? मी जे त्यांचं लेखन वाचलं आहे आणि थोडाबहुत अभ्यास केला आहे, त्यावरून मला असं वाटतं की, दोन क्षेत्रांना त्यांनी आजच्या काळामध्ये जास्त महत्त्व दिलं असतं.

एक म्हणजे अर्थकारण. कुरुंदकरांच्या लेखनाची एक मर्यादा किंवा न्यून नव्हे, पण त्याच्यात काय कमी आहे किंवा राहून जातं आहे असं शोधलं तर दिसतं असं की, त्यात अर्थकारणाचा विचार तुलनेने कमी आहे. ते स्वतःला 'मार्क्सवादी' म्हणवून घेत होते आणि त्यांची वैचारिक बैठक तयार होत असताना अर्थकारण त्यांनी अभ्यासलेलं असणारच. पण तरीही त्यांच्या एकूण राजकीय आणि सामाजिक लेखनामध्ये अर्थकारणाचा विचार कमी दिसतो, असं काही लोकांप्रमाणेच मलाही वाटतं. अर्थात, ही अपेक्षा आपण कुरुंदकरांकडूनच करतो; इतरांच्याकडून नाही. म्हणजे इतक्या अफाट उंचीचा माणूस, त्याच्याकडून हे डायमेन्शन जरा कमी आलं आहे... मी मागे वळून बघतो तेव्हा असं वाटतं की, १९५० ते ८० या अडीच-तीन दशकांच्या काळात तसंही प्युअर इकॉनॉमिक्सचे लोक सोडले तर अन्य लोक अर्थकारणविषयक वाचन तेवढ्या प्रमाणात करत नसावेत. कदाचित हा फार किचकट विषय आहे, असंही त्यांना वाटत असावं .

आणखी एक कारण हेसुद्धा आहे की, त्या काळात अर्थकारणाच्या संदर्भातली पुस्तकं आजच्याइतकी उपलब्ध नव्हती. प्युअर इकॉनॉमिक्स वाचणं आजही थोडं अवघड आहे; पण पोलिटिकल इकॉनॉमीवरची फारच चांगली पुस्तकं गेल्या वीसेक वर्षांत येत आहेत. मी जेव्हा जेव्हा इकॉनॉमिक्स या विषयातल्या लोकांशी बोललो आहे की, पोलिटिकल इकॉनॉमीवरची पुस्तकं १९५० ते ८० या काळात होती का ? तर बहुतेकांचं म्हणणं आहे की, ती उपलब्ध नव्हती; त्यांचं प्रमाण फारच कमी होतं. पण कुरुंदकरांसारखा माणूस ज्याला बौद्धिक आव्हानं पेलवण्यामध्ये मजा वाटत होती, गंमत येत होती; अशा माणसाने आजच्या काळात

अर्थकारण या विषयावर वाचन केलं असतं, ते समजून घेतलं असतं आणि त्यावर लेखनही केलं असतं. आणि अर्थकारण म्हणत असताना मला 'पोलिटिकल इकॉनॉमी' अपेक्षित आहे. कारण या देशासमोरचा आजचा कळीचा प्रश्न तोच आहे.

तर अर्थकारणाच्या बाबतीतली साक्षरता ही फारच मोठी समस्या आहे. आणि साक्षरता हा शब्द वापरतो तेव्हा मला सर्वसामान्यांमधली नाही तर ओपिनियन मेकर क्लासमधील साक्षरता अभिप्रेत आहे. त्यांच्यामधली अर्थकारणाच्या संदर्भातली साक्षरता अतिशय दयनीय आहे, अशी माझी खंत आहे. ओपिनियन मेकर क्लासमध्ये साहित्यिक, पत्रकार, संपादक, प्राध्यापक, चळवळी - आंदोलनांतले मोठे नेते, राजकीय नेते आणि उद्योगधंद्यातले व व्यापार क्षेत्रांतले लोक येतात. आता मी त्याच्या जास्त खोलात जात नाही. पण इथे मला कुरुंदकरांच्या संदर्भात हे आग्रहाने मांडावंसं वाटतं की, जर कुणालाही कुरुंदकरांच्या विश्लेषक आणि चिकित्सक बुद्धीचा वारसा सांगावा (त्यांना फॉलो करावं) असं वाटत असेल, तर त्यांनी अर्थकारणाच्या क्षेत्रांमधील आव्हानं स्वीकारावीत. भले कुरुंदकरांनी अर्थकारणावर काहीही लिहिलेलं नसलं तरीही !

कुरुंदकर आज असते तर त्यांनी आणखी कोणत्या विषयांना हात घातला असता, असाही विचार मी करतो. तेव्हा असं वाटतं की, जिथे डेड एन्ड दिसतो आहे किंवा जिथे कुलपं लागलेली आहेत, तिथे त्यांनी धडका मारल्या असत्या आणि जी दालनं उघडायची हिंमत कोणी दाखवत नाही, अशी दालनं त्यांनी खुली केली असती. उदाहरणार्थ, गेल्या दोन महिन्यांपासून रावसाहेब कसबे यांनी अक्षरशः बैठक टाकून, घरदार बंद करून एक काम चालू ठेवलं आहे. भालचंद्र नेमाडे यांचे साहित्य आणि त्यांचे देशीवादाचे विचार यांचं उत्खनन ते करत आहेत. आतापर्यंत त्यांची तीन-चार प्रकरणं लिहून झालेली आहेत. त्यातील एक 'परिवर्तनाचा वाटसरू'मध्ये गेल्या आठवड्यात प्रकाशित झालं आहे, दुसरं साधनेमध्ये. मोठी प्रकरणं आहेत ती, २५ - २५ पानांची. मी त्यातली तीन प्रकरणं वाचली आहेत. त्यांनी जे काही मांडलं आहे, त्याच्यावर टीकाटिप्पणी होईल, ती जरूर व्हावी. पण हे फार आवश्यक होतं. भालचंद्र नेमाडे जी काही देशीवादाची मांडणी करू पाहत आहेत, संस्कृतीबद्दल बोलू पाहत आहेत, इंग्रजी भाषेविषयी बोलू पाहत आहेत, जातीसंस्थेबाबत बोलू पाहत आहेत ते सगळं खोडून काढण्याचं किंवा त्याला आव्हान देण्याचं काम, त्याच ताकदीच्या माणसांकडून व्हायला हवं. हे काम करण्याची क्षमता असणारी माणसं आजच्या महाराष्ट्रात फार नाहीत. त्यामुळे रावसाहेब कसबे

असं काही करणार आहेत हे कळलं, तेव्हा मी त्यांना म्हणालोही होतो की, सर, तुमच्या या विवेचनाशी मी सहमत होईल किंवा नाही हा नंतरचा भाग झाला. पण हे होणं बौद्धिक वातावरणासाठी फार आवश्यक आहे.

तर मला असं वाटतं की, अशी आव्हानं कुरुंदकरांकडून उचलली गेली असती, पेलवली गेली असती. उदा. आधुनिक बुवाबाजीचे आव्हान. आधुनिक अध्यात्म या नावाखाली गेली दोन दशके जे काही चालू आहे, त्याला आव्हान देण्याची गरज आहे. दृश्य रूपामध्ये ते कसल्याही स्वरूपातील चमत्काराचा दावा करत नाहीत, कसल्याही प्रकारची अंधश्रद्धा किंवा कर्मकांड तिथे वरवर पाहता दिसत नाहीत. पण अधिक खोलात गेलं तर सेल्फ रियलायझेशनच्या नावाखाली तिथं जे काही चालू आहे, ते लोकशाहीच्या दृष्टीने घातक आहे. सेल्फ रियलायझेशन किंवा व्यक्तिमत्त्व विकास यांच्या नावाखाली मध्यमवर्ग व तरुणवर्ग समाजविन्मुख होतो आहे. या सगळ्या प्रकारांची सुरुवात ओशो रजनीशांच्यापासून झालेली आहे.

कुरुंदकर होते तेव्हा आधुनिक अध्यात्म या नावाखाली काम करणारी फार थोडी माणसं होती, त्यातलं ओशो हे एक प्रॉमिनंट नाव होतं. ओशोंवर कुरुंदकरांनी जो लेख लिहिलेला आहे, तो चिरफाड करणं या प्रकारचा आहे. आम्ही निवडक कुरुंदकर : ग्रंथवेधचा पुढचा जो भाग काढणार आहोत, त्याच्यामध्ये चार विभाग असणार आहेत. पहिला विभाग असेल आस्वाद - ज्या ग्रंथांचा कुरुंदकरांनी आस्वाद घेतला त्याविषयी तो असेल. दुसरा विभाग असेल परामर्श घेणारा. तिसरा विभाग असेल चिकित्सा करणारा. आणि चौथा विभाग असेल समाचार घेणारा. समाचार या विभागात ज्या दोन पुस्तकांवर लेख आहेत, त्यांपैकी एक आहे ओशोंचं 'संभोगातून समाधीकडे' आणि दुसरं गोपाळ गोडसेंचं 'गांधीहत्या आणि मी'. तर त्या लेखात, ओशोंचा समाचार ज्या पद्धतीने कुरुंदकरांनी घेतला आहे तशाप्रकारे, आजचं आधुनिक अध्यात्म आणि त्या नावाखाली चालू असलेली बुवाबाजी यांना बाहेर काढणं फार आवश्यक आहे.

हे फार आवश्यक आहे. कारण १९९० नंतर या देशात एकाबाजूला मध्यमवर्ग फुगत चालला, दुसऱ्या बाजूला चळवळी आणि आंदोलनांचा ऱ्हास झाला. छोट्या-छोट्या स्वरूपात त्या राहिल्या, पण निष्प्रभ किंवा निष्क्रिय अवस्थेत. आणि याचं कारण, चळवळी - आंदोलनांकडे जाऊ शकणारी, त्यांच्याबरोबर काम करू शकणारी सुशिक्षित मध्यमवर्गातली (तुलनेने सुखवस्तू अशी) माणसं आधुनिक बुवाबाजीकडे वळलेली आहेत. म्हणजे चळवळी - आंदोलनांचा ऱ्हास आणि आधुनिक अध्यात्माचा उत्कर्ष या दोन्ही प्रक्रिया एकाचवेळी सुरू झाल्या

आहेत. याचं विवेचन, विश्लेषण अजून कुणी केलेलं नाही. मला वाटतं, कुरुंदकरांचा वैचारिक वारसा सांगणाऱ्या कुणीतरी हे आव्हान पेलवायला हवे...

कुरुंदकरांचे विचारविश्व समजून घेताना, आणखी एक महत्त्वाचा मुद्दा सांगतो आणि थांबतो. कुरुंदकरांनी 'माझा ग्रंथसंग्रह नाही' या शीर्षकाच्या लेखामध्ये असंही सांगून ठेवलेलं आहे की, माझा असा कोणताही अभ्यासाचा विषय नाही. माझ्यावर अभ्यासाचा विषय येऊन पडतो आणि त्याच्या मागे मी लागतो. त्यामुळे कुरुंदकर कोण होते आणि त्यांचं स्पेशलायझेशन काय होतं याच्या चर्चेत पडण्यापेक्षा; जो जो विषय समाजासमोर उकलून दाखवणं आवश्यक आहे आणि ज्या ज्या घटकांना एक्सपोज करणं आवश्यक आहे ते ते केलं पाहिजे. म्हणजे जे जे समाजहिताचं आहे, पण इतर कुणी करत नाही, अशा सर्व विषयांमध्ये मतलबी घटकांना किंवा विघातक शक्तींना अंगावर घेऊन त्यांची चिकित्सा करणं हे कुरुंदकरांच्या गाभ्याचं तत्त्व होतं किंवा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं व्यवच्छेदक लक्षण होतं. ते तत्त्व आणि ते लक्षण आपण पुढे घेऊन जाणं गरजेचं आहे, जर कुरुंदकरांच्या विचारविश्वाची चर्चा आपण करणार असू तर !

कुरुंदकरांच्या बाबतीत मी मघाशी बोलताना असंही म्हटलं की, समाजवाद्यांनाही सगळेच कुरुंदकर झेपणारे नव्हते. त्याचा संदर्भ असा आहे की, कुरुंदकरांनी मुस्लिमांची आणि दलितांची ज्या प्रकारे चिकित्सा केली तशी चिकित्सा करायला लोक घाबरतात, तेव्हाही आणि आजही ! इथे हेही लक्षात घ्यायला हवं की, समाजवाद्यांना सगळ्या समूहांबद्दल जी आपुलकी आहे; तळागाळातल्या समूहाला झुकतं माप दिलं पाहिजे असं जे मनापासून वाटतं, तेच किंबहुना त्यापेक्षा जास्त कुरुंदकरांना वाटत होतं. त्यामुळे मुस्लीम, दलित आणि अन्य कोणत्याही शोषित घटकांना -मी जो अभ्यास केला आहे त्यानुसार- कुरुंदकरांचं झुकतं माप होतंच होतं. एवढंच नाही तर, जात, धर्म, वंश, लिंग, प्रदेश, भाषा इत्यादींच्या आधारावर असलेल्या विषमतेला आणि त्याद्वारे होत असलेल्या शोषणाला त्यांचा कडवा विरोध होता. पण त्यासंदर्भात त्यांच्यासाठी महत्त्वाचा मुद्दा हा होता की, आपल्याला चर्चा आणि चिकित्सा करायची आहे की नाही ? आणि तशी चिकित्सा ते करत होते, करू पाहत होते म्हणून त्यांच्यावर त्या काळात टीका झाली. मला वाटतं, ती टीका स्वाभाविक होती आणि अशी टीका सहन करणं हे कोणत्याही काळातले अभ्यासक, विचारवंत यांना अपरिहार्य ठरतं. म्हणून त्या टीकाकारांना फार दोष देत बसण्यापेक्षा, 'मला प्रवाहासाठी प्रवाहाविरुद्ध पोहायचं आहे ना, मग मी हे केलं पाहिजे', अशी धारणा असायला हवी. कुरुंदकरांच्या काही लेखनातूनही

थोडेसे निराशेचे म्हणावेत असे उद्गार दिसले की, ही सगळी माझी माणसं, मी जेव्हा काही अप्रिय सत्य मांडायला गेलो तेव्हा मला दुरावली किंवा थोडी लांब व्हायला लागली, किंवा माझ्या हेतूबद्दलच शंका घ्यायला लागली. पण मित्रहो, मला त्याचं फार आश्चर्य वाटत नाही. कारण कोणत्याही काळामध्ये जे कुणी प्रवाहासाठी प्रवाहाविरुद्ध पोहण्याची भूमिका घेतात, त्यांच्या वाट्याला अशा प्रकारची निराशा, काही अंशी वैफल्य येणारच ! त्याचा सामना करणं याला दुसरा काही पर्याय मला तरी दिसत नाही...!

(शब्दांकन : **सुहास पाटील**)

(आभार : साधना साप्ताहिक)

(लेखक साधना साप्ताहिकाचे संपादक आहेत.)

■ ■



माझ्या वडिलांनी, आजोबांनी अथवा पूर्वजांनी खोदलेली विहीर आहे म्हणून अभिमान बाळगणे इथपर्यंत ठीक आहे; मात्र जर त्या विहिरीचे पाणी खारट आणि क्षारयुक्त असेल आणि त्यापासून सबंध कुटुंबाला 'मुतखडा' होणार आहे, हे माहीत असूनदेखील केवळ ती विहीर माझ्या वडिलांनी आणि आजोबांनी खोदली आहे आणि मला तिचा अभिमान आहे, त्यामुळे तिचे खारट जरी असले तरी आम्ही पाणी पिणारच असा ठाम निर्धार म्हणजे शुद्ध मूर्खपणा आहे...

अशावेळी शहाणा माणूस मात्र जरी आपल्या पूर्वजांनी ती विहीर परिश्रमाने खोदली असेल तरी आज मात्र सगळ्या कुटुंबाच्या आरोग्याला त्याने धोका आहे त्यामुळे तिचे पाणी पिणे नाकारत असतो तो शहाणा म्हणून गणला जातो...

हीच गत आपल्या रूढी आणि परंपरेची आहे. ढुंगणाला 'गळू' व्हायची वेळ आली तरी आमच्या पूर्वजांनी विशिष्ट रूढी आणि परंपरा पाळल्या आहेत म्हणून आम्ही पाळणार असे म्हणणारे मूर्ख काय कमी आहेत ?

– **गोपाळ गणेश आगरकर** *(सुधारक पाक्षिकातून साभार)*

अंकविशेष

वसिमा : मुस्लीम युवतींची आयकॉन

• समीर मणियार

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचा निकाल गेल्या आठवड्यात जाहीर झाला. त्यात ४२० परिक्षार्थी यशस्वी झाले आहेत. तथापि यावेळचा निकाल खूप वेगळा आहे. उच्चशिक्षण आणि स्पर्धात्मक परीक्षा ही ठराविक वर्गाची मक्तेदारी आहे हा समज या निकालाने मोडीत काढला आहे. यावेळी मुस्लीम समाजातील तीन मुली आणि एक मुलगा स्पर्धात्मक परीक्षांमध्ये उत्तीर्ण झाला आहे. या परीक्षेत सय्यद आसमा सय्यद झहिर अहमद ही गट अ मधील असिस्टंट कमिशनर ऑफ सेल्स टॅक्स, शेख महंमद फयाज महंमद मुनीर हे सेक्शन ऑफिसर, समीनाबानू अब्दुल रज्जाक बागवान यांची ब गटात डेप्युटी सुपरिटेंड ऑफ एक्साईज आणि शेख वसीमा महेबुब या महिला खुल्या प्रवर्गातून सब डिव्हिजनल मॅजेस्ट्रिट ही परीक्षा उत्तीर्ण झाली आहे.

अत्यंत गरिबी, कुठलेही आर्थिक पाठबळ नाही. मुलींच्या उच्चशिक्षणासाठी कर्मठ मुल्ला-मौलवींचा विरोध असतो. चूल आणि मूल हीच मुलीची जबाबदारी असते. तिने अनावश्यक म्हणजे शिक्षणासाठीसुद्धा घरचा उंबरठा ओलांडता कामा नये. धर्माचा पगडा आणि वर्तमान काळापेक्षा मृत्यूनंतर जन्नत म्हणजे स्वर्ग मिळविण्यासाठी साऱ्या जीवनाचा आटापिटा. नुसती धार्मिक रूढीपरंपरा पाळण्यास महत्त्व; पण मुलीला आर्थिकदृष्ट्या तिच्या पायावर उभे करण्यासाठी उच्च व व्यावसायिक शिक्षणाची संधी नाकारली जाते, असे वास्तव असलेल्या मराठवाड्यातील वसीमा शेख या मुलीचे यश समाजाला नवी दिशा देणारे आहे. संधी मिळाली की त्याचे सोने करता येते; पण जिथे दोन वेळेला हातातोंडाची गाठ पडेल की नाही याची शाश्वती नाही, अशा बालपणी चंद्रमौळी झोपडीत राहणाऱ्या वसिमाच्या यशाचे कौतुक करावे तितके कमी आहे.

मुघल साम्राज्य, निझामशाही, आदिलशाही, हैदराबादचे रजाकार अशा शाह्यांची सत्ता देशात काही काळ होती. अर्थात यास केवळ धर्माचे लेबल लावून चालणार नाही तर ती सत्ताकारण व त्यातील सत्तेसाठी लाचारांची फौज होती. काळ बदलला तशी मुस्लीम राजवटीची सत्ता लयास गेली. सत्तेत राहणारा हा मूठभर वर्ग होता. त्या सत्तेत सर्व धर्माची मंडळी सहभागी होती. पण गेल्या दोन

शतकात मात्र सामान्य मुस्लिमांची अवस्था बिकट असून, तो गरिबी आणि दारिद्र्याच्या समृद्ध अडगळीत फेकला गेला आहे. धर्मप्रसाराच्या नावाखाली तबलिग सारख्या संघटनांनी या समाजाच्या तोंडावर झापडे लावण्याचाच उद्योग केला आहे.

माजी न्या. राजेंद्र सच्चर आयोगाने भारतीय मुस्लीम समाजातील गेल्या ७३ वर्षांचे भयानक समाजवास्तव जगासमोर मांडले आहे. सर्वाधिक सत्ता भोगणाऱ्या काँग्रेसने मुस्लिमांचे लाड केले अशी हाकाटी आणि कंठशोष संघाच्या मुशीत घडलेली मंडळी उठता बसता करीत असतात. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात आणि भारतमातेचे संरक्षण करणे आणि भारतीय मायभूमीची अस्मिता, स्वाभिमान टिकविण्यासाठी भारतीय मुस्लिमांचे योगदानही मोठे आहे. दुर्दैवाने भारतीय मुस्लीम समाजाला काळाचे व्यापक भान असलेले, दूरदृष्टीचे प्रगल्भ नेतृत्व लाभले नाही.

सतत संशयाच्या फेऱ्यात सापडलेला हा समाज आणि त्याचे शत्रूराष्ट्राशी जोडलेले चुकीचे नाते यामुळे सामान्य भारतीय मुस्लीम बचावात्मक पवित्रा घेत असतो. तथापि, समाजजीवनाच्या विविध क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी मुस्लिमांनी केली आहे. मिसाईलमॅन अशी ओळख असलेले डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनीही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून जगविख्यात शास्त्रज्ञ ते राष्ट्रपती पदापर्यंत मजल मारली. अर्थात यापूर्वी ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ डॉ. झाकीर हुसेन आणि फकरुद्दिन अली अहमद यांनी देशाचे राष्ट्रपती पद भूषविलेले आहे.

भारतीय मुस्लिमांची सध्याची अवस्था आदिवासी दलितांपेक्षाही वाईट आहे. सत्ताधारी वर्गाचा या समाजाकडे पाहण्याचा दृष्टीकोन सर्वज्ञात आहे. गरिबी आणि द्रारिद्र्य संपुष्टात आणायचे असेल तर त्यासाठी शिक्षणाची गुरुकिल्ली हाच उपाय आहे. देशात महिलांच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ सावित्रीबाई व जोतिबा फुले यांनी रोवली. स्त्री-शिक्षणासाठी आग्रह धरल्याबद्दल सावित्रीबाईंची त्या काळी तथाकथित अभिजन वर्गाने दगड-शेणाचा मारा करून हेटाळणी केली. तोच अभिजन समाज शिक्षणात पुढे गेला आहे. सावित्रीबाई यांच्यासोबत १८५० च्या सुमारास फातिमा शेख ही पहिली भारतीय मुस्लीम शिक्षिका बनल्या. शिक्षण पण तेसुद्धा आधुनिक काळाशी सुसंगत व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यातूनच समाज बदलता येईल. मुलगी शिकली की पुढची पीढी शिक्षित होते, या न्यायाने नांदेड जिल्ह्यातील वसिमा शेख यांचे यश लाखमोलाचे आहे.

शिक्षण हा असा एकमेव मार्ग आहे की ज्यातून एक व्यक्तिमत्त्व घडते. आयुष्य बदलण्याची ताकद शिक्षणात आहे. यासाठी आमच्या समाजातील मुलींनी

शिकायला हवे. यासाठी लोकांनीही मानसिकता बदलायला हवी. आमच्या समाजात पालकांचा कल हा धार्मिक शिक्षणाकडे असतो. पण माझ्या पालकांनी मला मराठी माध्यमाच्या शाळेतून शिकवले. हा त्यांचा निर्णय खूप महत्त्वाचा होता. बहुतांशी पालकांचा हा निर्णय कुठेतरी चुकतो असे वसीमा शेख यांची प्रतिक्रिया खूप बोलकी आणि काळाच्या बरोबरीने जाणारी आहे.

मराठवाड्यातील मुस्लिमांची अवस्था तशी बरी नाही. नांदेड जिल्ह्यात लोहा तालुक्यातील जोशी सांगवी या तीन हजार उंबऱ्याच्या गावात वसीमा शेख व त्यांचे कुटुंब राहते. वसिमा शेखच्या घरात सहा भावंडे आहेत. त्यात चार बहिणी, दोन भाऊ आणि आई-वडील आहेत. वडिलांचे मानसिक आरोग्य पहिल्यापासूनच बरे नाही. त्यांच्याकडून कोणतेही काम होत नाही. साहजिकच घर चालविण्याची जबाबदारी आईवर आली. वसिमाची आई शेतीत मोलमजुरी करणे, लोकांच्या घरी जाऊन भांडीकुंडी, धुणे असे करीत घर सांभाळायच्या. मोठा भाऊ ऑटो रिक्षा चालवून आईला मदत करायचा. काही वर्षांपूर्वी वसिमाच्या घरात दिवाबत्तीसाठी वीज कनेक्शनसुद्धा नव्हते. पिण्याच्या पाण्याचीही वानवा होती.

अशा प्रतिकूल परिस्थितीत वसिमाने दहावीपर्यंतचे शिक्षण गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत घेतले. दहावीनंतर १२ किमी अंतरावर कॉलेज होते. त्यासाठी दररोज सहा किमी पायपीट करून वसिमा जायची. अकरावीला तिने वर्षभर चालत जाऊन कॉलेज केले. बारावीला मी एकटीच कॉलेजला जायचे, बाकी मुलींना पालक पाठवायला तयार नव्हते. त्यामुळे मग मी माझ्या आजोळी कंधारच्याजवळ बासोटी गाव आहे तिथे राहिले. बासोटीहून गावाहून कंधार १० किमी आहे. तेथून एसटीने शिक्षणासाठी प्रवास केला. नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून राज्यशास्त्र आणि इंग्रजीत वसिमाने २०१५ ला बी. ए. पदवी संपादन केली. त्यानंतर स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू झाली.

२०१५-१६ साली स्पर्धा परीक्षेचा अभ्यास वसिमाने सुरू केला. गावाकडे पुस्तके, वर्तमानपत्र आणि लायब्ररीची सुविधा नव्हती. आमच्या समाजात मुलीवर खूप बंधने असतात. नांदेडला होते तर तिथेपण लायब्ररीला जाता येत नव्हते. समाजातल्या खूप साऱ्या लोकांचा विरोध होत होता कारण एक तर मुलगी होते हा पहिला मुद्दा, आमच्या समाजात मुलींच्या शिक्षणाला विरोध आहे. मुलींना शिकवण्याची मानसिकताच नाही लोकांची, असे भयानक समाजवास्तव ती मांडते. दुसरे म्हणजे परंपरेने लादलेली अनेक बंधने आहे. त्यात पडदा पद्धती आहे. अशा स्थितीत लायब्ररीला जाणे, तिथे १५-१५ तास अभ्यास करणे लोकांना पटणारे

नव्हते. त्यामुळे तिला नांदेडला अभ्यास करता येत नव्हता. आपल्या बहिणीची अडचण बघून वसिमाचा भाऊ इम्राानने त्याचे शिक्षण सोडले आणि ऑटो रिक्षा चालवायला घेतली कारण भावाला वसिमाचे शिक्षण थांबवायचे नव्हते.

स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीसाठी इम्राानने वसिमाला पुण्यात पाठविण्याचा निर्णय घेतला आणि पहिल्याच प्रयत्नात २०१६ साली महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा वसिमा उत्तीर्ण झाली. २०१८ साली ती विक्रीकर निरीक्षक म्हणून नागपूरला नोकरीस लागली. याच नोकरीत आणखी परीक्षा देऊन उपजिल्हाधिकारी पदासाठी निवड झाल्याचे वसिमा सार्थ अभिमानाने सांगते.

अभ्यासात सातत्य हवे. मी दोनच वर्षे व्यवस्थित अभ्यास केला. दररोज १५ ते १६ तास अभ्यास केला. अभ्यासात सातत्य, संयम आणि हार्ड वर्क या तीन गोष्टी असल्या की स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होणे अवघड नाही. परिस्थितीनेच मला संघर्ष करायला शिकविले. यात आई आणि भावाची मोलाची साथ होती.

समाजातील बदल आणि विकासासाठी धोरणकर्त्या शासकीय जमातीत जायला हवे. एक प्रशासकीय अधिकारी त्याचा एखादा महत्त्वाचा निर्णय लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आणू शकतो. आमच्या समाजात तर घरातून बाहेर पडायची परवानगी नाही, अशा परिस्थितीत शिक्षण घ्यायला किती अडचणी येऊ शकतात, याची तुम्ही कल्पना करू शकता. मला सुरुवातीला खूप लोकांनी विरोध केला, माझ्या शिक्षणामुळे आई-वडिलांना, भावांना समाजाचे बोलणे खावे लागले. आज तो समाज भावी उपजिल्हाधिकारी वसिमा यांचे स्वागत करण्यासाठी फुलांचा हार घेऊन तयार आहे. लोकांना आपण जेव्हा चमत्कार दाखवतो, तेव्हाच नमस्कार केला जातो असेही वसिमा विनम्रपणे सांगते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची दुसऱ्यांदा परीक्षा पास झाल्यानंतर एक-दोन महिन्यांत वसिमा शेख यांचे प्रशिक्षण पूर्ण होईल. त्या उपजिल्हाधिकारी पदाचा कार्यभार हाती घेतील. मुस्लीम समाजाला आणि मुस्लीम मुलींचे आयकॉन बनलेल्या वसिमाला भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा !

(ज्येष्ठ पत्रकार ज्योती पुनवानी, पत्रकार श्रीकांत बंगाळे या सहकाऱ्यांची माहिती व मराठवाड्यातील स्थानिक वर्तमानपत्र आणि न्यूज चॅनेलमधील माहिती मधून साभार)

(लेखक पत्रकार व मंडळाचे कार्यकर्ते आहेत.)

■ ■

भारताचे परराष्ट्र धोरण आणि मानवी दृष्टिकोन

• प्रा. रोहन चौधरी

हमीद दलवाई स्टडी सर्कल आणि वैश्विक मानवता समूहात प्रा. रोहन चौधरी यांचे ऑनलाईन व्याख्यान झाले. त्या व्याख्यानातील ठळक विचार.

एकीकडे भारतीय परराष्ट्र धोरण व्यक्तिकेंद्रित होत चालले आहे किंवा त्याचे रूपांतर पक्ष सोहळ्यात होत आहे. तर दुसरीकडे कोरोनासारख्या संकटामुळे मानवाने निर्माण केलेल्या व्यवस्थेपुढेच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नेमक्या याच वेळी जागतिक राजकारणात अस्थिरता निर्माण होत आहे. यामुळे जगाची वाटचाल संघर्षाकडे चालली आहे. अशावेळी परराष्ट्र धोरणावर चर्चा करणे आणि तेही मानवी दृष्टिकोनातून हेच या अंधारात आशेचा किरण आहे. याप्रसंगी कुसुमाग्रजांची कविता आठवते -

थोडा उजेड ठेवूया, अंधार झालाय फार
आले चहू दिशांनी तूफान तिरस्कारांचे
संवाद तेवत ठेवूया, विसंवाद झालाय फार.

परराष्ट्र धोरण आणि मानवी दृष्टिकोन हे निराळे नसून मानवी दृष्टिकोन हा कोणत्याही परराष्ट्र धोरणाचा गाभा असतो. भारताच्या बाबतीत तर तो त्याचा आत्माच आहे. तो समजून घेण्यासाठी आपल्याला प्रथमत: आपल्या दृष्टिकोनात बदल केला पाहिजे.

१) आपल्याकडे परराष्ट्र धोरणाची अभ्यासचर्चा ही साधारणत: १९४७ नंतर म्हणजेच भारत स्वतंत्र झाल्यानंतर केली जाते.

२) परराष्ट्र धोरण म्हणजे चारचौघांची मक्तेदारी नसून इथल्या इतिहास, भूगोल, राजकारण, अर्थकारण, समाजकारण आणि संस्कृतीवर आधारित धोरणाचे प्रतिबिंब हे त्यात असते. सकाळी उठल्यावर चहा करण्यासाठी लागणारा सिलेंडर पासून ते ऑफिसला जाण्यासाठी गाडीत लागणारे पेट्रोल याचा थेट संबंध हा परराष्ट्र धोरणाशी असतो.

३) परराष्ट्र धोरण म्हणजे फक्त दोन देशांतील संबंधाचा अभ्यास नसून दोन समाजाचा अभ्यास असतो. एकदा हे तीन दृष्टिकोन समजून घेतले की मग

आपणही त्याचे घटक आहोत ही जाणीव होते. भारतीय परराष्ट्र धोरणाचे मानवी दृष्टिकोन समजून घेण्यासाठी हे अत्यंत गरजेचे आहे. भारताच्या बाबतीत तर ते आवश्यक आहे.

भारतीय परराष्ट्र धोरणाचा आढावा हा साधारणत: तीन भागांत तो समजविण्याचा प्रयत्न करतो.

१) १९२० ते साधारणत: १९६२ पर्यंत म्हणजे भारत-चीन युद्धापर्यंत.

२) १९६२ पासून तो १९९१ पर्यंत म्हणजे शीतयुद्ध समाप्ती किंवा भारताच्या जागतिकीकरणाच्या सुरुवातीपर्यंत.

३) १९९१ ते २०२० पर्यंत. हा भाग आपल्या सोयीसाठी करण्यात आला असून तो अंतिम नाही. प्रत्येकजण आपापल्या परीने तो पाहू शकतो.

आता हे तीन भाग समजून सांगण्याआधी दोन गोष्टींचा उल्लेख करणे आवश्यक आहे. तो तेवढा करतो. ३ मुद्दे मी सांगणार आहे त्यासाठी ते अत्यंत आवश्यक आहे.

१) राष्ट्र, राज्याची संकल्पना १६४८ साली युरोपमध्ये वेस्टफेलियाचा करार झाला ज्यानुसार युरोपमधील १५ व्या शतकापासून सुरू असलेल्या धर्मयुद्धाचा शेवट आणि मध्य युरोपमध्ये १६१८ पासून सुरू असलेल्या ३० वर्षे युद्धाचा शेवट झाला. या कराराने आधुनिक राष्ट्रराज्याची संकल्पना उदयास आली. ज्यामध्ये सार्वभौमत्व, भूप्रदेश, लोकसंख्या आणि शासन यांचा समावेश आहे. म्हणून मघाशी मी म्हटल्याप्रमाणे भारतात परराष्ट्र धोरणाचा अभ्यास हा १९४७ नंतर केला जातो. कारण भारताचा स्वत:चा भूप्रदेश आणि लोकसंख्या असली तरी ब्रिटिशांची राजवट असल्यामुळे भारतात स्वत:चे शासन नव्हते आणि त्यामुळे भारत सार्वभौम नव्हता.

२) परराष्ट्र धोरण म्हणजे फक्त दोन देशांतील व्यापार संबंध नाही, यात विकास आणि सुरक्षा यांचा मिलाफ असून शांतता अबाधित राखणे आणि युद्धाला प्रतिबंध घालणे हे त्याचे प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे. आपली चर्चा ही विकास आणि सुरक्षा या दोहोंवरच आधारित असणार आहे.

१) स्वातंत्र्यपूर्व भारताचे परराष्ट्र धोरण

परराष्ट्र धोरणातील मानवी दृष्टिकोनाचे अस्सल उदाहरण म्हणजे भारतीय स्वातंत्र्यलढा आणि त्यातून भारतीय परराष्ट्र धोरणाची झालेली पायाभरणी. ज्या काळात एकेका व्यक्तीचा असामान्य असा प्रभाव जनमानसांवर होता त्यावेळी या व्यक्ती संपूर्ण मानवजातीचा विचार करत होत्या. स्वातंत्र्यानंतर भारताचे स्थान

काय आहे याचा विचार करीत होती आणि जग कसे असावे यांची मांडणी करत होती. नाहीतर त्या काळात सुद्धा या सर्वांनाच शक्य होतं व्यक्तिकेंद्रित विचार मांडण्याचं. भारतात सत्ताधाऱ्यांकडे आज पाशवी बहुमत असून, लोकांचा पाठिंबा असून राज्यकर्ते आत्मनिर्भरची भाषा करत आहेत आणि स्वत:बरोबर भारताला देखील संकुचित राष्ट्रवादाच्या मार्गावर नेत आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात हे संबंध शांतता, अहिंसा, मानवता यांवर आधारित होते.

उदाहरणार्थ, १९१९ सालची जागतिक शांतता परिषद पहिल्या महायुद्धानंतर म्हणजेच १९१९ साली निर्माण झालेल्या प्रचंड वित्तहानीच्या आणि जीवितहानीच्या पार्श्वभूमीवर तसेच युरोपच्या राजकीय आणि आर्थिक भवितव्यासंबंधी चर्चा करण्यासाठी ही बैठक फ्रान्समध्ये आयोजित करण्यात आली होती. यात सय्यद इमाम हसन, लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांचे प्रतिनिधी मंडळ पाठविण्यात आले होते. प्रत्यक्ष ते परिषदेला हजर होऊ शकले नाहीत; परंतु त्यांनी ज्या मागण्या या परिषदेत केल्या त्या मानवी दृष्टिकोनावर आधारित होत्या.

१) भारत हा जागतिक संघर्षातून अलिप्त राहील.

२) भौगोलिक वैशिष्ट्ये आणि साधनसंपत्ती यांमुळे जागतिक राजकारणाचे नेतृत्व आपोआपच भारताकडे चालून येईल.

३) भारताच्या परराष्ट्र धोरणात साम्राज्यवादाचा आणि वसाहतवादाचा अवशेष असणार नाही.

४) भारत स्वत:हून कधी आपल्या सैन्य शक्तीचा वापर आपली शक्ती दाखविण्यासाठी करणार नाही.

५) भारत-जपान सारख्या आशियाई राष्ट्रांनी एकत्र येऊन आशियाई धोरणाचा पुरस्कार केला पाहिजे.

६) अमेरिकेच्या दुटप्पी धोरणांवर देखील त्यांनी या पत्रात ताशेरे ओढले होते.

रवींद्रनाथ टागोर

हे भारतातील एक मोठे व्यक्तिमत्त्व. चीन आणि भारतासंबंधी टागोर यांचे काय विचार होते हे आत्ताच्या घडीला समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. टागोरांचा भारत-चीन संबंधाचा पाया हा आशिया केंद्रित होता; तो पाश्चिमात्य विचारसरणीच्या विरोधात होता. १९१३ साली टागोरांना जेव्हा नोबेल पारितोषिक मिळाले होते, तेव्हा चीनमध्ये त्याचे स्वागत 'आशियातील पहिले नोबेल' असे

झाले होते.

चीनवर टागोरांचा इतका प्रभाव होता की, त्यांच्या काही कविता या चीनमधील माध्यमिक शाळेतदेखील शिकवल्या जातात; काही भागांत बंगाली भाषाही शिकवली जाते. ते भारत आणि चीन यांच्यात सिव्हिलाईझेशनल लीडरशीप या अनुषंगाने बघायचे. आशियाने जागतिक राजकारणात स्वत:ची जागा निर्माण करणे गरजेचे असून त्यासाठी भारत-चीन यांच्यात सहकार्य असणे गरजेचे आहे. Chen-Diu Xiu-Founder Member of CCP यांनी १९१५ साली टागोर यांच्या 'गीतांजली' पुस्तकाचे भाषांतर चिनी भाषेत केले होते. टागोर यांनी चीनमध्ये ३४ भाषणे दिली असून पाश्चात्त्य विचारसरणीला विरोध, आशियाकेंद्रित जागतिक राजकारण आणि भारत-चीन सांस्कृतिक आणि Civilizational सहकार्य हीच त्यांची मांडणी होती.

आपल्याला विवेकानंदांचे शिकागो येथील भाषण आठवत असेल. ज्याची सुरुवात त्यांनी 'बंधू-भगिनी' अशी केली होती. अशाच प्रकारची भाषा १९२४ साली टागोर यांनी चीनच्या भेटीत केली होती. पुढे नेहरूंना वाटणारे चीनचे आकर्षण हा टागोरांच्या विचारांचा परिणाम होता. महत्त्वाचे म्हणजे टागोरांनी चीनच्या इतिहासातील सर्वांत मानहानीकारक असणाऱ्या Opium War ला देखील विरोध केला होता. द्वारकानाथ कोटणीसांचेदेखील आपल्यासमोर उदाहरण आहे. ज्याचा खुद्द माओ यांनी 'मानवतेचे मित्र' असा उल्लेख केला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विविध क्षेत्रातील अभ्यासक होते. त्यांच्या इतर कमिटमेंटमुळे त्यांना विदेशी धोरणांवर लक्ष द्यायला जरी वेळ मिळाला नसला तरी Article 51 मध्ये त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसते.

अ) आंतरराष्ट्रीय शांतता व सहकार्याला प्रोत्साहन. ब) दोन राष्ट्रांतील संबंध हे न्याय्य आणि समान प्रतिष्ठेवर. क) आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर आणि आंतरराष्ट्रीय तंट्याचे शांततापूर्ण निराकरण. या गोष्टी त्यांना अपेक्षित होत्या.

मौलाना अबुल कलाम आझाद

हे स्वातंत्र्य आंदोलनातील एक अग्रणी. हिंदू-मुस्लीम ऐक्य. फाळणीला विरोध. ११०० वर्षांची सांस्कृतिक देवाणघेवाण. या संदर्भात आझादांच्या विचारांचा प्रभाव परराष्ट्र धोरणावर आहे.

गांधी

स्वातंत्र्यलढ्याच्या उत्तरार्धात गांधीविचार जगात पोहोचले होते. मानवी

दृष्टिकोनावर आधारित परराष्ट्र धोरणावर गांधीजींच्या विचारांचा विशेष प्रभाव होता. नेहरूंनी आखलेल्या धोरणात याचे प्रतिबिंब आढळून येते. त्यामध्ये प्रामुख्याने सत्याचा आग्रह, अहिंसेचा वापर आणि शांततेसाठी प्रयत्न या तीन गोष्टींचा समावेश होतो.

परराष्ट्र धोरणाच्या पहिल्या टप्प्यात -

१९४७ - Asian Relation Conference
आशियाई राष्ट्रांनी एकत्र येणे.

१९३३ - आफ्रो-आशिया कॉन्फरन्स.

१९३४ - पंचशील करार.

१९५०-५३ - कोरिअन संघर्ष आणि अलिप्ततावादी चळवळ

म्हणजेच हा कालखंड आणि प्रमुख नेत्यांचे जर प्रयत्न बघितले तर आपल्याला लक्षात येईल की स्वातंत्र्यचळवळीचा आणि एकंदरच जागतिक राजकारणाबद्दल यांच्या मनात इतकी करुणा होती की भारताचे स्वातंत्र्य हे फक्त भारताचे स्वातंत्र्य नसून संपूर्ण मानवजातीचे स्वातंत्र्य आहे आणि त्याचा मूलभूत पाया हा विकास आहे कारण स्वातंत्र्याशिवाय मानवजातीचा विकासच अशक्य आहे आणि हा विकास सहकार्यानेच शक्य आहे, अशी त्यात मांडणी होती.

दुसरा टप्पा हा १९६२ ते १९९१

१९६२ च्या भारत-चीन युद्धाने भारताच्या मानवी दृष्टिकोनावर आधारित परराष्ट्र धोरणांवर इतका मोठा आघात केला की विकासावर आधारित परराष्ट्र धोरणाची जागा सुरक्षेवर आधारित परराष्ट्र धोरणाने घेतली.

त्यानंतर १९६५ चे भारत-पाकिस्तान युद्ध, १९७१ बांगलादेशाची निर्मिती, १९७४ ची अणुचाचणी, १९७५ सिक्कीमचे विलिनीकरण, १९७९ साली रशियाचे अफगाणिस्तानावरील आक्रमण आणि भारताचे मौन, १९८४ साली खलिस्तान दहशतवादी, १९८९ ची काश्मीर समस्या, राजकीय अस्थिरता यामुळे भारत अंतर्गत सुरक्षेत इतका व्यस्त राहिला की जागतिक राजकारणावर राज्य करण्याचे बघितलेले स्वप्नच विरून गेले.

तिसरा टप्पा हा १९९१-२०२०

या काळात भारतासाठी मानवी दृष्टिकोन हा फक्त शब्दांपुरता मर्यादित राहिला. १९९१ साली सोव्हिएत महासंघाचे विघटन झाल्यानंतर जागतिक राजकारणात भारत एकटा पडला. शीतयुद्ध संपुष्टात आल्यामुळे अलिप्तता चळवळ देखील संपुष्टात आली. अमेरिका या काळात जगातील सर्वांत शक्तिशाली राष्ट्र

म्हणून उदयास आली. देशांतर्गत परकीय गंगाजळीचा तुटवडा भासू लागला आणि भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार केला.

काँग्रेसची एकाधिकारशाही संपुष्टात आली आणि भारतीय जनता पक्षाचा उदय झाला. पुढे बाबरी मशीदीवरील हल्ल्याने भारताच्या धर्मनिरपेक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले तर मुंबईच्या दंगलीअंतर्गत सुरक्षाव्यवस्थेचे धिंडवडे निघाले.

त्यानंतर १९९८-९९ ला अणुचाचणी, मग भारत-पाकिस्तान युद्ध, २००१ साली अमेरिकेवर आणि भारतावर झालेले आतंकवादी हल्ले, नव्याने पुनर्जीवित झालेला नक्षलवाद, परराष्ट्र धोरणाची जागा अंतर्गत सुरक्षेने घेतली. शहरे उदयास येत होती. ग्रामीण भागातील स्थलांतरीत शहरात येत होते. त्यातच मध्यमवर्गाच्या आकांक्षा वाढत होत्या. त्या इतक्या वाढल्या की मूठभर मध्यमवर्गीयांनी राजसत्ता हस्तगत केली.

त्याचवेळेला जागतिक राजकारणात बदल होत होत भारत, चीन, जपान यांच्यामध्ये आशियाकेंद्रित जागतिक राजकारण उदयास येऊ लागले. अमेरिकेची ताकद कमी होत होती. अमेरिकेच्या आजवरच्या आक्रमक आणि भांडवलशाही धोरणांमुळे तालिबान, अल-कायदा मग इसिस यांची निर्मिती होत होती तर दुसरीकडे लोकशाहीच्या नावाखाली अमेरिका सीरिया, लिबिया, इजिप्त या देशांत हस्तक्षेप करत होता. या सर्वांविरोधात बोलण्यासाठी आशियातील कोणताही नेता वा कोणताही देश तयार नव्हता. तर भारतातील सत्ताधारी इतिहास बदलण्याच्या तयारीत होते, आहेत. पुढे इराण असो वा अफगाणिस्तान भारताची भूमिका एकतर तटस्थ राहिली अथवा अमेरिकेच्या बाजूने.

इतिहासात भौतिक क्षमता नसताना देखील आपले नेते मानवतेची गोष्ट करत होते. वर्तमानकाळात भौतिक क्षमता असतानादेखील आपण निर्णायक हस्तक्षेप करण्यात कमी पडत आहोत.

कोरोनाने ही संधी भारताला दिली होती; परंतु जेव्हा मानवी दृष्टिकोनावर आधारित परराष्ट्र धोरण आखण्याची आवश्यकता आहे, नेमके त्याचवेळी जग आत्मनिर्भरतेच्या मोहजालात मग्न होत चालले आहे. भारतासारखा देश, ज्याचे परराष्ट्र धोरणाचा पाया हा मानवी दृष्टिकोनावर आधारित होता, हा देशही संकुचित राष्ट्रवादावर स्वार होत आहे, हे फारच क्लेशदायक आहे.

(लेखक आंतरराष्ट्रीय घडामोडीचे अभ्यासक आहेत.)

■ ■

अंकविशेष

हमीद दलवाई यांच्या साहित्यातील विचार

● नवाब अल्ताफ हुसेन

हमीद दलवाई यांच्या तीन पुस्तकांचा वैचारिक आढावा या लेखामध्ये घेतला आहे.

कानोसा-भारतातील मुस्लीम मनाचा

हमीद दलवाई (जन्म २९ सप्टेंबर १९३२ ते मृत्यू ३ मे १९७७) एक प्रतिभासंपन्न लेखक, क्रांतिकारी विचारवंत. ज्या मुस्लीम समाजात, संस्कृतीत वाढले त्या समाजाबद्दल, त्या लोकांबद्दल कमालीची आत्मीयता असणारा सामाजिक कार्यकर्ता. वसंत नगरकरांच्या म्हणण्यानुसार एक निखालस भारतीय, ज्याचे मराठी भाषेवर असामान्य प्रभुत्व होते, ज्याची विचारसरणी अत्याधुनिक होती. तिचाच पाठपुरावा करून आपल्या समाजाला आणि देशाला सुधारण्याची आत्यंतिक तळमळ ज्याच्यात होती, त्या हमीद दलवाईमध्ये या ध्येयप्राप्तीसाठी वाटेल ते कष्ट, मानहानी, विरोध सहन करण्याची हिंमत आणि ताकत होती. हमीद दलवाईंनी त्यांच्या विचार आणि कार्यासाठी तसेच समविचारी मुस्लीम कार्यकर्त्यांसाठी एक मंच असावा म्हणून 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ची स्थापना २२ मार्च १९७० रोजी केली.

स्वातंत्र्योत्तर काळात जेव्हा हमीद दलवाईंनी पूर्णवेळ सामाजिक कार्यासाठी देण्याचा निर्धार केला, तेव्हा या कार्याची पायाभरणी करण्यासाठी त्यांनी महात्मा गांधीजींचा मार्ग अवलंबिण्याचे ठरविले. देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामाचे नेतृत्व स्वीकारण्याअगोदर गांधीजींनी देशाच्या कानाकोपऱ्यात वर्षभर हिंडून, निरनिराळ्या लोकांना भेटून नंतरच प्रत्यक्ष कार्याला आरंभ केला. त्यासारखीच काहीशी हमीद दलवाईंनीही पूर्वतयारी करण्याचे ठरविले. श्री. अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांच्या प्रोत्साहनाने व कोरगावकर ट्रस्टच्या दातृत्वामुळे दलवाईंना वर्षभर सुट्टी घेऊन भारत दर्शन करण्याची किंवा निरनिराळ्या भागातील जनतेची ओळख करून घेण्याची संधी मिळाली.

एखादी साथ पसरते, तेव्हा वैद्यकीय यंत्रणेलासुद्धा साथीच्या संक्रमणाची तीव्रता, परिणामकारकता किती आहे आणि कुठल्या थरापर्यंत गेली आहे, हे माहीत होणे गरजेचे असते. त्यावरच रोगावरील उपचार आणि प्रतिबंध निर्धारित

करता येतात. तसेच या रोगाची प्रतिकारक्षमता रोग्यांमध्ये किती प्रमाणात आहे आणि किती रोगी उत्तमरित्या या रोगाला प्रतिकार करू शकतात आणि त्यावर विजय मिळवू शकतात, हेसुद्धा वैद्यकीय क्षेत्रासाठी भविष्याची जमेची बाजू असते. कारण अशाच प्रतिकारक्षम रुग्णांची जोपासना करणे या रोगावर मात करण्यास उपयुक्त ठरते. काही अंशी तसेच सामाजिक क्षेत्रातील रोगांवर मात करण्यासाठी रोगाबरोबरच रुग्णांचीसुद्धा चाचपणी करणे गरजेचे असते. आपला समाज सद्यपरिस्थितीत कोणत्या वळणावर, कोणत्या मानसिकतेला घेऊन उभा आहे, हे समजणे अत्यंत आवश्यक भाग आहे कारण हेच समजले नाही तर ज्या एकात्मिक, विकसित, धर्मनिरपेक्ष, समाजवादी भारतीय समाजाची निर्मिती करावयाची आहे, ते फक्त एक दिवास्वप्नच ठरणार होते. महात्मा गांधी म्हणा किंवा हिंदू समाजातील इतर मोलाच्या समाजसुधारकांनी ही पायाभरणी स्वातंत्र्यपूर्व काळातच केली होती. ज्याची सुंदर मशागत स्वातंत्र्योत्तर काळात नेहरू, आंबेडकर, इ. धुरिणांनी करून हिंदू समाज योग्यरित्या मार्गस्थ करण्याचा प्रयत्न केला होता. तसाच प्रयत्न मुस्लीम समाजात काही अल्प प्रमाणात का होईना स्वातंत्र्यपूर्वकाळात झाला होता; परंतु स्वातंत्र्योत्तर काळात बहुतांशी त्याला जखडण्यात आले. हाच धागा धरून हमीद दलवाईंनी आपल्या समाजाच्या सुधारणेसाठी ज्या मूलभूत-पायाभूत निवेशाची आवश्यकता होती, तिच्या शोधार्थ भारतभ्रमण करण्याचा निर्णय घेतला. त्यांचा हा दौरा १९६७-६८ काळातील होता. हा काळ १९४७ ते ६५ भारत-पाक फाळणी व भारत-पाक पहिले युद्ध तसेच १९७१ भारत-पाक दुसरे युद्ध व बांगलादेश निर्मिती या दरम्मानचा होता. त्यांच्या प्रवास लेखनाचे विविध लेख निरनिराळ्या वृत्तपत्रांमधून आणि अंकांमधून प्रसिद्ध झाले होते. स्वातंत्र्योत्तर काळात धर्मनिरपेक्ष भारतीय समाजात, मुस्लीम समाजात एकात्मता घडवून आणणाऱ्या प्रवृत्ती नव्या पिढीत कितपत निर्माण झाल्या आहेत ? सद्यपरिस्थितीत मुस्लीम मनाच्या प्रश्नांचे स्वरूप कोणते आहे ? हे सर्व जाणून घेण्याचा या भारतभ्रमण भेटीचा मुख्य उद्देश होता. भारतीय मुस्लीम मनाला भारताच्या भौगोलिक व सामाजिक वैचित्र्यासारखी विचित्रता लाभली आहे तरीही ते एक वेगळेच मन आहे. त्या मुस्लीम समाजाचे मन जाणून घेणे हाही एक उद्देश या भारतभ्रमण भेटीचा होता.

इस्लामचे भारतीय चित्र

हमीद दलवाईंचे 'कानोसा - भारतातील मुस्लीम मनाचा' या पुस्तकातील पाचवा लेख, उत्तर भारतीय विशेषतः तदल्ली, स्कूल फॉर इंटरनॅशनल स्टडीज, देवबंद, अलिगढ मुस्लीम युनिव्हर्सिटी या भागांतील मुस्लीम मानसिकतेवर प्रकाश

टाकते. दलवाईंचेच 'इस्लामचे भारतीय चित्र' हे पुस्तक आणि त्यातील पहिले प्रकरण हेसुद्धा उत्तर भारतीय विशेषतः भारत-पाक युद्धादरम्यानचे काश्मीर आणि त्यांच्या पाकिस्तान प्रवासादरम्यान भेटलेल्या मुस्लिमांच्या मानसिकतेतील विसंगती दर्शवते. याच पुस्तकातील उर्वरित नऊ प्रकरणे, पूर्व भारताच्या पश्चिम बंगाल, आसाम आणि पूर्व पाकिस्तान (आताचा बांगलादेश) सीमेवरील मुस्लीम मनाचा आढावा घेते. तसेच काही हिंदू बुद्धिजीवी विचारवंतांच्या भेटीचा परामर्श सांगते.

हमीद दलवाईंनी भारतभ्रमण भेटीत ज्या लोकांशी संवाद साधला, त्यांची विभागणी प्रामुख्याने खालील प्रमाणे करता येईल.

१. सामान्यांमध्ये असे मुस्लीम ज्यांच्या मानसिकतेत प्रचंड विसंगती आढळते. दुसरे असे सामान्य मुस्लीम ज्यांची मानसिकता धार्मिक आणि परंपरागत पठडीत अडकून पडली आहे. आणि तिसरे सामान्य जन ज्यांची भूमिका पुरोगामी आढळते.

२. मुस्लीम सुशिक्षित, बुद्धिजीवी, पुरोगामी विचारवंतांमध्ये असाहाय्य मानसिकतेचे असे भेटलेले लोक ज्यांच्या विचार आणि कृतींमध्ये कमालीचे नैराश्य जाणवते. तसेच अशा लोकांनाही ते भेटले जे या बाबतीत खूपच कणखर आणि ध्येयवादी होते.

३. काही सुशिक्षित बुद्धिजीवी पुरोगामी हिंदू विचारवंत, ज्यांचे विचार स्वप्नाळू होते तर काही असेही भेटले ज्यांच्या विचारांत स्पष्टता होती.

४. सनातनी, परंपरावादी, जमातवादी मानसिकतेच्या लोकांचा दलवाईंना पहिल्यापासूनच तिटकारा होता, तरीसुद्धा त्यांना भेटले आणि अशा लोकांना साहाय्यकाच्या भूमिकेत मदत करणारे काही सुशिक्षित बुद्धिजीवीसुद्धा भेटले.

सामान्य मुस्लीम, ज्यांच्या मानसिकतेत दलवाईंना कमालीची विसंगती आढळते, त्यांच्याबाबत त्यांनी 'इस्लामचे भारतीय चित्र' या पुस्तकातील पहिल्याच प्रकरणात सविस्तर मांडणी केली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील रत्नागिरी जिल्ह्यातील एका खेडेगावात मुस्लीम नागरिकांनी मुस्लीम लीगची प्रस्थापना गावातील हिंदू दैवताला समारंभपूर्वक नारळ अर्पण करून केली. वास्तविक मूलतत्त्ववादी संघटनेच्या स्थापनेसाठी केलेल्या या कृतीत दलवाईंना चमत्कारिक विसंगती दिसते. सर्व भारतीय समाजाची पाळेमुळे त्याच भारतीय संस्कृती आणि परंपरेत किती खोलवर रुजलेली आहेत, हेच प्रकर्षाने जाणवते. १९६५ च्या भारत-पाक युद्धाच्या वेळी दलवाई काश्मीरमधील श्रीनगरात एका पंजाबी हिंदूच्या हॉटेलात उतरले होते. तिथला एक नोकर काश्मिरी मुस्लीम होता. हाजीपीरमधील पाकवरील

भारतीय फौजेच्या वर्चस्वाने तो बेचैन झाला होता. पाकिस्तानी काश्मिरी मुस्लिमांपेक्षा भारतातील काश्मिरी मुस्लिमांची परिस्थिती, त्यांचे जीवन, त्यांना भेटलेले स्वातंत्र्य या सर्वच बाबी सुसह्य असतानासुद्धा केवळ इस्लामच्या झेंड्याची होणारी वाताहत त्याला बघवत नव्हती. दलवाईंना त्याच्या भावनात्मक युक्तिवादापुढे त्यांच्या तार्किक दृष्टिकोनाचे मूल्य शून्यवत जाणवत होते. जुन्या परंपरागत धार्मिक कल्पनेपुढे त्या नोकराला सद्यपरिस्थितीत भेटणारे सुसह्य जीवन, व्यक्तिस्वातंत्र्यसुद्धा शून्यवत होते. उरी भागातील हाजीपीरला भारतीय सैन्याला जिद्दीने रसद पुरवणारे मुसलमान हमाल दलवाईंना दिसले. परंतु त्यांच्या देहबोलीवरून ते कमालीचे भावनाशून्य आणि अबोल चेहऱ्याचे भासले. दलवाई हे सर्व प्रथमच अनुभवत होते. दलवाईंनी १९६५च्या पाकिस्तान भेटीतील काही प्रसंग नमूद केले आहेत. उत्तर प्रदेशातील मुरादाबाद या आपल्या जन्मस्थानाला भेट देऊन परतीचा प्रवास करणारा एक पाकिस्तानी नागरिक, हिंदूंच्या पूर्वजांनी केलेल्या स्पृश्य-अस्पृश्यतेच्या नियमांचे समर्थन करताना दिसला. रेल्वेतून भेटणारे हिंदू पाणी-मुस्लीम पाणी या प्रथेला रद्द केल्याबद्दल त्याला वाईट वाटत होते. वास्तविक समतेच्या इस्लाम धर्माला मानणाऱ्या त्या व्यक्तीला हिंदू धर्माच्या जातीय संस्कारांबद्दल विलक्षण जवळीक वाटत होती. कराचीतील एका सरकारी अधिकाऱ्याची पत्नी पूर्वी गोव्यात वास्तव्यास होती. आपल्या मुलाच्या भयंकर आजारातील उपचारादरम्यान त्या डॉक्टरांना त्यांच्या 'आपण फारच काळजी करता' या प्रश्नावर 'शेवटी मी हिंदुस्तानी माता आहे' हे अभिमानास्पद सांगताना विसरतात की त्या सध्या पाकिस्तानी माता आहेत.

दलवाई वरील सर्व प्रसंग जीवनातील एक विसंगती म्हणून नक्कीच पाहत नाहीत. त्यांना तसे करणे म्हणजे आत्मवंचना करून घेणे वाटते. या विसंगतीची दुसरी बाजू म्हणा किंवा त्यामागील प्रेरणा समजावून घेण्याचा, मुस्लीम मनाचे सम्यक् स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न करणे दलवाईंना गरजेचे वाटते.

सामान्य परंतु परंपरागत मुस्लीम मानसिकतेत अडकलेले लोक दलवाईंना पश्चिम बंगालमधील पखुरिया या गावात, एका मुसलमान वस्तीत भेटले. या गावात हिंदी व उर्दूसुद्धा कोणाला बोलता येत नव्हती. गावच्या मौलानांना तेवढी अवगत होती. वस्तीत भयानक दारिद्र्याचे दर्शन घडत होते. पाचशे-सहाशे जणांची ती मुस्लीम वस्ती; परंतु प्रत्येक दंगलीत दुसऱ्या सुरक्षित हद्दीत आश्रय घ्यायचे आणि मागाहून शांतता प्रस्थापित झाली की परत यायचे. वस्तीतील मुस्लिमांमध्ये एकच मुलगा कॉलेजला जात होता. मुली प्राथमिक शाळेतसुद्धा जात नव्हत्या,

चौदा-पंधराव्या वर्षीच लग्नं होत होती. गावातील मदरशात दोनशे मुलं शिकायची. मदरशातील विषय असायचे अरबी, पर्शियन, इतिहास-भूगोल. पुढचे शालेय शिक्षण फार थोडे घ्यायचे. आठ वर्षात चार जण मौलवी झाले. धार्मिक शिक्षण महत्त्वाचे वाटायचे. मतदानाच्या वेळी मुस्लीम नेता सांगेल त्याला मतदान करायचे.

पश्चिम बंगालमधील लखुटिया गावात ठाकूर नावाच्या ब्राह्मणाने विधवा मुस्लिम स्त्रीशी आंतरधर्मीय विवाह केला होता. या विवाहाला गावातील मुस्लीम तसेच हिंदू समाजाने कडाडून विरोध केला. तरीही या सर्व विरोधाला न जुमानता ठाकूरने कोर्टात रजिस्टर पद्धतीने लग्न केले. पाच-पाच रुपयांत साक्षीदार गोळा केले. दलवाईंना, एखादा मनुष्य प्रवाहाविरुद्ध वागताना दिसला की त्याच्याविषयी कमालीचे कुतूहल आणि प्रेम वाटायचे. ठाकूरच्या बायकोच्या कपाळावरील भलामोठा कुंकवाचा टिळा दलवाईंना खास भासला. सामान्य जनांतील हे पुरोगामित्व दलवाईंनी अचूक हेरले.

सनातनी, परंपरावादी, जमातवादी मानसिकतेची दलवाईंना चीड होती आणि त्यांच्याबरोबर वाद-संवाद करण्यात रस नव्हता. काही लोकांना मैत्रेयीदेवींनी बंगाल भेटीत चर्चेसाठी बोलावले होते. युसुफ आणि कासम नावाचे गृहस्थ जमात-ए-इस्लामीचे समर्थक होते. जमात-ए-इस्लामीच्या रेडियन्स या मुखपत्रातील, 'भारतातील सगळे लोक, जेव्हा एकच धर्म स्वीकारतील तेव्हाच, हिंदू-मुस्लीम संघर्ष संपेल' तसेच 'मुस्लीम कायद्यात बदल तेव्हाच होतील जेव्हा त्या देशात मुस्लीम बहुसंख्य असतील, कारण असे सुधारणावादी कायदे करण्याचा अधिकार फक्त मुस्लीम स्टेटलाच आहे.' यावर प्रतिहल्ला करताना म्हटले, 'ब्रिटिशांनी मोहमेडन कायदा करून शरियत कायदा सुधारणा केली ती बळजबरीने, असा केलेला कायदा मान्य आणि जो बळजबरी करत नाही त्यांना मात्र विरोध, अशी बळजबरी करणे हेच सेक्युलर घटनेशी सुसंगत ठरेल.' अशाच मानसिकतेच्या, आसाममधील जमायते उलेमाचे नेते मौलाना फुरकान यांच्या पत्नींच्या मते आसाममधील सवय बेकायदा मुस्लीम घुसखोर, हे खरे आसामी मुस्लीम रहिवासी आहेत. हे त्यांचे जातियवादी मत मुस्लिमांबाबत कमालीची आत्मियता दर्शविते. दिल्लीतील भेटीत हमीद दलवाई देवबंदमधील पैगंबर मौलाना हुसेन अहमद मदनी यांच्या मदरशात गेले होते. तेथे त्यांना त्यांचे चिरंजीव असद मदनी जे जमायतुल उलेमाचे चिटणीस होते, त्यांचे बंधू भेटले. मदरशाच्या दरसे निझामीया (मुस्लीम धर्मपीठातील अभ्यासक्रम) जो औरंगजेबाने निजामुद्दीन या पंडिताकडून करून घेतला होता, यात काही बदल झाले आहेत का ? यावर असद बंधूंनी, 'कुराण हदीस मध्ये बदल होत नसतो'

असे कट्टरतेचे उत्तर दिले. मदरशात शिकणाऱ्या एका मुलाच्या प्रश्नावर दलवाई समोर बरेच प्रश्न उपस्थित झाले. मुलाने विचारले होते, 'रांचीला दंगा झाला, मुसलमानांवरचा हा जुल्म केव्हा थांबेल ? आमचे काय आहे ते आम्हाला देऊन का टाकत नाहीत ?' दलवाईंना कळत नव्हतं, यांना अजून काय द्यायचे ? पाकिस्तान तर दिले आहेच की. अशाप्रकारची शिकवण या मुलांना कुठून दिली जाते ? मशिदीतून, मोहरमच्या वाजेमधून, सामुदायिक नमाजनंतरच्या खुदब्यातून की राजकीय आणि धार्मिक पुढाऱ्यांच्या खाजगी बोलण्यातून.

पंडित नेहरूंच्या मृत्यूनंतर काही मुस्लिमांनी मशिदीत नमाज अदा करून त्यांना जन्नतची दुवा मागितली होती. त्यावर देवबंदमधीलच, मौलाना तय्यब यांनी फतवा काढून हा प्रकार इस्लामद्रोह असल्याचे म्हटले होते. 'ज्या कोणी हे केले आहे, त्यांनी आपण मुसलमान आहोत याची जाणीव ठेवलेली नाही. उलट जिवंतपणी नेहरूंनाच मुसलमान करायचे होते, जेणेकरून त्यांच्या हातून इस्लामची मोठी सेवा झाली असती.' दलवाईंनी मौलाना तय्यब यांच्यावर वैचारिक हल्ला करताना प्रतिप्रश्न केला, 'बिगर मुसलमानांना मदरशात शिकायला प्रवेश मिळेल का ? मुस्लिम स्त्रियांना येथे धर्म शिकता येईल का ?' यावर बोलताना त्यांनी नेहमीप्रमाणे कट्टरतेचे दर्शन घडविले. ज्याप्रमाणे इतर धर्मिय धर्मपीठात, इतरांना प्रवेश नसतो तसेच मदरशातही इतर धर्मियांना प्रवेश देता येणार नाही आणि स्त्रियांना आम्हाला मौलवी बनवायचे नाही. त्यांच्या मताप्रमाणे हिंदुस्थानात, नावाचे मुसलमान राहायचे की इस्लामदेखील राहणार हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कारण अकबराच्या काळात नावाचे मुसलमान राहिले होते तर औरंगजेबाच्या काळात इस्लाम धर्म आणि मुसलमान या दोन्हींचा उद्धार झाला होता. या संवादातून दलवाईंच्या विचारचक्राची गतीच थांबली. त्यांना त्या गुदमरलेल्या वातावरणातून लवकर सुटका झाली म्हणून हायसे वाटले.

अशा जातीयवादी लोकांना छुपे समर्थन देणारे बरेच सुशिक्षित बुद्धिजीवी दलवाईंना भारत-भ्रमण भेटीत सामोरे आले. असेच एक होते श्री. सालेजी, कलकत्त्याच्या ओरियंटल चेंबर ऑफ कॉमर्सचे चिटणीस. दलवाईंच्या, धर्मनिरपेक्ष भारतीय समाजात एकात्मता कशी साधता येईल या प्रश्नावर त्यांनी हिंदूंच्या धर्मनिरपेक्षतेवरच शंका उपस्थित करताना, मुस्लिमांनी अलग राहून संख्येच्या बळावरच आपले राजकारण उभारले पाहिजे असे मत व्यक्त केले. कलकत्त्यातील मुस्लीम विरोधी मुस्लीम. श्री. हसनुल रहमान यांच्यामते, परिवर्तनाला आवश्यक असणारी लवचिकता इस्लाममध्ये नाही, त्यामुळे पूर्व पाकिस्तानातील मुस्लीम

समाजात होणारे बदल त्यांना कल्पनेतील खेळ वाटतात. नवी दिल्ली येथील काश्मीर राज्यातील माजी खासदार श्री. महम्मद शफी हे दलवाईंना काश्मीरचे शेख अब्दुल्ला, जातीयवादी कसे नाहीत हेच पटवून द्यायचा प्रयत्न करत होते. अलीगढ मुस्लीम युनिव्हर्सिटीचे प्रा. तबलग्रामी यांच्या मते शिया मुस्लीम हेच फक्त पुरोगामी विचारांचे आहेत. तर प्राध्यापक तनझामी यांच्या मते मुस्लिमांनी त्यांच्या वेगवेगळ्या राजकीय संघटना बनवू नयेत.

सुशिक्षित, बुद्धिजीवी, पुरोगामी विचारांचे परंतु जातीयवाद्यांसमोर हतबल झालेले काही विचारवंतसुद्धा दलवाईंना भेटले. कलकत्ता महानगरपालिका काँग्रेस पक्षाचे प्रतोद, श्री. बद्रुदूजा यांचे चुलत बंधू, ज्यांनी दोनदा काँग्रेस पक्षातर्फे लढवलेली लोकसभेची निवडणूक हरली होती आणि प्रचंड आर्थिक हलाखीत होते. वैफल्यातून ते पाकिस्तानात जाण्याची इच्छा व्यक्त करत होते; परंतु आपल्या मुर्शिदाबाद जिल्ह्यातील मुसलमानांच्या भवितव्याबाबतच्या चिंतेने ते ग्रस्त होते. त्यांच्यामते हे मुस्लीम इतके लाचार बनले होते की आठ आण्यांसाठीसुद्धा हिंदू बनले असते. परंतु दलवाईंच्या मते बद्रुदुजा यांनी खुशाल पाकिस्तानात जायला हवे कारण मुसलमान त्यांच्या वाचूनही राहतील आणि नामशेष होणार असतील तर तेसुद्धा त्यांना वाचवू शकणार नाहीत. दिल्लीतील श्री. अनिसूर रहिमान, परच मे हिंद, या उर्दू साप्ताहिकाचे संपादक, जे स्वतः एक जुने स्वातंत्र्यसैनिक होते, यांना भेटायला दलवाई गेले होते. ते स्वतःला पाकिस्तानी वस्तीने वेढलेला हिंदुस्तानी समजत होते. मुस्लिमांविषयी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून त्यांच्या हिंदू मित्रांनी त्यांच्यावर टीका केली. त्यामुळे त्यांनी 'इन्होंने भी मारा' या शीर्षकाखाली त्यांच्या परच मे हिंद मध्ये अग्रलेख लिहिला होता. त्यांच्या परचम-ए-हिंदचा खप खूपच कमी असल्याचा आणि दावत, नशेमन, रेडियन्स अशा जमात-ए-इस्लामीच्या समर्थन करणाऱ्या दैनिकांचा वाचक वर्ग जास्त असल्याचा सल त्यांना होता. अलिगढ युनिव्हर्सिटीतील हिंदी तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक श्री. हसन यांच्यामते मुस्लिमांमध्ये जातीय प्रवृत्तींची वाढ होण्यास जीना कारणीभूत होते. तसेच सध्या पाकिस्तानात जाणीवपूर्वक नवीन पिढीला धर्मांध आणि जातीयवादी बनवले जात आहे.

हिंदू बुद्धिजीवींमध्ये ज्या व्यक्तींना दलवाई भेटले, त्यामध्ये कॅम्पस नावाच्या बंगाली साप्ताहिकाचे संपादक श्री. पन्नालाल दास गुप्ता होते. पन्नालाल यांनी पूर्व पाकिस्तानातील दंग्यांची माहिती काढण्यासाठी गुप्तपणे नवीन सरकार यांना तेथे पाठवले होते. सरकार यांच्या पुस्तकावरून बंगालच्या राजकीय क्षेत्रात बरीच

खळबळ माजली होती. पन्नालाल यांनी पाकिस्तानातील नियतकालिके आणि प्रकाशनांचे प्रदर्शन बंगालमध्ये भरवले होते. दलवाईंना ही त्यांच्या निकोप मनाचीच साक्ष वाटत होती. पश्चिम बंगालमधील पहिल्याच भेटीत मैत्रेयीदेवींनी दलवाईंना सावरकरवादी ब्राह्मण समजून हिंदुत्ववाद्यांवर हल्ला चढवला. त्यांच्यामते हिंदुस्थानात प्रबोधनाचा आरंभ हिंदू पुरताच मर्यादित होता. मुसलमान त्यापासून अलग राहिले. त्यांच्यात सुधारणा घडवून येण्याने हिंदू-मुस्लीम प्रश्नाची तीव्रता कमी होईल. दलवाईंनी त्यांना त्यांच्या स्टेट्समन मधील, समान नागरी विधेयकाचा पुरस्कार करणाऱ्या पत्राची आठवण करून दिली. पश्चिम बंगालचा मुसलमान अजूनही फाळणीपूर्व मनःस्थितीत वावरत आहे; परंतु काही तरुण वर्ग आणि काही प्रमाणात स्त्रिया यांच्यामध्ये बदल जाणवत असल्याचे मैत्रेयीदेवींनी नमूद केले.

दलवाईंना अपेक्षित असणारे कणखर आणि ध्येय्यवादी, सुशिक्षित, बुद्धिजीवी मुस्लीम विचारवंत भेटले. त्यामध्ये बंगालचे श्री. आयूब, कल्चरल कमिटीच्या 'क्वेस्ट' या मासिकाचे संपादक भेटले. या कमिटीने सी. आय. ए.चा पैसे घेतल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यांनी स्टेट्समनला त्याबाबत खुलासा करणारे पत्रही लिहिले होते. पूर्व पाकिस्तानातील बदलांविषयी आयूब यांना कमालीची आशा वाटत होती. दलवाईंच्या मते श्री. आयुब हे धर्मनिरपेक्ष आणि सखोल विचारवंत होते. आयूब यांचे सौ. गौरी आयूब यांच्याशी आंतरधर्मीय लग्न झाले होते. गौरी आयूब यांच्या गांधीवादी वडिलांनीसुद्धा या लग्नाला विरोध केला होता आणि बरीच वर्षे त्यांच्याशी कोणताही संबंध ठेवलेला नव्हता. आसाम परतीवेळी मैत्रेयीदेवींनी पंधरा-वीस मुस्लीम महिलांचा दलवाईंशी संवाद करून दिला. या स्त्रिया समानतेवर आधारित, स्त्री-पुरुष कायद्याच्या समर्थनात होत्या. त्यासाठी दलवाईंच्या मागणीनुसार, हजारो स्त्रियांच्या अर्जानिशी विविध राज्यांतील मुस्लीम महिलांच्या शिष्टमंडळाने राष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, पंतप्रधान यांना समान नागरी कायद्याची मागणी करायला हवी. आसाममधील श्री. बेझ बारुआ यांच्या मते, प्रत्येक समाजाच्या काही अंतःप्रेरणा असतात. त्या प्रेरणांना खतपाणी देणारे नेतृत्व तो समाज निर्माण करत असतो. या प्रेरणांचे स्वरूप बदलणे हाच यावरील खरा उपाय आहे. केवळ तर्कशुद्ध विवेकी आंदोलनांमुळेच सामान्यजनांना हे परिवर्तन घडवून आणता येईल आणि त्यासाठी शिक्षणाचा प्रसार हा एक मार्ग ठरू शकेल. दलवाई आसाम प्रदेश काँग्रेसचे माजी अध्यक्ष श्री. तय्यबुल्ला यांच्या कुटुंबाला भेटले. मुसलमान कुटुंबात परक्या माणसाबरोबर, अगदी मोकळेपणाने, परदाहीनपणे, सारे एकत्र येऊन गप्पा मारण्याचा दलवाईंना पहिल्यांदाच अनुभव

आला. या कुटुंबाने जातीय भावनांचा सर्वस्वी त्याग केलेला होता.

दिल्लीतील स्कूल फॉर इंटरनॅशनल स्टडीज येथील प्राध्यापक अनिरुद्ध गुप्ता यांचा आंतरधर्मीय विवाह नोंदणी पद्धतीने झाला होता. नेहरूंच्या धर्मनिरपेक्षतेला दाद देणारे सौ. खतीजा गुप्ता यांचे नातेवाईकसुद्धा या लग्नाच्या विरोधात होते. परंतु त्यांच्या वडिलांनी या लग्नाला साथ दिली. सौ. खतीजा गुप्ता यांच्या बहिणीनेसुद्धा आंतरधर्मीय विवाह केला होता. याच स्कूलमधील सईद मन्सूर या तरुणाशी दलवाईंची ओळख झाली. त्याच्या मते दिल्लीवासी मुसलमानांच्या प्रतिक्रिया म्हणजे कंप्लेंट हाऊसच. त्यांचे संभाषण हे फक्त मुस्लीम व्यक्ती, मुस्लीम इतिहास, मुस्लीम देश, पाकिस्तान आणि तारेकने जिंकलेला स्पेन यातच असे. त्याचा दैनंदिन जीवनाशी काहीही संबंध नसायचा. दिल्लीवासी मुसलमान कायम दंग्यांबाबत, सुरक्षिततेबाबत चिंताग्रस्त असतात. तरीही सईदच्या मते पदवीधर मुस्लीम तरुण कधीच बेकार बसले नाहीत. अलिगढ युनिव्हर्सिटीतील प्राध्यापक जमाल ख्वाजा, जे राज्यसभेचे नियुक्त सभासद होते, यांच्या मते मुस्लीम समाजात मार्टिन ल्यूथर निर्माण होणे गरजेचे आहे. तसेच प्रॉटेस्टंट पंथासारखा पंथ निघाल्याखेरीज इस्लामचे रूप बदलणार नाही.

सरतेशेवटी दलवाईंना, त्यांच्या विचारांना आणि कार्याला गती देणारे व्यक्तिमत्त्व प्राध्यापक हबीब महम्मद यांच्या रूपाने अलिगढ मुस्लिम युनिव्हर्सिटीत भेटले. इतिहास प्राध्यापक, नॅशनल प्रोफेसर, हिस्टरी काँग्रेसचे दोनदा अध्यक्ष आणि विरोधी पक्षाचे उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार, अशी प्राध्यापक हबीब यांची ओळख होती. त्यांनी दलवाईंना फक्त तीन प्रश्न विचारण्याची मुभा दिली. त्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना प्राध्यापक हबीब म्हणाले, 'अलिगढ विद्यापीठ मुस्लीम समाजात आधुनिक धर्मनिरपेक्ष विचार आणण्यात अपयशी ठरले आहे. अलिगढ आंदोलनाचे उद्देश, मुस्लिमांचे मागासलेपण दूर करणे होते. त्यासाठी सुशिक्षित बुद्धिवादी वर्ग निर्माण व्हायला हवा होता परंतु विभक्तवादी विचारांचाच वर्ग घडविण्यात आला. भारतातील हिंदू-मुस्लीम प्रश्नाला भारतीय गतेतिहास कितपत कारणीभूत आहे ? या दलवाईंच्या प्रश्नावर मुसलमानांनी इतिहासाला भूगोलाची बाजू असते हे कधी समजून घेतलेच नाही. तसेच मुस्लीम राजवट, त्यांची राजवट आणि हिंदू त्याकडे परकीय व आक्रमक विजेती राजवट या दृष्टीने पाहतात हे चुकीचे आहे, असे प्रतिपादन केले. भारतीय मुसलमान समाजात सुधारणा होणे आवश्यक आहे का ? यावर शरीयतच्या मर्यादांचा भंग करणारे क्रांतिकारक कायदे अद्याप बनलेले नाहीत आणि या समाजात सुधारणा घडवण्यासाठी कायदे बदलणे

महत्त्वाचे आहे, असे सूचकपणे सांगितले. 'चिराग' या पर्शियन शब्दाला, मुस्लीम अरबी शब्द मानतात तरीही अरबी भाषा परिपूर्ण कशी ? हे त्यांना कोडे पडते. निरोपाआधी प्राध्यापक हबीब यांनी भविष्यातील दलवाईंच्या कठीण मार्गक्रमणासाठी, 'कधीही, कोणत्याही परिस्थितीत धैर्य सोडू नका ! धैर्यच माणसाला अखेर त्याच्या उद्दिष्टाप्रत घेऊन जाते !' हा मोलाचा सल्ला दिला.

दलवाईंच्या मते मुस्लिमांशी संवाद साधताना, हिंदू धर्मियांच्या समक्षच निकोप वातावरणात चर्चा होणे गरजेचे आहे. कारण मुस्लिमांचे कोणतेही प्रश्न त्यांचे एकट्याचे नसून ते या देशात बहुसंख्य असलेल्या जनतेचे प्रश्न आहेत. त्यांची सोडवणूक व्हायची असेल तर ते त्या बहुसंख्य जनतेच्या सदिच्छेनेच सुटू शकतील.

हमीद दलवाईंनी भारतीय मुस्लीम समाजाची मानसिकता दोन भागांत विभागली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील आधुनिक परंतु लोकशाहीविरोधी (किंबहुना दहशतवादी) मानसिकता, ज्याचे नेतृत्व मुस्लीम लीगकडे होते. आणि दुसरी राष्ट्रवादी (परंतु सनातन, परंपरागत) परंतु लोकशाहीला मानणारी मानसिकता, ज्याचे नेतृत्व सनातनी, परंपरागत जनांच्या हाती होते. आपल्या लोकशाहीविरोधी आकांक्षा साध्य करण्यासाठी लीगवाल्यांनी, धर्माचे साधन वापरून सारा मुसलमान समाज आपल्यामागे संघटित केला आणि सनातन नेतृत्वाला हतबल केले. लीगच्या नेतृत्वाच्या कर्तबगारीपेक्षा या राष्ट्रवादी सनातन नेतृत्वातील उणीव याला कारणीभूत ठरली, कारण धर्माचे आधुनिक स्वरूप मुसलमान समाजासमोर हे नेतृत्व स्पष्ट करू शकले नाही. मुसलमान समाजाला हे राष्ट्रवादी नेतृत्व एकेकाळी वेगळ्या राष्ट्राच्या जाणिवेपासून परावृत्त करू शकले नाही, तर स्वातंत्र्योत्तर काळात उर्वरित भारतातील मुसलमानांना बहुजन समाजाच्या आशा-आकांक्षांशी ते समरस करू शकले नाही. याचे कारण ते सनातनी, परंपरागत होते हेच होय. या नेतृत्वाकडे वेगळेपणाची जाणीव होतीच. ते फक्त मुसलमान म्हणूनच स्वतःचा विचार करीत होते. मुसलमान समाजाचा वेगळेपणा त्यांना कायम ठेवायचा होता. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळी जातीय मागणीला विरोध करणारे हे नेतृत्व स्वातंत्र्योत्तर काळात स्वतःच जातीय बनल्याचे दृश्य आपल्याला दिसून येते. याचा परिणाम मुसलमान समाज, त्या जुन्याच परंपरागत, धार्मिक कल्पनेत गुरफटून राहण्यात झाला. कारण मुस्लीम मनाला विचार करण्याची सवय नव्हती. किताबी मजहब श्रेष्ठ असल्याच्या तथाकथित परंपरागत समजुतीत ते इतके गुरफटले गेले की, मुसलमानांचे जे-जे, ते चांगले असाच त्यांचा समज होऊन बसला. हा समज अद्यापही कायम आहे.

ही कोंडी फोडण्यासाठी दलवाईंनी परीक्षणाअंती काही उपाय सुचवले आहेत. त्यासाठी मुस्लीम समाजाच्या जुन्या धार्मिक, परंपरागत मनोवृत्तीला धक्के द्यावे लागतील, आघात करावे लागतील आणि हे सर्व परंपरागततेचा त्याग केलेल्या मुसलमानांनीच केले पाहिजेत. आपल्या खऱ्या अथवा काल्पनिक गाऱ्हण्यांचा बागुलबुवा उभा न करता, बहुजन समाजाच्या इच्छा-आकांक्षांशी समरस होण्याची प्रवृत्ती मुसलमान समाजात निर्माण होणे आवश्यक आहे. हिंदू समाजाच्या मनात असलेला अविश्वास कृतीने नष्ट केल्याने आणि त्यांचा विश्वास संपादन करूनच मुसलमानांना स्वतःचे रास्त स्थान प्राप्त करून घेता येईल. त्याचबरोबर सारा मुसलमान समाज हा १९४७च्या मनोभूमिकेत वावरत असल्याचे गृहीत धरण्याचा मूर्खपणा करूनही आपण त्यांच्या मनोवृत्तीत बदल घडवून आणू शकणार नाही. आज त्या समाजातही विचारमंथन सुरू झाले आहे. नेटकी, अचूक दिशा दाखवण्याचे सततचे प्रयत्न त्या समाजातील काही माणसे जिद्दीने करीत आहेत, त्यांची दखल घेतली गेली पाहिजे, नव्हे त्यांना बहुजन समाजाने पाठिंबा दर्शविला पाहिजे. अखेर सर्वांबद्दल अविश्वास दर्शविल्याने आपण काहीच साध्य करू शकणार नाही.

राज्यघटनेने आपला देश धर्मातीत केलेलाच आहे. या धर्मातीततेच्या आधारेच आपण पुढे पाऊल टाकू या. अल्पसंख्याक जमातींनी खरे म्हणजे धर्मातीततेचा प्रवाह अधिक बळकट केला पाहिजे, कारण त्यामुळे त्यांच्या हक्कांना आपोआपच न्याय्य संरक्षण लाभते. आपण सर्वांनी समान अधिकार आणि समान जबाबदाऱ्या घेतल्या पाहिजेत. या दृष्टीने दोन्ही समाजांना जवळ आणण्याच्या कामी सर्वांसाठी समान नागरी कायदा क्रांतिकारक ठरेल. शासन जर असा कायदा करीत नसेल तर शासनाला तो करावयास भाग पाडण्यात आले पाहिजे. मुसलमानांत आधुनिकतेची प्रवृत्ती निर्माण व्हावयास त्यामुळे फार साथ होईल. वेगळ्या भाषा, वेगळ्या शाळा, वेगळा शिक्षणक्रम या साऱ्यांना आता तिलांजली दिली पाहिजे.

राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान

हमीद दलवाईंच्या 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान' या मैलाचा दगड ठरलेल्या पुस्तकान्वये स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान श्री. पंडित जवाहरलाल नेहरूंची जी प्रतिमा साकारलेली आहे ती एका सच्च्या देशभक्ताची आहे. हा देशभक्त स्वातंत्र्यपूर्व काळ तसेच स्वातंत्र्योत्तर काळातही मानवतावादी दृष्टिकोनातून एकात्मिक, धर्मनिरपेक्ष, विज्ञानवादी, आधुनिक भारताची तार्किक स्वप्ने पाहत होता. त्या स्वप्नांना मूर्त स्वरूप देण्यासाठी फक्त अहोरात्र मेहनतच

घेत नव्हता तर त्यांच्या पूर्ततेसाठीच्या मार्गातील सर्व अडथळे दूर करण्याची अद्भुत कला त्याला अवगत होती. नेहरूंचे विचार व कृती सुस्पष्ट आणि एकत्रच मार्गस्थ होते. असंख्य दृश्य-अदृश्य मार्ग रोखणाऱ्या शक्तींचा अंदाज ते त्वरित ओळखत आणि त्याही आधी त्यावरील उपाय नेहरूंनी योजून ठेवलेला असे. या खडतर प्रवासात नैराश्य आणि अपयशाची चिंता त्यांच्या मनाला कधीच शिवली नाही. दलवाईंना एका मुलाखतीत एक प्रश्न विचारण्यात आला होता. समाजसुधारणेच्या खडतर प्रवासात आपणाला अपयशाची कधी चिंता वा भीती वाटत नाही का ? त्यासाठी आपण आपली मानसिक तयारी कशी कराल ? त्यावर दलवाईंनी प्रश्न विचारणाऱ्याला असा विचार मी आजपर्यंत कधी केलाच नाही, तरीही आपण दिलेल्या सल्ल्याबद्दल मी विचार करेन असे उत्तर दिले. यावरून दलवाई असो वा नेहरू ध्येयप्राप्तीसाठीची त्यांची निष्ठा दिसून येते. अशा या भारताच्या आधुनिक शिल्पकारावरती जशी स्तुतीसुमने उधळली गेली, तसे पराकोटीचे, हीन दर्जाचे, टीकेलाही लाजविल असे पूर्वग्रहदूषित आरोप करण्यात आले. नेहरूंच्या मुस्लीम समाजासाठीच्या धोरणांवर आणि भारत-पाक प्रश्नांवर त्यांच्या हयातीपेक्षा मृत्यूनंतरच मुस्लीम धार्जिणेपणाचे जास्त आरोप आणि बदनामी करण्यात आली. मग ते मुस्लीम कायद्यात न करण्यात आलेले बदल असो, उर्दू भाषिक प्रश्न असो, हैद्राबाद राज्याचे भाषावार विभाजन असो, स्वातंत्र्योत्तर काळातील मुस्लीम लीगच्या अस्तित्वाचा प्रश्न असो अथवा मुस्लीम राष्ट्रांसोबतचे परराष्ट्र धोरण असो, नेहरूंवर कायम मुस्लीम अनुनयाचा ठपका ठेवण्यात आला. भारत-पाक फाळणी तसेच काश्मीर प्रश्नाबाबत तर नेहरूंच्या विरोधकांनी केलेल्या कल्पित आरोपांना आजही भारताच्या एकात्मतेविरोधात शस्त्र म्हणून वापरण्यात येत आहे. भरीस भर म्हणून स्वतःला धर्मनिनरपेक्ष समजणारे नेते आणि त्यांचे पक्ष नेहरू द्वेषाने इतके ग्रासले की, आपण भारताच्या विकासाच्या कसे आड येतो, याचा त्यांना विसर पडल्याचे हमीद दलवाईंनी सप्रमाण दाखवून दिले आहे.

हमीद दलवाईंच्या मते पाकिस्तान निर्माण झाल्यानंतर भारतीय मुसलमानांना त्यांच्या अलग निष्ठांमधून बाहेर पडता यावे ह्यासाठी पद्धतशीर प्रयत्न नेहरूंनी केले. मुसलमानांना मानसिकदृष्ट्या बदलत्या परिस्थितीशी जुळते घेण्यास सोपे जावे म्हणून त्यांनी हे राज्य धर्मातीत राहील, या घोषणेचा पुन्हा पुन्हा उच्चार केला. आपल्या मंत्रिमंडळात मुस्लीम सहकाऱ्यांचा समावेश केला. दंगलींविरुद्ध खंबीर भूमिका सतत घेतली आणि क्रोकर यांच्या म्हणण्याप्रमाणे पात्रता नसतानाही अनेक मुसलमानांना मोठमोठ्या जागा दिल्या. परंतु हे सर्व करीत असताना ह्या

धोरणाला एक निश्चित दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले. घटना समितीच्या कामकाजाचे वृत्तांत आपण पाहिले की वेगळे मतदारसंघ रद्द करताना, नोकऱ्यांतील खास प्रतिनिधित्व नष्ट करताना आणि घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वात समान नागरी कायद्याचे उद्दिष्ट घालताना नेहरूंनी घेतलेल्या सुस्पष्ट भूमिकेचे दर्शन घडते. विशेषतः समान नागरी कायदा (कायदा होईल तेव्हा) मुस्लिमांना वगळण्यात यावे, या मुस्लीम लीगच्या मोहम्मद इस्माईल या सभासदाने मांडलेल्या उपसूचनेवर भाष्य करताना त्यांनी सामाजिक कायद्याची धर्माशी गल्लत करता कामा नये, असे उद्‌गार काढले.

१९५२ चा हिंदू कायदा आणि भारतीय मुस्लीम

नेहरूंवर आरोप करण्यात येतो की ते मुस्लीम धार्जिणे होते कारण १९५२ चा हिंदू कायदा करताना मुस्लिमांना विचारात घेण्यात आले नव्हते. मुस्लिमांचा कायदा बदलण्यात आला नव्हता. याचे स्पष्टीकरण देताना नेहरूंनी मेंदे या फ्रेंच पत्रकाराला दिलेल्या मुलाखतीत सांगितले आहे की मुसलमानांना त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यावर काही लादण्यात येत आहे असे वाटू नये म्हणून मुस्लीम कायदा बदलण्यात आला नाही. मुस्लिमांच्यात सुधारणा मागणारा वर्ग निर्माण झाल्याखेरीज हे पाऊल उचलण्यात अर्थ नव्हता, असे त्यांना वाटते. त्याआधीच नोंदणी विवाह विषयक कायद्यात बदल करण्यात आला आणि कोणाही व्यक्तीला तिचा धर्म पाळून नोंदणी पद्धतीने विवाह करण्याची सवलत उपलब्ध करून देण्यात आली. तत्पूर्वी या कायद्यात, मी कोणताच धर्म पाळत नाही. असे लिहून द्यावे लागत होते. त्यांच्या या निर्णयाविरुद्ध मुस्लीम लीगवाल्यांनी निदर्शने केली कारण त्यांच्यामते या कायद्यातील विवाहाच्या वेळी मुस्लीम धर्मविधी न करणे हा शरीयतचा भंग होतो. परंतु नेहरूंनी 'शरीयत कायदा मला कळतो' असे सडेतोड उत्तर दिले.

उर्दू भाषिक प्रश्न

उत्तर प्रदेशमधील मुसलमानांनी तसेच त्यांना समर्थन देणाऱ्या इतर राज्यांतील मुसलमानांनी उर्दू भाषेला दुय्यम राज्यभाषेचा दर्जा मागितला आणि सर्व भारतीय मुसलमानांचा हा भाषिक प्रश्न बनवला गेला. वास्तविकपणे उर्दूला दुय्यम राज्यभाषेचा दर्जा मिळविणे ही उत्तर प्रदेशच्या मुसलमानांची न्याय्य स्वरूपातील मागणी होती. एकीकडे उर्दूला नामशेष करू इच्छिणाऱ्या काही हिंदू हिंदीप्रेमींना उर्दूचे न्याय्य स्थान नाकारायचे होते, तर दुसरीकडे उर्दूला संपूर्ण भारतभर दुय्यम राज्यभाषेचा दर्जा देण्याची आततायी मागण्या करणारे मुसलमान होते. नेहरूंनी उर्दू ही भारतीय भाषा आहे, त्याला नष्ट करण्याची भाषा बोलणे चुकीचे

आहे. त्याला योग्य स्थान दिले पाहिजे असे वारंवार म्हटले. तर उर्दूला नामषेश करून उर्दूवर अन्याय करणार आहात का ? असा प्रश्नही त्यांनी उर्दूद्वेष्ट्या हिंदीवाल्यांना केला.

दलवाईंच्या मते उर्दू भारतीय भाषा आहे, ही वस्तुस्थितीच आहे आणि ज्यांची मातृभाषा उर्दू आहे त्यांना त्या भाषेतून शिक्षण घेता आले पाहिजे आणि त्या भाषेचा विकास करण्याची संपूर्ण संधी दिली गेली पाहिजे, ही भूमिका एका सच्च्या लोकशाहीवाद्याची आहे. परंतु नेहरूंची ही भूमिका मुस्लीमधार्जिणी असल्याचा ग्रह आततायी हिंदू हिंदीभाषिकांनी करून घेतला तर आततायी मुसलमानांनी नेहरूंच्या या भूमिकेचा, आपल्या अवास्तव मागण्यांना पाठिंबा आहे, असा गैरसमज करून घेतला. या दोहोंचा हा समज कायम राहावा याची दक्षता नेहरूंनीसुद्धा घेतली. हा नेहरूंच्या राजकारणी नीतीचाच भाग होता. वास्तविकपणे उत्तरप्रदेशच्या मुसलमानांना उर्दूसाठीच्या रास्त स्वरूपातील मागण्यांद्वारे हा प्रश्न यशस्वीरीत्या सोडवून घेता आला असता.

हैदराबाद राज्य विभाजन

१९६०च्या जमायते उलेमाच्या दिल्ली मुस्लीम परिषदेला नेहरूंनी परवानगी दिली होती. या परिषदेत सरकारवर ताशेरे ओढण्यात आले होते आणि मुसलमानांविरुद्ध जाणून-बुजून पक्षपात करण्यात येत असल्याचा आरोप नेहरू सरकारवर करण्यात आला होता. तरीही नेहरूंनी मुसलमानांना त्यांचे मतप्रदर्शन करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य देऊन त्यांच्या अनुकूल जाहीर भूमिका घेतली. मात्र त्यांच्या जातियवादी मागण्यांना कायम विरोध केला. समानतेच्या भूमिकेवरून मुसलमानांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचे धोरण नेहरूंनी अवलंबिले होते.

हैदराबादचे वेगळे वैशिष्ट्य आहे; या राज्याचे विभाजन होऊ नये असे नेहरूंनी म्हटले मात्र प्रत्यक्षात भाषावार पुनर्रचना समितीने हैदराबाद राज्याच्या विभाजनाची केलेली सूचना त्यांनी मान्य केली. मुसलमानांना या विभाजनाचा धक्का एकदम बसू नये, त्यांच्या भावनांची तीव्रता कमी व्हावी, विभाजनाचा आधीच सुगावा लागून त्यांना संघटित विरोध करण्याची संधी मिळू नये आणि मुस्लीम जातीयतेचा प्रश्न तीव्र होऊ नये याकरता नेहरूंनी घेतलेली ही भूमिका प्रामाणिकपणाची होती, असे दलवाईंना वाटते.

स्वातंत्र्योत्तर मुस्लीम लीग

हैदराबाद राज्याच्या विभाजनाचा प्रश्न असो वा मुस्लीम लीगच्या स्वातंत्र्योत्तर काळातील अस्तित्वाचा प्रश्न असो, नेहरूंनी घेतलेल्या दुहेरी

भूमिकांमुळे मुसलमानांना कायम गोड संभ्रमात ठेवता आले. तर हिंदुत्ववाद्यांना नेहरूंची ही भूमिका मुस्लीम अनुनय वाटतो.

मुस्लीम लीग भारतात समाप्त झालेली आहे, असे नेहरूंनी जाहीरपणे म्हटले होते. तरीही केरळातील पहिले कम्युनिस्ट सरकार पाडण्याच्या कामी त्यांनी मुस्लीम लीग बरोबर निवडणूक करार केले. निवडणूक जिंकल्यानंतर लीगने मंत्रिमंडळात जागा मागितली तेव्हा केरळ काँग्रेसने असा कोणताही ठराव केल्याचे आपल्याला माहीत नाही, असे सांगून लीगला मंत्रिमंडळात घ्यायला विरोध केला. तडजोड म्हणून त्यांना विधानसभेच्या सभापतीचे स्थान देण्यात आले. दक्षिणेतील मुस्लीम लीगच्या अस्तित्वाकडे थोडे-बहुत दुर्लक्ष करावयाचे आणि उत्तरेला मात्र दक्षता घ्यायची, असे धोरण नेहरूंनी अवलंबिले होते कारण उत्तरेतील जनतेच्या भावना अधिक तीव्र आहेत आणि तेथील लीगच्या उदयामुळे सामाजिक तणाव अधिक होणार होता हे ते जाणून होते.

दलवाईंनी नेहरूंचे धोरण परिस्थितीला कसे अनुसरून होते हे स्पष्ट केले आहे. मुस्लीम समाज किती चटकन राजकीय व्यासपीठावर एकत्र येतो हे त्यांनी जाणले होते म्हणून अनेकदा आपणच थोडीशी मुस्लीम जातीयवादी मागण्यांना अनुकूल अशी भूमिका घ्यावयाची, त्या भूमिकेचा उच्चार करायचा, मात्र त्या भूमिकेची अंमलबजावणी करायची नाही आणि अशाप्रकारे मुसलमानांना संभ्रमात ठेवून त्यांना भारतीय राजकारणात एक प्रबळ जातीयवादी राजकीय पक्ष निर्माण करण्यापासून परावृत्त करावयाचे, ही भूमिका नेहरूंनी घेतली होती.

अरब राष्ट्र परराष्ट्र धोरण

नेहरूंच्या मुस्लीम अनुनयाच्या आरोपांमध्ये, मुस्लीम राष्ट्रांबरोबरील परराष्ट्र धोरणावर आणि खास करून अरब राष्ट्रांबरोबरील परराष्ट्र धोरणावर बरीच टीका केली गेली. भारतीय मुस्लिमांना खूष ठेवण्यासाठी, पाकिस्तानचा रोष टाळण्यासाठी मुस्लीम अरब राष्ट्रांना परराष्ट्र धोरणात कायम झुकते माप दिले, तसेच खनिज तेल व्यापारातील मक्तेदारीमुळे मुस्लीम अरब राष्ट्रांपुढे नमते घ्यावे लागले असा आरोप नेहरूंवर कायम करण्यात येतो. पॅलेस्टाईन-इस्त्राईल वादाला विशेष करून यावेळी जास्त महत्त्व दिले जाते.

याबाबतीत नेहरूंची भूमिका हमीद दलवाईंनी सुस्पष्ट केली आहे. युरोपियनांपेक्षाही अरबांनी ज्यूंना निश्चितपणे उदारतेने वागवले आहे. ज्यूंचा पॅलेस्टाईनमध्ये भरणा होण्यास प्रारंभ होईपर्यंत अरब आणि तेथील स्थानिक ज्यू

यांचे संबंध सौहार्दाचे होते. युरोपियनांनी ज्यूंचे छळ केले, त्यांच्या कत्तली केल्या आणि आपल्या पापाचे क्षालन करण्यासाठी अरबांच्या डोक्यावर त्यांना लादले. आपल्यावर झालेल्या अत्याचाराला विसरून ज्यूंनी पॅलेस्टाईनमधून अरबांना हुसकून लावण्यात हिटलरची हुबेहूब नक्कल केली. नेहरूंनी स्वातंत्र्यपूर्व काळात अरबांना पाठिंबा देण्याचे धोरण आखले त्यावेळी ना इस्त्राईल राष्ट्र म्हणून प्रस्थापित होते ना भारत स्वतंत्र झाला होता. तोपर्यंत फक्त पाकिस्तान निर्मितीची चर्चाच होती. तसेच अरबांचे तेल अरबांच्या मालकीचे नव्हते. बरीचशी अरब राष्ट्रे ब्रिटिशांच्या अंकित होती. सुएझवर फ्रेंचांचा आणि ब्रिटिशांचा ताबा होता. नेहरू-गांधी तसेच काँग्रेसने जी जीवनमूल्ये मांडली त्या मूल्यांशी सुसंगत अशीच परराष्ट्रविषयक त्यांची भूमिका होती. यामध्ये मुस्लीम अनुनयाचा प्रश्नच नव्हता.

स्वातंत्र्योत्तर काळात अरबांकडे खनिज तेलाची अफाट नैसर्गिक साधनसामग्री आली होती आणि पाकिस्तान भारताविरुद्ध मुस्लीम राष्ट्रांची फळी तयार करण्याचा सतत प्रयत्न करीत राहिले. भारताचा अरबांबरोबरचा व्यापार वाढला आणि या देशांमध्ये पाच लाखांपेक्षा जास्त भारतीय उपजिविकेसाठी गेले होते. अशा परिस्थितीत अरबांना पाठिंबा देताना राष्ट्रीय हितसंबंध जपण्याचा सरकार विचार करीत असेल तर त्यात चुकीचे काय होते ? तसेही १९७४ च्या युद्धानंतर अरबांनी तेल निर्यातीला बंदी केली, त्यावेळी सामायिक बाजारपेठेतील युरोपियन राष्ट्रे आणि जपान यांनी अरबांना इस्त्राएल विरोधात पाठिंबा दिला. तेव्हा भारत सरकार अरब देशांच्या संबंधात चुकीची, भावनात्मक धोरण आखते ते अरबांचा आणि विशेषतः भारतीय मुसलमानांना खुश करण्याचा प्रयत्न असतो, हा जो भारत सरकारच्या धोरणाला विरोध करणाऱ्यांचा समज आहे तो चुकीचा आहे, असे दलवाईंना वाटते.

स्वातंत्र्योत्तर काळातील धर्मनिरपेक्षवादी राजकीय पक्ष

स्वातंत्र्योत्तर काळातील ज्या धर्मनिरपेक्षवादी, संविधान समर्थक राजकीय पक्षांनी नेहरूंच्या धोरणांना कायम विरोध केला त्यामध्ये उजवा स्वतंत्र पक्ष, समाजवादी पक्ष तसेच डावे कम्युनिस्ट पक्ष यांचा उल्लेख प्रकर्षाने करावा लागेल.

यामधील स्वतंत्र पक्ष हा कायम कम्युनिस्टांच्या विरोधात होता. भारताच्या तटस्थेच्या, रशियाशी होऊ घातलेल्या मैत्री संबंधाच्या नेहरूंच्या भूमिकेला स्वतंत्र पक्षाने कायम आक्षेप घेतला आहे. काश्मीर प्रश्न मिटला म्हणजे भारत-पाक संबंध सुरळीत होतील, त्यासाठी भारताला पाकिस्तानपुढे मैत्रीचा हात करायला हवा म्हणून पाकिस्तान प्रमाणेच अमेरिकेशी भारताने लष्करी करार करावयास हवा,

अशी स्वतंत्र पक्षाची मागणी होती. ती न करणे यास नेहरूंची फार मोठी चूक समजतात. अरब-इस्त्राईल वादामध्ये स्वतंत्रांनी कायम अरबांची बाजू धरली होती. त्याचवेळी ते हे विसरत होते की पाकिस्तान बरोबर इस्त्रायलनेसुद्धा अमेरिकेबरोबर करार केला होता. येथे उदारमतवादी परंपरेत वाढलेल्या स्वतंत्र पक्षाच्या नेत्यांनी पाकिस्तानच्या नेत्यांनासुद्धा उदारमतवादी समजण्यात फार मोठी चूक केल्याचे दलवाई निदर्शनास आणून देतात. अमेरिकेच्या स्वतंत्र समाजव्यवस्थेला आदर्श मानणाऱ्या स्वतंत्र पक्षाला एका गोष्टीचा विसर पडल्याचे दलवाई नमूद करतात. पाकिस्तान कधीही लोकशाहीवादी नव्हता कारण याच अमेरिकेने पाकिस्तान सरकार पदच्युत करून त्यांच्या पाकिस्तान राजदूताला पंतप्रधान केले होते.

समाजवादी पक्षाचा विशेषतः राम मनोहर लोहिया यांच्या विचारांचा हमीद दलवाईंवर विशेष प्रभाव होता. समाजवादी पक्ष १९४८ पर्यंत काँग्रेस पक्षामध्येच होता. डॉक्टर लोहिया यांनी नेहरू-पटेल यांना भारत-पाक फाळणीसाठी जबाबदार धरले आहे हे त्यांनी त्यांच्या 'गिल्टी मेन ऑफ इंडियाज पार्टिशन' या पुस्तकातून परस्पर विरोधी विधाने करून मांडले आहे. तसेच १९३७ साली काँग्रेसने उत्तर प्रदेश निवडणुकीनंतर मुस्लीम लीगला मंत्रिमंडळात दोन जागा न दिल्याने जीनांनी फाळणीचा मार्ग धरला, असाही युक्तिवाद ते या पुस्तकात करतात. जीनांच्या धमकावण्यांना काँग्रेसने बळी पडावयास नको होते, असे लोहिया यांचे म्हणणे होते. नेहरू-पटेल यांना सत्तेची हाव सुटल्यामुळे त्यांनी फाळणीला मान्यता दिली, असा हेत्वारोप ते करतात.

दलवाईंच्या मते डॉक्टर लोहिया यांनी भारत-पाक फाळणी तसेच हिंदू-मुस्लीम प्रश्न यांमागील ऐतिहासिक, सामाजिक आणि धार्मिक प्रेरणांची, प्रवाहांची कुठेच दखल घेतली नव्हती. अकबराने मोगल सत्तेला भारतीय रंग देण्याचा प्रयत्न केला म्हणून तो परकीय आणि मोगल घराणे भारतात स्थायिक झाल्यानंतर अनेक पिढ्यांनी औरंगजेब जन्मला म्हणून तो स्वकीय असे म्हटल्याने हिंदूंच्या मनावरील इस्लामच्या धर्मवादी धोरणांचे उमटलेले ओरखडे पुसले जात नाहीत. हा केवळ शब्दांचा खेळ आहे आणि डॉक्टर लोहियांसारखे राजकारणी ते करतात याचे दलवाईंना नवल वाटते. तसेच फाळणीला आमचा विरोध होता म्हणून त्याच्या ठरावाला पाठिंबा दिला नाही परंतु फाळणीला पर्यायी योजना देखील आमच्यापाशी नव्हती म्हणून आम्ही ठरावाला विरोध केला नाही, डॉक्टर लोहिया यांच्या फाळणीच्या पंधरा वर्षांनंतर काढलेल्या या जावईशोधावर दलवाई टीका करतात. जोपर्यंत भारत-पाकिस्तान फाळणी अस्तित्वात आहे तोपर्यंत हिंदू-मुस्लीम संघर्ष

कायम राहणार म्हणून फाळणी रद्द करण्याचा प्रयोग करण्यात यावा. त्यासाठी संयुक्त भारतनिर्मिती आवश्यक असल्याचे लोहिया नमूद करतात. परंतु दलवाईंच्या मते या योजनेबाबत लोहिया यांनी कोणतीही ठोस योजना सांगितलेली नाही. तसेच समाजवाद्यांनी ज्याप्रमाणे हिंदू जातीयवाद्यांवरती घणाघात केला, तशी मुस्लीम जातीयवाद्यांवर साधी टीकासुद्धा केलेली नाही. तरीसुद्धा नंतरच्या काळात समाजवाद्यांची बदललेली पाकिस्तानबद्दलची भूमिका दलवाई नमूद करण्यास विसरत नाहीत.

भारतातील कम्युनिस्ट पक्षाने गांधींना नेहमीच भांडवलदारांचे हस्तक आणि नेहरूंना त्यांच्या ताटाखालचे मांजर इत्यादी शिव्या दिल्यामुळे भारतीय जनता त्यांच्या मागे जाणे शक्य नव्हते. अगदी रशियन कम्युनिस्टांनी नेहरूंना साम्राज्यशाहीचे कुत्रे अशी शिव्यांची लाखोली वाहण्याचा तो काळ होता. गांधी-नेहरूंच्या द्वेषापोटी आणि जीनांना मिळणाऱ्या प्रचंड मुस्लीम जनमताने प्रभावित होऊन कम्युनिस्टांनी पाकिस्तान चळवळीला पाठिंबा दिला. लेनिनच्या प्रादेशिक स्वयंनिर्णयाचा पुरस्कार करून कम्युनिस्टांनी पाकिस्तानच्या मागणीला तेव्हा उचलून धरले होते.

परंतु दलवाईंनी कम्युनिस्टांच्या या धोरणावरती ताशेरे ओढले आहेत. लेनिनचा सिद्धांत हा प्रदेश व भाषा यांवर आधारित होता, धर्मावर नव्हे तर भारतीय कम्युनिस्ट पक्षाने हा सिद्धांत जीनांच्या धार्मिक राष्ट्रवादाच्या कल्पनेसाठी लागू केला, यातच कम्युनिस्टांचा फोलपणा दिसून येतो. पाकिस्तान चळवळीला पाठिंबा देऊन मुस्लीम जनमत आपल्याकडे आकर्षित करून घेता येईल, पाकिस्तानात पक्षाला स्थान प्राप्त होईल आणि नंतर कम्युनिस्ट क्रांती घडवून आणता येईल अशी वेडी स्वप्नेही त्यांनी बाळगली होती. परंतु मुस्लीम लीगवाल्यांना आणि जीनांना कम्युनिस्टांनी पुरते ओळखले नव्हते. पाकिस्तान निर्मितीसाठी जीनांनी कम्युनिस्टांचा उपयोग करून घेतला आणि त्यानंतर या पक्षावर बंदी घालून त्यांच्या नेत्यांना विनाचौकशी तुरुंगात टाकले, खोट्या खटल्याच्या संबंधात गुंतवले. पुढे तुरुंगातून सुटल्यानंतर ज्या नेहरूंना कम्युनिस्टांनी साम्राज्यशाहीचे कुत्रे म्हणून संबोधले होते, त्याच नेहरूंनी कम्युनिस्टांच्या नेत्यांना भारतात परत येण्याची परवानगी दिली. इतकेच नव्हे तर त्यांना भारतीय नागरिकत्वही बहाल केले.

भारताची फाळणी

नेहरूंवर असा आरोप करण्यात येतो की, भारताच्या फाळणीला सर्वस्वी

तेच जबाबदार होते आणि या फाळणीला त्यांनी विरोध केला नाही किंबहुना नेहरू फाळणीच्या समर्थनार्थच होते.

अँटलीच्या मजूर पक्षाच्या मंत्रिमंडळाने तीन सदस्यीय शिष्टमंडळ भारतात पाठवले. या शिष्टमंडळाने भारताची फाळणी टाळण्यासाठी दुबळे केंद्र सरकार असलेल्या भारतीय संघराज्याची चार गटांत विभागणी केली. पश्चिमेकडे पंजाब, सरहद्द प्रांत, सिंध आणि बलुचिस्तान या राज्यांचा मिळून ८० टक्के मुस्लीम बहुल असा एक गट; पूर्वेकडे आसाम आणि बंगाल या राज्यांचा मिळून ५० टक्के मुस्लीमबहुल असा दुसरा गट; इतर सर्व राज्यांचा मिळून ८५ टक्के हिंदुबहुल तिसरा गट आणि सर्व संस्थानांचा मिळून चौथा गट कल्पिण्यात आला होता. तसेच दहा वर्षांनंतर यातील कोणत्याही गटाला फुटून निघण्याचा अधिकार बहाल करण्यात आला होता तसेच दहा वर्षांनी अखंडपणे हा अधिकार बजावण्याची तरतूदही त्यात केली होती. या संघराज्याच्या सरकारला परराष्ट्र, दळणवळण आणि संरक्षण इतकेच अधिकार देण्यात आले होते. सुरुवातीला काँग्रेस आणि जीनांनी या योजनेला संमती दिली होती. जीनांच्या संमतीमागे भविष्यातील जास्त प्रदेश मुस्लीम राष्ट्रासाठी मिळणार हा होता. परंतु लीगच्या नेत्यांपुढे आणि मुस्लीम जनमतापुढे जीनांना माघार घ्यावी लागली कारण मुस्लीम जमातवाद्यांना दहा वर्षे वाट बघायची नव्हती. मुस्लिमांसाठीचे स्वतंत्र राष्ट्र त्यांना लगेचच हवे होते. गांधी-नेहरूंनी या योजनेतील धोके ओळखल्यामुळे सर्व राज्यांना प्रस्थापित तीन गटांत कायमचे सहभागी होण्याचे अथवा न होण्याचे आत्ताच ठरवावे, असे आवाहन काँग्रेसच्या अध्यक्षीय पत्रकार परिषदेतून नेहरूंनी केले. नेहरूंना आसाम बंगालपासून वेगळा काढायचा होता तसेच सरहद्द प्रांतसुद्धा वेगळा करायचा होता. अशारितीने गटांची ही योजना मोडून काढायची, असा त्यांचा प्रयत्न होता. नेहरूंनी आपल्या अधिऱ्या स्वभावानुसार ही विधाने केली आणि त्यामुळे मुस्लीम लीगने आधी स्वीकारलेली तीन सदस्यीय योजना मागावून फेटाळली, असे मौलाना आझाद सांगतात. परंतु नेहरूंच्या पत्रकार परिषदेच्या आधीच मुस्लीम लीगने ही योजना फेटाळल्याचे भारत मंत्र्यांना कळविले होते.

ही योजना फेटाळली गेल्यानंतर ब्रिटिश सरकारने वेव्हेल यांना बदलून लॉर्ड माऊंटबॅटन यांना फाळणीची योजना करण्यासाठी भारतात पाठविले. नेहरूंच्या धोरणानुसार या योजनेत पाकिस्तानला आता पंजाब, बंगालला विभाजून आणि सबंध आसामवर पाणी सोडणे भाग पडले. १९४२ ला राजाजींनी सुचवलेल्या मसुद्यातील हीच ती योजना होती जी जीनांनी आधी फेटाळली; परंतु माऊंटबॅटन

यांच्या दबावाखाली नंतर मान्य करावी लागली. भारताची फाळणी टाळण्यासाठी केलेले सर्व प्रयत्न निष्फळ ठरल्यामुळे नेहरू-गांधी व काँग्रेसला फाळणीला मान्यता द्यावी लागली. तसेच सुरुवातीपासूनच फाळणीला विरोध केल्यामुळे जीनांना हल्लीच्या छोट्या पाकिस्तानातच समाधान मानावे लागले. फाळणीच्या वेळी लोकसंख्येची अदलाबदल न करण्याच्या गांधी-नेहरूंच्या भूमिकेवर आक्षेप घेतला जातो; परंतु या परिस्थितीत पाकिस्तानातून ज्या पद्धतीने हिंदूंची हकालपट्टी करण्यात आली, तशी भारतातून मुसलमानांची करावी, असे म्हणणाऱ्यांनी त्यानंतर होणाऱ्या कत्तली आणि दंग्यांचा विचारच केलेला नव्हता, असे दलवाईंना वाटते.

नेहरू आणि काश्मीर

हमीद दलवाईंनी नेहरूंवरील अजूनपर्यंत न मिटलेल्या सर्वात मोठ्या आरोपाची दखल घेतली आहे. नेहरूंच्या बोटचेपी धोरणामुळे अजूनही काश्मीर प्रश्न प्रलंबित राहिला, वल्लभभाई पटेल असते तर त्यांनी इतर संस्थानांप्रमाणेच काश्मीर संस्थानाचा प्रश्न निकाली लावला असता, असा आरोप नेहरूंचे टीकाकार नेहमीच करतात. काश्मीरबाबत नेहरूंनी सार्वमताचे आश्वासन दिल्यामुळे हा प्रश्न प्रलंबित राहिला, तसेच शस्त्रसंधी केल्यामुळे उरलेला काश्मीर भारताला गमवावा लागला असे मानणारा एक वर्ग आहे. काश्मीर ही नेहरूंची मातृभूमी होती आणि म्हणूनच त्या प्रश्नाकडे ते भावनात्मक दृष्टिकोनातून पाहत होते, असाही आरोप नेहरूंवर केला जातो.

हमीद दलवाईंनी या सर्व आरोपांचे खंडन करताना मुद्देसूदपणे मांडणी केली आहे. वल्लभभाई पटेल हे संस्थानविषयक खात्याचे मंत्री होते. ते स्वतः काश्मीरच्या भारतातील सामिलीकरणाच्या विरुद्ध होते. आपण पाकिस्तानात सामील व्हावे परंतु लवकर निर्णय घ्यावा असा निरोप त्यांनी काश्मीरच्या महाराजांना पाठवला होता. स्वतः काश्मीरच्या महाराजांनासुद्धा भारतात सामील व्हायचे नव्हते तर स्वतंत्र राज्य हवे होते. वल्लभभाई पटेल संस्थानविषयक खात्याचे मंत्री होते याचा अर्थ मंत्रीमंडळाचा कारभार संयुक्त जबाबदारीच्या तंत्राने चालत नव्हता किंवा पंतप्रधान नेहरूंशी चर्चा न करताच वल्लभभाई निर्णय घेत होते असे मानणे हास्यास्पद होते. काश्मीर प्रश्नावर वल्लभभाई, माऊंटबॅटन यांच्याशी नेहरू चर्चा करीत होते आणि वल्लभभाई देखील इतर संस्थानांविषयी नेहरूंशी चर्चा करत होते.

फाळणी करताना ब्रिटिशांनी संस्थानिकांना सार्वभौम हक्क दिल्याची घोषणा केली व स्वतंत्र राहावयाचे की भारत किंवा पाकिस्तान या राष्ट्रांमध्ये सामील

व्हावयाचे हे ठरवण्याची मुभा दिली. ब्रिटिशांनी हा जो सार्वभौमत्वाचा अधिकार संस्थानिकांना दिला तो त्यांचा नसून प्रजेचा आहे कारण जनता सार्वभौम असते अशी भूमिका काँग्रेसने घेतली. जीनांनी मात्र संस्थानिक सार्वभौम आहेत, त्यांनी स्वतंत्र राहायचे की भारतातून पाकिस्तानात सामील व्हावयाचे हे ठरवायचे आहे, असे लीगच्या वतीने सांगितले. काँग्रेसने संस्थानातील जनता नेहमी आपली मानली आणि जनतेच्या न्याय्य हक्कांना पाठिंबा दिला. मुस्लीम लीगने शक्यतो संस्थानातील जनतेच्या न्याय्य हक्कासंबंधी बोलायचे टाळले कारण जनतेच्या हक्कांवर बोलायचे तर हैदराबाद, जुनागड, भोपाळ इत्यादी मुस्लीम संस्थानांच्या विरुद्ध परंतु हिंदुबहुल जनतेच्या हक्कात भूमिका घ्यावी लागली असती. संस्थानिक सार्वभौम आहेत, असे म्हणून भारताच्या विघटनाच्या जीनांनी घेतलेल्या पवित्र्यापुढे, जनता सार्वभौम आहे, ही ढाल नेहरूंनी पुढे केलेली आहे आणि जीनांचे सारे मनसुबे धुळीला मिळवले आहेत. येथे नेहरूंनी जी भूमिका घेतली ती काँग्रेसच्या उच्च आदर्शांशी सुसंगत होती. त्याच बरोबर ही भूमिका घेऊनच भारताचे विघटन टाळता येणार होते. देशांतर्गत प्रदेशातील बहुतेक संस्थानांत बहुतांश प्रजा हिंदू होती आणि ती भारतात सामील व्हायला उत्सुक होती. प्रश्न फक्त काश्मीरच्या संस्थानाचा होता. तिथे प्रजा मुसलमान होती आणि म्हणूनच काश्मीच्या सामिलीकरणाच्या करारावर तेथील जनतेच्या नेत्यांच्या सह्या घेण्यात आल्या आणि सार्वमताचे आश्वासन दिले गेले. काश्मीरच्या हिंदू महाराजांच्या कायदेशीर सामिलीकरण करण्यावर आपण भर दिला असता तर हैदराबाद, भोपाळ, जुनागड आणि इतर असंख्य मुस्लीम संस्थानिक पाकिस्तानात सामील झाले असते आणि भारताचे विघटन करण्याचे जीनांचे मनसुबे सफल झाले असते, हे नेहरूंचे टीकाकार लक्षात घेत नाहीत व सार्वमताच्या आश्वासनावर चुकीची टीका करतात. काश्मीरमध्ये भारताच्या फौजा जाईपर्यंत संस्थानिक सार्वभौम आहेत, ही जीनांची भूमिका कायम होती. मात्र नंतर ते सार्वमताची भाषा बोलू लागले. संस्थानिकांच्या सार्वभौमत्वाच्या नावाखाली जीनांनी जुनागडवर कब्जा करून पाहिला; तसेच हैदराबाद, भोपाळ या संस्थानिकांनाही छुपा पाठिंबा दिला होता. परंतु शेवटी जीनांच्या पदरी अपयशच आले. ऑक्टोबर १९४७ मध्ये सामिलीकरणाचा करार करण्यात आला. त्यानंतर काश्मीरमध्ये पाकिस्तानच्या हल्लेखोरांना मागे रेटण्यासाठी भारताने श्रीनगरला सैन्म पाठवले. दोन महिन्यातच श्रीनगरपासून तीस मैलांपर्यंत भारतीय सैन्याने मजल मारली; परंतु उरीच्या वरचा बराचसा प्रदेश जिंकता आला नाही. काश्मीरमधील हे युद्ध जवळपास एक वर्ष तीन महिने चालले. बिकट दळणवळण असलेल्या या

प्रदेशात आता दीर्घकाळ युद्ध चालेल, भारताला तेथे सर्व शक्ती पणाला लावावी लागेल आणि तरीही सर्व प्रदेश जिंकता येईल असेही नाही, असे वाटल्यावरून नेहरूंनी अखेरीला शस्त्रसंधीचा स्वीकार केला; परंतु सार्वमत तर अखेरपयंत त्यांनी घेतलेच नाही.

हमीद दलवाईंनी सामिलीकरण झाल्यानंतरच्या काश्मीर बाबतच्या नेहरूंच्या भूमिकेचे समर्थनच केलेले आहे. काश्मीर प्रश्न हा नेहरूंच्या दृष्टीने मुस्लीम प्रश्नाचा एक भाग होता. मुस्लिमांच्या वेगळ्या राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला प्रभावी आव्हान या दृष्टीनेच नेहरूंनी या प्रश्नाकडे पाहिले आहे. काश्मीरमधील बऱ्याच मुस्लीम नेत्यांशी नेहरूंची कायम जवळीक राहिली आहे. त्यामुळेच मुस्लीम कॉन्फरन्सचे नाव बदलून नॅशनल कॉन्फरन्स केले गेले, हा नेहरूंच्या मुस्लिमांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्याच्या धोरणाचाच एक भाग होता. त्याचबरोबर भारतातील इतर राज्ये ज्या रीतीने स्वेच्छेने संघराज्यात आली, किंबहुना संघराज्यातील त्यांचे स्थान गृहीतच धरण्यात आले होते तसे काश्मीरबाबत झालेले नाही. काश्मीर वेगळ्या पद्धतीनेच भारतात आले आहे, याची जाणीव ते बाळगून होते. भारतातील राष्ट्रवादाची जडण-घडण अजून दुबळी आहे, अनेक जनसमुदायांपर्यंत राष्ट्रीयत्वाची जाणीव पोचलेली देखील नाही, हे ते ओळखून होते.

(लेखक अभियंता असून मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्ते आहेत.)

■ ■

ललित

सबसे बड़ा गुनाह

● नूर जहीर

फरज़ानाने उन सोलह औरतों पर नज़र दौड़ाई जो जनाना जेल से इस कमरे में लाइ गई थी। फिर उसने नज़र भरकर उस नौजवान डॉक्टर और डॉक्टरनी को देखा जो बीच वाली कुर्सी और स्टूल पर बैठे थे। वह तंज़ से मुस्कुराई और अट्ठारह कप से भरी ट्रे उसने आगे बढ़कर उनके पास मेज़ पर रख दी।

महिला डॉक्टर बोलीं, ''सबको दो। हम सब साथ ही चाय पीएंगे।''

फरज़ाना फिर मुस्कुराई - साथ ! चाह पीने में, खाना खाने में, इसमें तो इंसान को बड़ी आसानी से साथ मिल जाता है। इससे.जरा भी बड़े काम में साथ चाहो तो लोग कैसे दामन झटक लेते हैं। वह गोल रखी हुई प्लास्टिक की कुर्सियों में सबसे पीछे बैठ गई। उसके सामने और अगल बगल, उम्र क़ैद काट रही औरतें थीं। सबकी सब खुनी, सबकी सब अकेली !

कुछ दिन पहले आई जेलर ने जेल में नए तजुर्बे करने शुरू किये थे। यह भी कोई नई क़िस्म की थेरपी थी। जुर्म साबित हो जाने के बाद, सजा काट रही औरतों के लिए। ग्रुप थेरेपी के दौरान उन्हें अपनी कहानी सुनाकर खुद यह तय करना था कि उनके जीवन में उनके हिसाब से सबसे बड़ा जुर्म क्या था ? वह - जिसकी वे सजा काट रहीं थीं या कोई और ? जेलर ने बताया था कि इस ग्रुप थेरेपी से उन्हें जेल की सजा के बाद जीवन शुरू करने में सहायता मिलेगी। छूटने के बाद जीवन ? एक दिन से दुसरे दिन जीते रहने में सहायता की क्या ज़रूरत !

बातचीत शुरू हो चुकी थी। डॉक्टर साहब समझा रहे थे कि कोई ज़बरदस्ती नहीं है। जो जितना बताना चाहे उतना ही बताए; अपने जुर्म की बात न करना चाहे तो दूसरों की दास्ताने सुने, ताकि खुद अपने किये का सामना कर सके। तीन-चार औरतें सुना चुकी थीं। दो-चार उनकी कहानी पर, कुछ अपनी आपबीती पर सोचकर रो रहीं थीं। फरज़ाना को यह सब ढकोसला अच्छा नहीं लग रहा था। चाय एक घूँट में गले से उतारकर उसने एक हाथ से कप ज़मीन पर रखा और दूसरा हाथ हवा में उठाया।

डॉक्टर की आँखों में जरा सी हैरानी आई, फिर उसने अपने साथी की तरफ मुड़कर देखा। अभी तक औरतों को कुछ भी कहने के लिए बहुत समझाना

और उकसाना पड़ा था।

डॉक्टरनी उसका हौसला बढ़ाती हुई बोलीं, ''तुम खुद ही अपनी बात कहना चाहती हो, यह तो बड़ा अच्छा है।''

''कहना तो है ही, तो पहले ही कहकर छुट्टी पा लूँ। यह सब चोचले मुझे पसंद नहीं। मेरी कहानी तो आपको जेल रिकॉर्ड से, मेरी केस हिस्ट्री पढ़कर भी मिल जाती, फिर मेरे मुंह से सुनने से क्या बदल जाएगा ? फिर भी, जब आप इसीलिए आएं हैं तो सुनिए -

''मैं चौदह साल की थी जब मेरा निकाह हुआ। मियां महमूद अहमद की साइकल मरम्मत की दूकान थी, बरेली में अपना मकान था। मैं पढ़ी लिखी तो नहीं थी हाँ, कुरआन ज़रुर पढ़ाया गया था। घरके पासके मदरसे में दो साल दीनियाद पढ़ी थी और तमीज तहज़ीब सीखी थी। जब ग्यारह साल की हुई तो मौलवी साहब घर आकार अब्बा को हिदायत कर गए। उनका हुक्म न मानने का तो सवाल ही नहीं पैदा होता था। मुझे बुर्का पहना दिया गया। मदरसे की उस्तानी जी भी बार-बार यही समझाती थी.... औरत वही इज़्ज़तदार होती है जिसे दुनिया की शर्म होती है। औरत की इज़्ज़त या तो घर में महफूज होती है या बुर्क़ेमें। जो औरत घर के बाहर, बुर्के केबिना निकल गई वह तो समझो कोठे पर जा बैठी। बुर्क़ा पहनी हुई औरत को मर्द खुद ही इज़्ज़त की नज़र से देखते हैं। घर की इज़्ज़त और औरत की आबरू है बुर्का।

''मुझे अच्छे कपड़ों का बहुत शौक़ था। पड़ोस के एक घर में सिलाई स्कूल था। वहां मैंने एक साल सिलाई सीखी थी। किसी भी तरह का डिज़ाइन देखकर ही नक़ल कर डालती। जब बुर्का पहनना पड़ा तो कितना रोई थी मैं। यह क्या कि इतने अच्छे कपडे बनाकर पहनो, बनो सँवरो और ऊपर से एक काला बोरा सर से पैर तक ओढ़ डालो। मुहं पर क्रीम, आँखों में काजल, होटों पर लिपस्टिक लगाओ, कानोमें बुँदे, गले में माला पहनो और सबके ऊपर नक़ाब दाललो। शुरू शुरू में तो ऐसा जी चाहता था की फाड़कर चिन्दी चिन्दी कर डालूं मुए बुर्क़े को। फिर धीरे धीरे आदत हो गई। कुछ महीने बाद तो अगर बुर्का पहने बगैर आँगन के बाहर झाँक भी लेती तो ऐसा लगता जैसे नंगी बाहर आ गई। यह डर भी दिल में बैठ गया की अगर कहीं बुर्क़े के बिना निकली तो न जाने क्या हो जाए ? शायद ये मर्दुए मुझे उठाकर ले जाएँ, मेरी इज़्ज़त लूट लें, मुझे किसी कोठे पर बेच आयें। और भी क्या क्या ख़याल दिल में घर कर गए। जब कहीं बाहर जाती और खैरियत से घर वापिस आ जाती तो बुर्क़े का कितना शुक्र मनाती जो

मुझे इज़्ज़त आबरू समेत, सही सलामत घर ले आया जहाँ मैं बिलकुल सुरक्षित हूँ।

''मैं अपने बुर्के से मोहब्बत करने लगी। वह मेरा मुहाफ़िज़ था, मुझे समाज में सम्मान दिलाता था, मेरा शरीर और मेरी इज्जत उसी की वजह से महफ़ूज़ थे। जब शादी तय हुई तो मैंने ज़िद करके अपने लिए नया बुर्का बनाया। उसके गले और आस्तीनों पर नाज़ुक कशीदा किया, नक़ाब के चारों तरफ महँगी वाली लेस लगाईं और सिरपर आने वाले गोल पर सलमा सितारे का काम किया। जितना हो सकता था बुर्क़े को सजाया ताकि लोग अंदर वाले कपड़ों को न सही, कम से कम बुर्क़े को ही देखकर तारीफ करें। और सचमुच हुआ भी ऐसा। मेरे दहेज़ में आये सब कपड़ों से ज़्यादा, औरतें उस बुर्क़े को ही उलट पुलट कर, खोल खोल कर देख रहीं थीं। दो तीन बड़ी बूढ़ियों ने तो मुंह दिखाई के ही वक़्त ऐसा बुर्का अपनी बेटी या बहू के लिए बनाने की फरमाइश भी कर डाली।

''मेरे शौहर ने मुझसे शादी इसलिए की थी क्योंकि उनकी माँ ने अक्सर बिमारी से मुस्तकिल बिमारी की मंज़िल तय करके खाट पकड़ ली थी। लेकिन बीवी घर में हो तो उसका इस्तिमाल तो होना ही चाहिए, मैं घर का सारा काम करती, सास की देखभाल और दवा दारु करती, दो छोटे देवरों और बाकी सबको खाना पका कर खिलाती, सबसे छोटी ननन्द को नहलाती, तैयार करती, रात को जब थक कर जिस्म टूट रहा होता तो दो तीन बार मियाँ को सवारी भी करवाती। बाहर निकलना तो दूर के ख्वाब हो गए। दिल मसोसकर मैंने नया बुर्का अखबार में लपेटकर, संदूक में सबसे नीचे रख दिया।

''छह साल की खिदमत लेकर सास अल्लाह को प्यारी हो गई। वैसे अच्छि थीं बेचारी लेकिन उस वक़्त तो यही लगा था कि चलो एक अज़ाब से तो जान छूटी। लेकिन सास का मरना था कि ससुर का घर में पड़े रहना शुरू हो गया। उनकी पान, बीड़ी सिगरेट की दूकान थी। सुबह सबसे पहले वही घर से निकल जाया करते थे और रात को ही लौटते थे। अब जब देखो घर पर ही बने रहते। पहले पहले तो मैं समझी सास के ग़म में घुले जा रहे हैं बेचारे।.फिर लगा, अजीब नज़रों से देख रहें हैं। कभी कुछ लेने देने में बिना वजह हाथ छू देते, उंगली दबा देते। सास जब तक थीं तब तक मुझे 'बहन' पुकारा करते थे। अब नाम लेकर बुलाने लगे, कभी कभी नाम छोटा करके 'फ़रज़ू' पुकारते। मैं पूरा वक़्त १३-१४ साल की ननन्द को साथ रखती। शादी को आठ साल गुज़र गए और मेरे तीन बच्चे हो गए। ननन्द का भी ब्याह हो गया। बड़ा देवर पान की दूकान पर बैठने लगा,

छोटा देवर और मेरे दो बच्चे सुबह स्कूल चले जाते। छोटे बच्चे के साथ अब मैं घर पर अकेली होती। एक दो बार मैंने महमूद से कहा भी की मुझे अब्बा से डर लगता है। पर उन्होंने या तो समझा नहीं या समझना चाहा नहीं। बस इतना कहकर ताल दिया की अपने बाप जैसे ससुर से भला डर कैसा ?

''फिर मैंने एक चाल चली। बड़े देवर की शादी तय कर दी। जब देवरानी आ जायेगी तब मुझे घर पर अकेले नहीं रहना पड़ेगा। वह सामने होगी तो इन्हे इस तरह की हरकते करने की हिम्मत नहीं पड़ेगी। लड़की वालों के यहाँ मुझे मिठाई वगैरह लेकर जाना था। सोचा इससे बेहतर मौक़ा कब मिलेगा। इतने अरमानो से बनाया हुआ बुर्का आज नहीं तो कब पहनूँगी ? संदूक खोलकर बुर्का निकाला, लेस की किनारी, जॉर्जेट के नक़ाब वाला, एक बार पहनकर देख रही थी कि ठीक से आता भी है या नहीं। आईने के सामने पहनकर नक़ाब उल्टा ही था कि ससुर कमरे में घुस आये और पीछे से मुझे दबोच लिया। मैंने हाथ-पाँव मारे, छटपटाई, मगर उन्होंने मुझे उठाकर पलंग पर फेंक दिया। पलंग की पट्टी से सर इतनी ज़ोर से टकराया कि मुझे चक्कर आने लगे। और वह चिल्लाने लगे.... ''सजती है, बन-संवारकर मुझे लुभाती है, छिनाल कहीं की।''

''मैं मिन्नत खुशामद करती रही.... ''नहीं अब्बा, छोड़ दीजिये अब्बा ! मैं कहाँ सज रहीं हूँ ? मैं तो बुर्का पहन रहीं थी, मैं आपकी बेटी हूँ अब्बा !'' आधा घंटा बाद वह अपनी हवस शांत करके बाहर चले गए। मैं टूटा जिस्म लिए उठकर ग़ुसलख़ाने में जा रही थी कि पड़ोस की एक औरत आ गई। उसी ने संभाला, हाथ मुंह धुलाया और यह सलाह भी दी की मस्जिद के इमाम के पास जाऊं।

''इमाम साहब ने मेरी बात तो कम सुनी, हाँ अपने सवाल बहुत पूछे..... पीछे से पकड़ा था ? कहाँ से, कमर से या छाती से ? छातियां पकड़ी थीं या मसली थीं ? चूमा था, कहाँ कहाँ ? कपडे कौन से फाड़े ? कमीज या सलवार ? पहले ऊपर वाले या नीचे वाले ? सलवार के नीचे कुछ पहने थीं या नहीं ? कच्छा पहने थीं; कैसी ? घुटनो वाली या तिकोनी वाली ?.......

''उसकेबाद उन्होंने मुझे घर जाने को कहा और महमूद और मेरे ससुर को बुलवा भेजा। तीनो में क्या बात हुई यह तो पता नहीं मगर अगले दिन मेरे नाम पर फ़तवा जारी हो गया। मुझे ससुर के साथ निकाह करना होगा और अपने शौहर को बेटा मानना होगा ! और अपने तीनो बच्चोंको, जिन्हें नौ-नौ महीने कोख में रखा, उन्हें क्या समझूँ ? अपने बच्चे या अपने पोते ? लेकिन मुझमे भी न जाने कहाँ से हिम्मत आ गई। मैंने भी सरकारी कोर्ट जाने का फैसला कर लिया।

''तीनों बच्चों को साथ लिए मैंने कोर्ट का दरवाज़ा खटखटाया और अपने ससुर को गिरफ्तार करवाया। डेढ़ साल तक मुक़दमा चला। अखबारवालों ने भी कितना लिखा। कई ग़ैरसरकारी संस्थाएं भी साथ खड़ी हो गईं। उनमे से कुछने महमूद को समझाया। वह भी बाप के खिलाफ मेरा साथ देने को राज़ी हो गए। मुझे विश्वास हो गया कि मुझे न्याय मिलेगा, अब मंज़िल दूर नहीं है। और हुआ भी ऐसा; दस साल की क़ैद हुई उसे। मैं खुश थी, अब मैं घर लौट सकतीं हूँ, अपने बच्चों के साथ, शौहर के पास लौट कर फिर से जिंदगी शुरू कर सकतीं हूँ।

''मैं अपने मायके से तैयार होकर निकलने ही वाली थी कि महमूद आ पहुंचे। बरेली के मौलवियों ने एक और फ़तवा जारी कर दिया था। मेरा और महमूद का अब कोई सम्बन्ध नहीं था। अगर हम दोबारा निकाह कर ले, तो वह भी नाजायज़ ही माना जायेगा।

''महमूद ने कहा कि वह अब भी मुझसे मोहब्बत करते हैं मगर वह जात बिरादरी से अलग नहीं हो सकते। वे लोगों के फ़िकरेबाज़ी और तानाकशी का निशाना नहीं बन सकते। इसलिए अब तो तलाक़ लेना ही बेहतर होगा। दोनों ही दोबारा जिंदगी शुरू करें।

''दोबारा शुरुआत ! वह अकेले, मर्द, कामकाजी ! मैं तीन बच्चों के साथ, बेकार, औरत ! खैर, अगर ऐसा ही है तो ऐसा ही सही, वह पैसा तो उनको मुझे दे देना चाहिए जो मेरे बच्चों की परवरिश के लिए कई ग़ैरसरकारी संस्थाओंने दिया था। महमूद चुप साथ गए। मैं समझ गई, बात बिरादरी और शरीयत से बढ़कर पैसे पर आ गई है। महमूद ने मेरा साथ उनके समझाने की वजह से नहीं उनका पैसा देखकर दिया था।

''मेरी आँखों के आगे अँधेरा छाने लगा। तीन बच्चे, मैं अकेली, कैसे पालूँ, किस पर बोझ बनूँ ? घर के पिछवाड़े का दरवाज़ा खोला तो सामने, गोल-गोल, कांटेदार फलों से लड़ी धतूरे की झाडी दिखी। रात के अँधेरे में तोड़ लाई। पीसकर दूध में मिलाकर बच्चों को भी पिला दिया, खुद भी पी लिया। अस्पताल में जब होश आया तो पता चला.... उन तीनों को तो रिहाई मिल गई थी और मुझे..... खून का मुक़दमा ! पूरी कहानी बस इतनी ही है।''

वह उठी, मुड़ी और बाहर की तरफ चलने लगी। डॉक्टरनी उसके पीछे लपकी और उसका रास्ता रोककर बोलीं, ''ठहरो फरज़ाना ! अभी बात पूरी नहीं हुई। तुमने यह तो बताया ही नहीं कि तुम अपने किस काम को अपना सबसे बड़ा अपराध मानती हो ?''

एक पल को फरज़ाना की आँखों में हैरानी झलकी..... ''अरे, बता तो दिया आपको, और कैसे बताऊँ ?''

''फरज़ाना, हम तुम्हें अपनी जिंदिगी को समझने में मदद करने आएं हैं। तुम्हें बताना है कि तुम्हारी नज़रों में तुम्हारा सबसे बड़ा जुर्म क्या है। हमें कोर्ट के फैसले से कोई सरोकार नहीं। तुम अपने आपको किस मामले में गुनहगार मानती हो ? क्या तुम्हारे साथ बलात्कार हुआ, तुम इसे अपनी गलती समझती हो ? तुम खुदको बचा नहीं पाईं, इसे अपना अपराध गिनती हो ? तुमने मुल्लाओं से मदद मांगी, इसे नादानी मानती हो ? कोर्ट का दरवाज़ा खटखटाया, न्याय माँगा और पाया.... यह जुर्म किया ? या अपने बेकसूर बच्चों का खून किया.... यह तुम्हारा सबसे बड़ा अपराध है ?''

फरज़ाना के होंठों पर फिर वही तनज़िया मुस्कराहट आई..... ''आपने मेरी बात बिलकुल नहीं समझी। मैंने यक़ीन किया कि घर में औरत महफूज़ होती है, यक़ीन किया कि जो औरत बुर्का पहनती है सब उसे इज़्ज़त की नज़र से देखते हैं, ज़माना उसका साथ देता है, खुदा उसका निगेबान होता है। इस झूठ पर बग़ैर सोचे समझे, बिना जांचे परखे मैंने विशवास किया, यही मेरा सबसे बड़ा गुनाह है।''

(लेखिका ज्येष्ठ साहित्यिक आणि पुरोगामी कार्यकर्त्या आहेत.)

■ ■

मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचे वर्गणीदार आणि वाचकवर्ग वाढवून या विवेकवादी चळवळीच्या विस्ताराला पाठबळ द्यावे, ही विनंती.



वाचनीय

इस्लाम आणि सहिष्णुतेचे भवितव्य - निर्भिड अन् खुली चर्चा

• डॉ. शमसुद्दीन तांबोळी

जगातील सर्वच देश विज्ञान-तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून भौतिक प्रगतीच्या माध्यमातून सुख आणि सुविधांचा लाभ घेत आहेत. यंत्र आणि तंत्रज्ञानाच्या या काळातसुद्धा समाजमानसावर धर्म आणि धर्मग्रंथांचा प्रभाव कमी झालेला दिसत नाही. उलट याच माध्यमाचा वापर करून धर्मवादी आपला प्रभाव वाढवत असल्याचे आपण अनुभवत असतो. या काळातही धर्माचा अर्थ आणि शिकवण स्वअध्ययनातून न घेता त्या-त्या धर्माचे अनुयायी धर्माच्या अर्थनिर्वचनासाठी पूर्वीप्रमाणेच पुरोहित वर्गावर अवलंबून दिसतात. यातूनच त्या-त्या समाजात विविध प्रकारच्या श्रद्धा, प्रथा-परंपरा, चालीरीती अस्तित्वात आल्या. त्यांचे अनुकरण करीत राहणं म्हणजेच धर्म असा अनेकांचा सोपा समज असतो. अलीकडे तर जात, धर्म, किंवा पंथ हे अस्मिता आणि संवेदनशीलतेचे विषय झाले आहेत. स्वतःच्या धर्मातील दोष, मर्यादा कोणी दाखवून देण्याचा प्रयत्न केला किंवा खटकणाऱ्या गोष्टींकडे बोट दाखवले तर त्याला उदारमतवादी किंवा परधार्जिणे ठरवले जाते. आत्मटीका करणारी व्यक्ती ही आपला धर्म अधिक सहिष्णु, कालसुसंगत आणि कल्याणकारी व्हावा अशा तळमळीतून हे करीत असेल असा अर्थ काढण्याऐवजी त्यावर परधार्जिणेपणाचा आरोप लावण्यात येतो. अन्य धर्माच्या व्यक्तीने असे दोष-मर्यादा दाखवण्याचा प्रयत्न केल्यास त्याच्यावर परधर्मद्वेषाचा ठपका ठेवण्यात येतो. जवळपास सर्व धर्मसमूहांत अशा अपरिपक्व बौद्धिक मर्यादा असतात. उदाहरणार्थ, मुस्लीम समाजातील महिलांची दयनीय स्थिती सुधारावी, या समाजातील अंधविश्वास कमी होऊन समाज आधुनिक व्हावा म्हणून कोणी प्रयत्न करीत असला तर त्याला धर्मद्रोही, काफिर म्हणून संबोधित करायचे, मुस्लीमेतरांनी जर मुस्लीम महिलांची स्थिती सुधारावी किंवा हा समाज आधिक प्रगतिशील व्हावा म्हणून काही करण्याचा प्रयत्न केला की त्याला मुस्लिमद्वेष असे लेबल लावण्याचे प्रकार अनभिज्ञ नाहीत. अशा कलुषित धार्मिक वातावरणात सामाजिक सुधारणेचे विषय एकतर प्रलंबित राहतात किंवा अडगळीत पडतात.

जागतिक पातळीवरील मुस्लीम प्रदेशातील अनेक दहशतवादी, जिहादी, अतिरेकी मूलतत्त्ववादी संघटनांच्या अविवेकी वर्तनातून जगातील मानवी समूहांपुढे

काही प्रश्न उभे राहिले आहेत. त्यामुळे बहुधर्मिय समाजात धर्मस्वातंत्र्य, धर्मसुधारणा आणि व्यक्तिस्वातंत्र्य रुजवण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या समाजात इस्लाम आणि मुस्लीम समाज चर्चेच्या केंद्रस्थानी येतो. अशा अवघडलेल्या सामाजिक परिस्थितीत निकोप, तर्कशुद्ध आणि निर्भीडपणे खुली चर्चा करण्याचे धारिष्ट्य कोणी केले तर तो नक्कीच कुतूहलाचा आणि स्वागताचा मुद्दा ठरतो. वास्तविक असे परखड वक्ते आणि समंजस श्रोते समाज बदलासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात. धर्मनिरपेक्ष, लोकशाही, समता आणि व्यक्तिस्वातंत्र्य या मूल्यांवर आधारित समाज उभा करण्यासाठी अशाच माणसांची खरी गरज असते.

'इस्लाम : द फ्यूचर ऑफ टॉलरन्स' या पुस्तकात सॅम हॅरिस आणि माजिद नवाझ असा समंजस संवाद करतात. संवाद करताना उणीदुणी कटाक्षाने बाजूला ठेवतात; पण राजकीयदृष्ट्या सोईच्या नसणाऱ्या, खटकणाऱ्या गोष्टीही टाळत नाहीत. हा संवाद जिंकण्या किंवा हरवण्यासाठी नाही तर निर्मळ करण्यासाठी, एकमेकांना समजून घेण्यासाठी तसेच समस्येच्या मुळाशी जाण्यासाठी आहे.

भारतीय परिप्रेक्षात मुस्लीम समाजाचा विचार करताना गेल्या काही दशकांत अनेक बाबी समोर आल्या आहेत. भारतात दहशतवादी संघटनांनी काश्मीर आणि अन्यत्र कारवाया केल्या, काही तरुण-तरुणींना अशा गटांकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला, मूलतत्त्ववादी संघटना आणि पक्ष चित्रपटगृहात राष्ट्रगीत तसेच भारतमाता की जय, वंदेमातरम म्हणण्यास विरोध करतात, धर्मवादी संघटनांनी शहाबानो तसेच तलाकबंदी प्रकरणी मुस्लीम महिलांच्या विधेयकाला कडाडून केलेला विरोध, समाजाला मध्ययुगात घेऊन जाणारे वेळोवेळी काढलेले फतवे, समाजाला आधुनिकतेकडे किंवा सुसंस्कृततेकडे घेऊन जाणारे नक्कीच नाही. धार्मिकतेच्या नावाखाली केला जाणारा असमंजस आग्रह समाजाला अधोगती आणि आत्मविनाशाकडे घेऊन जातो. या अशा पार्श्वभूमीवर सदर पुस्तकातील सॅम हॅरिस आणि माजिद नवाज यांच्यात झालेला निर्मळ संवाद धर्माकडे पाहण्याचा आधुनिक दृष्टिकोण देतो.

वास्तविक सॅम हॅरिस आणि माजिद नवाझ ही दोन व्यक्तिमत्त्वे समजून घेतली पाहिजेत. सॅम हॅरिस हे निरीश्वरवादी, अमेरिकन, ख्रिश्चन आणि उच्चविद्याविभूषित, व्यासंगी प्राध्यापक आहेत, तर माजिद नवाझ हे पाकिस्तानी कुटुंबात वाढलेले ब्रिटनचे नागरिक, धर्माने कट्टर मुस्लीम ! वयाच्या सोळाव्या वर्षी शिक्षण सोडून कट्टर इस्लामवादींच्या प्रभावाखाली येऊन अतिरेकी संघटनेशी जोडला गेलेलाआणि तुरुंगात शिक्षा भोगत असलेला विशीतला तरुण ! नवाझचे ॲम्नेस्टी

इंटरनॅशनल या संस्थेने समुपदेशन केले. तुरुंगातून बाहेर काढले. त्याला कट्टरतावाद्यांच्या तावडीतून सोडवले, पुन्हा उच्चशिक्षणास प्रवृत्त केले. ज्यामुळे माजिद नवाझ यांच्यात प्रचंड बौद्धिक परिवर्तन झाले, परिणामी त्यांनी इंग्लंडमध्ये 'क्विलिअम' ही संस्था स्थापन केली. या संस्थेमार्फत नवाझ मुस्लिमांमधील कट्टरता दूर करण्यासाठी कार्यरत आहेत. उदारमतवाद, स्त्री-पुरुष समानता, व्यक्तिस्वातंत्र्य आणि मानवता यांना इस्लाममध्ये स्थान मिळावे या पोटतिडीकेतून संघर्ष करीत आहेत. 'इस्लाम अँड द फ्यूचर ऑफ टॉलरन्स' या पुस्तकात सॅम हॅरिस हे माजिद नवाझ बरोबर संवाद करताना इस्लाममधील कोणत्या संकल्पना मुस्लिमेतरांना त्रासदायक आणि कडव्या वाटतात हे अपराधीपणा न बाळगता किंवा इस्लामला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे न करता अत्यंत मोकळ्या मनाने मांडतात. माजिद नवाझसुद्धा कोणतेही अभिनिवेष न बाळगता, संवादात प्रतिहल्ला किंवा प्रतिवादात न जाता हा संवाद सहजपणे पुढे घेऊन जातात. महत्त्वाची बाब म्हणजे या चर्चेदरम्यान सॅम हॅरिस स्वत: अगदी अलगदपणे ख्रिश्चन धर्मातील विसंगतीसुद्धा उलगडत असतात. भारतातील भिन्नधर्मिय समाजाचे स्वरूप, त्या-त्या धर्मांच्या मर्यादा, आंतरधर्मीय आणि धर्मांतर्गत संघर्षाच्या पार्श्वभूमीवर शांतिपूर्ण संविधानात्मक सहजीवनाचा संदेश देणारे हे पुस्तक वाचकांना नवी दृष्टी देते. भारतात धर्मवर्चस्वाच्या वातावरणातून खास करून हिंदू-मुस्लीम समस्येने पुन्हा-पुन्हा समाजाला वेठीस धरले आहे. परस्परांमध्ये असलेले अपसमज दूर होताना दिसत नाहीत. अलीकडे तर राजकीय वर्चस्व आणि भूतकाळीन तथाकथित शत्रुत्वाचा सूड घेण्यासाठी विविध पद्धतीने धर्मद्वेष आणि धृवीकरण वाढवण्यात येत आहेत. वर उल्लेखल्याप्रमाणे मुस्लीम धर्मांधतेप्रमाणेच हिंदुत्ववादी गटसुद्धा घरवापसी, लव्हजिहाद, लोकसंख्येचा मुद्दा, झुंडशाही, त्यातून होणाऱ्या अल्पसंख्याकांच्या हत्या, राष्ट्रद्रोहत्वाचे आरोप आणि असे बरेच काही विषय आपल्या परिचयाचे झाले आहेत. अशा क्रियेप्रतिक्रियेतून धार्मिक साहचर्य आणि सहिष्णुतेला नख लावण्याचे प्रसंग आपण पाहिले आहेत. सर्वसामान्य लोकांना तणावपूर्ण वातावरणाची नेहमीच झळ बसते. या समस्येवरील उपायासाठी आणि भारतातील भिन्नधर्मिय समाजाच्या शांततापूर्ण सहजीवनासाठी परस्परांतील गैरसमज दूर करणे, त्यासाठी निर्मळ मनाने खुली चर्चा करणे हा एक उपाय आहे. अशा संवादी संस्कृतीला 'इस्लाम अँड द फ्युचर ऑफ टॉलरन्स' प्रेरणा देऊन विसंवादाची कोंडी फोडू शकेल.

सॅम हॅरिस यांना असे वाटते की इस्लामला शांतिप्रिय धर्म असे लेबल

लावणे म्हणजे अस्तित्वात नसलेली गोष्ट खरी समजण्यासारखी आहे. त्यावर माजिद नवाझ म्हणतात, इस्लाम हा धर्म शांतिप्रियपण नाही आणि युद्धखोरपण नाही; तो एक धर्म आहे. इतर कुठल्याही धर्माच्या पवित्र ग्रंथाप्रमाणे इस्लामच्या पवित्र ग्रंथामध्येसुद्धा काही मजकूर काही लोकांना अत्यंत अडचणीचा, आक्षेपार्ह वाटू शकतो. त्याच वेळी हे पण खरे की सर्वच पवित्र ग्रंथांमधील काही भाग अगदी साधे-सरळ, निरुपद्रवी असतात. धर्म कधी स्वतःच्या बाजूने बोलत नाहीत, स्वतःची वकिली करत नाहीत. कुठल्याही सक्रियतेचा, पवित्र ग्रंथाला किंवा पुस्तकाला स्वतःचा असा आवाज नसतो. अन्वय लावणारी व्यक्ती तिचा आवाज त्याला बहाल करत असते. मग शेक्सपिअरचा अन्वयार्थ लावणे असो की धार्मिक ग्रंथाचे अर्थविवरण करणे असो. धर्मग्रंथ फक्त अस्तित्वात असतात आणि माणसे त्यांचा अन्वय लावतात.

इस्लामचे बहुसंख्य अनुनायी इस्लाम हा शांतिप्रिय धर्म असल्याचे सांगतात. या बहुसंख्य मुसलमानांना इस्लाम हा युद्धखोर धर्म आहे हे मान्य नाही. अल्पसंख्य असणाऱ्या जिहादी युद्धाची आणि हिंसेची भाषा करतात. सध्या इस्लाम विषयी जे मांडले जाते त्यावर अल्पसंख्य असणाऱ्या जिहादींचे वर्चस्व आहे. यासाठीच बहुसंख्य शांतिप्रिय मुस्लिमांनी संघटित होऊन जिहादींच्या विरोधात एकत्र आवाज उठवायला हवा.

आपल्याला कल्पना आहेच की, मध्यंतरी अनेक तरुण जिहादी गटात गेले. भारतात कल्याण मधील चार तरुणांनी असा प्रयत्न केल्याचे समोर आले. पुण्यातील एका तरुणीला याच आरोपाखाली एटीएसने अटक केली. या तरुणांना अशा जिहादी गटांचे आकर्षण का आहे ? नवाझ लंडन टाइम्सच्या सर्वेक्षणाचा एक संदर्भ देतात, त्यात असे निष्कर्ष आहेत की, ब्रिटिश मुस्लीम समाजातील दर सात तरुणांपैकी एकाला 'इस्लामिक स्टेट' विषयी आत्मियता वाटते. हा निष्कर्ष किती अचूक असेल याविषयी शंका असली तरी इस्लामिक स्टेटला समर्थन मिळत आहे आणि त्यासाठी विविध गटांतील विचारप्रणालीचे छुपे प्रवाह अस्तित्वात आहेत आणि ही बाब अस्वस्थता निर्माण करणारी आहे. नवाझ हे स्वतः इस्लामवादी गटासोबत काम करत होते. त्यांनी यासंदर्भात मांडलेले स्वानुभव, विविध देशांतील घटना आणि त्या निमित्ताने केलेला अभ्यास जिहादी तसेच इस्लामवादी मानसिकता समजून घेण्यासाठी उपयोगी ठरते. माजिद नवाझ यांना असे वाटते की अतिरेकी हे निर्वात पोकळीतून उद्‌भवलेले नसतात. त्यामागे काही प्रेरणा असतात. नवाझ असे नोंदवतात की वंशभेद, धर्मभेदाच्या अनुभवातून काही खऱ्या-खोट्या गाऱ्हाण्यांच्या

कथा असतात, धार्मिक अस्मिता आणि त्यातील संभ्रमाला खतपाणी मिळते, अशा तरुणांवर प्रभाव टाकण्यासाठी प्रभावी व्यक्तिमत्त्वे तयार झालेली असतात ते खरे 'भरती'कार असतात आणि अंगीकारलेल्या विचारप्रणालीतील हट्टाग्रह असतात. या सर्व परिस्थितीचा खुबीने वापर करून तरुणांना इस्लामवादी किंवा जिहादी गटाकडे खेचण्यात येते. या व्यतिरिक्त दारिद्र्य, शिक्षणाचा अभाव, बेरोजगारी, पक्षपात ही पार्श्वभूमी असतेच.

इस्लाम जगतातील या घडामोडींचे परिणाम कमी-अधिक प्रमाणात मुस्लीम समाजाला भोगावे लागत आहेत.

आपल्याकडे मध्यंतरी 'सर्व मुसलमान दहशतवादी नसतात; पण सर्व दहशतवादी मुसलमान असतात' असे एक विधान इकडे-तिकडे फिरून गेले. त्यावर मोठ्या प्रमाणात वाद आणि प्रतिवाद झाले. शेवटी दहशतवाद्यांना धर्म नसतो, ती एक स्वतंत्र अपप्रवृती असते, असा समंजस निष्कर्ष काढण्यात आला.

इस्लामच्या परिप्रेक्षात मुस्लीम समाजात कोणते आणि किती प्रमाणातील प्रवाह असतात याचे सॅम हॅरिस यांनी अभ्यासपूर्ण, सुंदर विश्लेषण केले आहे. त्यांनी एका वर्तुळाची कल्पना मांडली आहे. या एका वर्तुळातच अनेक वर्तुळे दिसतात. सर्वात केंद्रस्थानी असणारे वर्तुळ हे जिहादी. त्यात इस्लामिक स्टेट, अल् कायदा, अल् शबाब, बोको हराम यांसारख्या गटांचे, जे इतरांना मारता-मारता स्वतः शहीद होण्यास उत्सुक असतात. या अंतर्वर्तुळाच्या बाहेर त्याहून मोठे वर्तुळ असते ते इस्लामवादीचे. ते इतरांना मारायला किंवा स्वतः मरायला उतावळे नसतात. या गटाच्या प्रेरणा राजकीय स्वरूपाच्या असतात. या वर्तुळाच्याही बाहेर एक मोठे वर्तुळ असते, ते या दोन्ही गटांना नैतिक आणि आर्थिक पाठिंबा देऊन समर्थन करणाऱ्या मुस्लिमांचे. परंतु ते स्वतः त्यांच्या कृतिकार्यक्रमात सहभागी होत नाहीत. या वर्तुळाच्या बाहेर त्याहून मोठे वर्तुळ असते ते तथाकथित मध्यममार्गी मुस्लिमांचे. यांना आधुनिक जीवनमूल्यांना धरून आयुष्य जगायचे असते. ते खूप धर्मनिरपेक्ष किंवा पुरोगामी असतात असेही नाही; पण इस्लामिक स्टेटसारखे जिहादी गट आपल्या धर्मश्रद्धांचे प्रतिनिधित्व करतात असे त्यांना वाटत नाही. कदाचित या वर्तुळाच्या बाहेर कोट्यवधी, प्रामाणिक आणि धर्मनिरपेक्ष मुस्लीम असतील; पण ते व्यक्तच होऊ शकत नाहीत. ही हॅरिस यांची मांडणी पुढे नेत असताना नवाझ स्पष्ट करतात की, इस्लामवाद आणि जिहाद यांचे अलीकडे राजकीयकरण झालेले अन्वयार्थ असून ते मूळ इस्लाम आणि जिहादमध्ये अभिप्रेत नव्हते. इस्लाम हासुद्धा इतर धर्मांप्रमाणे जुना धर्म आहे. यात अनेक पंथ, उपपंथ, भारतात जातीसुद्धा

आणि विविध स्पष्टिकरणे अस्तित्वात आहेत. नवाझ यांच्यानुसार इस्लामवाद म्हणजे स्वतःस मान्य असणारा एकच एक इस्लामचा अन्वयार्थ इतरांवर लादण्याची इच्छा बाळगणारा, कुठल्याही पद्धतीने शरियत कायदा लागू करण्याची इच्छा म्हणजे इस्लामवाद. हा गट, राजकीय गट आपल्या विचारांचा शिरकाव करण्यासाठी कळ काढतात. तर क्रांतिकारी इस्लामवादी, एकाच फटक्यात परिवर्तन घडवू इच्छितात. हा लढाऊ आणि बळाचा वापर करणारा इस्लामवाद म्हणजे जिहादी गट आहे. जिहादच्या निमित्ताने नवाझ यांनी जिहादची अंतरिक संघर्षाची मूळ कल्पनासुद्धा विशद केली आहे. तसेच जगातील सर्व मुस्लिमांच्या तुलनेत जिहादी हे अत्यंत अल्पसंख्य असल्याचे नोंदवतात; पण ते तुलनेने संघटित आणि प्रबळ अल्पसंख्य आहेत. इस्लामवादीसुद्धा कमी असतात; मात्र ते जिहादींना सर्वात जवळ असतात.

मुस्लीम समाजात संख्येने मोठा असणारा पुराणमतवादी असा गट आहे. तो कर्मठ आणि परंपरानिष्ठ असतो. त्यांना मूलतत्त्ववादी म्हणण्यापेक्षा पुराणमतवादी म्हणणे अधिक योग्य आहे. त्यांना आधुनिक काळातील उदारमतवादी मानवीहक्क मान्य नाहीत. जसे इजिप्त मधील जनतेने उदार - धर्मनिरपेक्ष लोकशाही निवडली नसली तरी त्यांनी मुस्लीम ब्रदरहूडला निकराने नाकारले. ट्युनेशियातसुद्धा इस्लामवादी नहादा पक्षाला नाकारून धर्मनिरपेक्ष पक्षाला सत्तेवर आणले. या गटाची अशी धारणा आहे की, इस्लामवाद हे इस्लामचे अनुचित राजकीयकरण आहे. शासनाने इतरांवर इस्लाम लादावा असे या गटाला वाटत नाही मात्र स्वतःच्या पद्धतीने धर्मपरंपरा पाळण्याचा अधिकार त्यांना हवा असतो. त्यामुळे अनेक मुस्लीम पुराणमतवादी असूनही ते जिहाद आणि इस्लामवादाच्या विरोधातही असतात; परंतु लिंगभाव, समानता, परंपरेतील बदल त्यांना नको असते. सुधारणावादी मुस्लिमांची खरी अडचण ही असते की त्यांना या समाजाला इस्लामवाद, जिहादवाद यांविरोधात उभे करताना त्यांच्यात मानवी हक्क, व्यक्तिस्वातंत्र्य, सेक्युलॅरिझम किंवा आधुनिक संस्कृती रुजवण्यासाठी हवा तसा पाठिंबा मिळत नाही आणि या गटाला न दुखावता समतावादी चळवळ चालवायची असते. इस्लाममधील सुधारणावादी माणसे हे इस्लामचे भवितव्य आशावादी करतात. या सुधारणावादी गटांना निरुपद्रवी धर्मवाद्यांना जवळ करून कमालीच्या मुस्लीमद्वेष्ट्या लोकांबरोबरही संवाद करणे अनिवार्य असते; पण संवाद करणे म्हणजे शत्रुबरोबर हातमिळवणी नसते. तरीही मुस्लीमद्वेष्ट्यांसोबतचा संवाद हा अनेकांना आक्षेपार्ह वाटतो. त्यामुळे संवाद आणि खुली चर्चा करणे ही किती गंभीर आणि जटील समस्या आहे हेच अधोरेखित होते.

मुस्लीम समाजात असाही एक छोटा गट अस्तित्वात आहे, ज्यांना आपण

मुस्लीम आहोत ही अनुषंगिक बाब वाटते. समाजात मिसळताना इस्लाम ही त्यांची मुख्य ओळख वाटत नाही. असा गट, पुराणमतवादी मुस्लीम आणि सुधारणावादी मुस्लीम धर्मनिरपेक्ष असू शकतात. भारतीय संदर्भात मुस्लीम ओळख न बाळगणारे बॅरिस्टर एम. सी. छगला, मुस्लीम ओळख बाळगणारे मौलाना आझाद आणि सुधारणावादी हमीद दलवाई हे विविध अर्थाने धर्मनिरपेक्ष असतात; पण सेक्युलॅरिझम, लोकशाही, समता, मानवी हक्क, व्यक्तिस्वातंत्र्य या सर्व मूल्यांचा स्वीकार करणारा मानवी समाज निर्माण करणे हे काम डोंगराएवढे मोठे आहे. धर्मापलीकडे जाऊन स्वतःला फक्त नागरिक समजून वागणारा समाज निर्माण करणे हे मोठे आणि अवघड आव्हान असले तरी ते अशक्य कोटीतील नाही, असा माजिद यांचा विश्वास आहे. अशा माणसांचा समाज निर्माण करण्यासाठी ते क्विलियम या संस्थेमार्फत कार्य करीत आहेत.

धर्मश्रद्धांच्या बाबतीत जिहादी आणि इस्लामवादी या दोघांना आकर्षण असते. स्वर्गाचे अस्तित्व आणि हौतात्म्य या गोष्टींची खात्री असते. मात्र काही जिहादी हे फारसे धार्मिक नसतात, त्यांना हिंसेत रस असतो तर काही धर्मवेडे असतात. ९/११ ला अमेरिकेतील ट्विन टॉवरवर हल्ला करणारे अतिरेकी आत्मघातकी हल्ला करण्यापूर्वी नग्न नृत्याच्या क्लबमध्ये गेले होते. या अतिरेक्यांना आपण स्वर्गाच्या वाटेवर जात आहोत असे वाटत असावे; पण अशांना सच्चे श्रद्धाळू मुस्लीम म्हणता येईल का ? बोको हराम किंवा इस्लामिक स्टेटच्या जिहादींनी तर स्त्रियांचे अपहरण करून त्यांच्यावर बलात्कार केले, याला धर्मश्रद्धा कसे मानायचे ? किंवा एखादा मुस्लीम वरकरणी धर्माचे नियम पाळत नसेल, पण तो सश्रद्ध असू शकतो अशीही उदाहरणे देता येतील.

सध्या मुस्लीम मूलतत्त्ववादी, जिहादी, धर्मद्वेष, इस्लामोफोबीया, पुरोगामी, उदारमतवादी, सुधारणावादी मुस्लिमांबद्दल या ना त्या निमित्ताने चर्चा होत असते. अस्मितेचे राजकारण आणि सांस्कृतिक अस्सलपणाच्या मुद्यांवर चर्चा होत असते. सच्चा धार्मिक कोण ? यावर सुद्धा बोलले जाते. मात्र यामध्ये खऱ्या उदारमतवादाचा कसा विश्वासघात होतो याची माजिद नवाझ यांनी तर्कशुद्ध आणि विवेकी दृष्टिकोणातून चर्चा केली आहे. अल्पसंख्याक समूहातील अल्पसंख्य असणाऱ्या उदारमतवादी लोकांना याचा मोठा फटका बसतो. स्त्रीवादी मुस्लीम, इस्लामचा त्याग केलेले पूर्वाश्रमीचे मुस्लीम, समलैंगिकता प्रवृती बाळगणारे मुस्लीम यांना कलंकित करून कसे ठार केले जातात याचे विवेचन समजून घ्यायला हवे.

मुस्लीम समाजाबद्दल सहानुभूती बाळगणारे मुस्लीमेतर समाजात लोक

आहेत. त्यांनासुद्धा उदारमतवादी किंवा सुधारणावादी मुस्लिमांपेक्षा पुराणमतवादी जवळचे वाटतात. या सहानुभूतीदारांना वाटते की हे काही सच्चे धर्मपरायण मुस्लीम नाहीत. ते कर्मठ विचार मांडणाऱ्यालाच मुस्लीम मानतात. त्यांना शुद्ध प्रतिनिधित्व आणि सांस्कृतिक अस्मिता यांना धक्का लावायचा नसतो. अलीकडे आपण टीव्हीच्या चर्चेमध्ये मुस्लीम प्रतिनिधित्व करण्यासाठी किंवा इस्लाम विषयावर चर्चा करण्यासाठी मूलतत्त्ववादी मुस्लिमाला बोलावण्यात येते. या स्पर्धेत कट्टर, हट्टाग्रही, मूलतत्त्ववादीच जिंकतात. अशा प्रकारे सहानुभूतीदारच उदारमतवादी किंवा सुधारणावादी मुस्लिमांना निष्प्रभ करतात. लेखक अशा सहानुभूतीदारांना प्रतिगामी डावे संबोधतात. लेखकाला असे वाटते की कुठल्याही अल्पसंख्य समाजाच्या सक्षमीकरणाची पहिली पायरी ही त्यातील सुधारणावादींचे आवाज खुले करणे ही असते. ज्यामुळे त्या समाजाचे सदस्य स्वतःच्या समस्यांची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेऊ लागतील आणि सक्षमीकरणाच्या मार्गातील पहिला अडथळा पार पाडतील. आपण अन्यायाचे बळी आहोत ही मानसिकता आणि तशी तक्रार नेहमी ऐकायला येते; पण सक्षमीकरण झाल्यास, समस्यांची जबाबदारी घेतल्यास रस्त्यावर येऊन दंगे आंदोलने होणार नाहीत. यासाठी समाज धर्मसमूहकेंद्री न होता व्यक्तिविचारकेंद्री झाला पाहिजे. तसे झाले नाही तर समाजाचे सक्षमीकरण होण्याऐवजी दुर्बलीकरणच होईल. हा महत्त्वाचा दृष्टिकोण पुस्तकात मांडला गेला आहे.

'इस्लाम अँड द फ्युचर ऑफ टॉलरन्स' या पुस्तकात समकालीन प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करून त्यावर खुलेपणा बाळगून निर्भिडपणे चर्चा केली आहे. सांप्रदायिकता, अस्मितेचे राजकारण, इस्लामचे खरे स्वरूप, सर्वसामान्यांना माहिती नसलेला इस्लामच्या इतिहासातील मु'ताझीला समाज, ज्यांचा अल्लाचा शब्द वज्रलेप शब्द मानत नव्हता. या समाजातील सांस्कृतिक वैविध्यविपुल धर्मविचार, धर्मग्रंथातील अर्थ निश्चितीचा मुद्दा यांची तपशीलवार माहिती सदर पुस्तकात मिळते.

इस्लाम मधील सहिष्णुतेचे भवितव्य या भागात इस्लामचे अर्थनिर्वचन करणारे पंथ आणि परंपरांचे तपशील दिले आहेत. कुराण आणि हादिसमधील काही संदर्भ देऊन माजिद नवाझ हे संदर्भ एकमेकांना कसे छेद देतात याचे विवरण केले आहे. काफिरांबरोबर संबंध ठेवण्याचा मुद्दा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या मुस्लीम समाजाला आत्मपरीक्षण करण्यासाठी भाग पाडते. नवाझ हे स्पष्टपणे सांगतात की काही वैश्विक मूल्ये धर्मग्रंथाबाहेर आढळली तर ते सर्वधर्मियांसाठी महत्त्वाचे ठरतात. सद्‌गुणांविषयी पूज्यभाव राखणे हा माणसाचा सहजभाव असतो,

याची आपण जाणीव ठेवली पाहिजे. आज जिहाद, काफिर, परधर्म-तिरस्कार ही आधुनिक घटिते ठरत असल्याची कबुली नवाझ देतात.

माजिद नवाझ हे केवळ निरीक्षणे नोंदवून किंवा समस्यांची मांडणी करून थांबत नाहीत तर समाजाला पुढे घेऊन जाण्याचा मार्ग कसा शोधायचा ? याबद्दल महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करतात. धर्मग्रंथातील अल तक्रिया फायद्याचे असेल तेव्हा किंवा अडचणीत असताना खोटे बोलण्याची संम्मती देते. ही संकल्पना शिया पंथात आहे. इजमा, न्यायशास्त्रीय संकल्पना, विविध प्रकारचे फतवे यांची चर्चा केली आहे. जिहादवादाची समस्या सोडवायची असेल तर या समाजाला धर्मग्रंथाकडे पाहायचा दृष्टिकोण बदलावा लागेल, मानवता हे मूलभूत तत्व आणि मानवी हक्क हाच पाया घ्यावा लागेल, माझी माणसे मुस्लीम कितीही रानटी असली तरी ते मुस्लीम असल्याने ती मुस्लीम म्हणून माझी नसतील. प्रगत मानवी समुदाय म्हणून आमची समान मूल्ये असतील. हा दृष्टिकोण बाळगून त्यावर आवलंबून राहावे लागेल. इस्लाम मधील उम्मा लोक या संकल्पनेचे पुनश्च अवलोकन केले पाहिजे. खास करून अनेक समस्यांचे निराकरण करण्यासाठी इस्लामवादाची विश्वासार्हता नष्ट केली पाहिजे. त्याचे गारूड उतरवले पाहिजे. यासाठी नवाझ पर्यायी युक्तिवाद लोकप्रिय करण्याचे आवाहन करतात. त्यासाठी तळागाळात सच्च्या लोकांच्या चळवळी निर्माण करणे, पाकिस्तानातील खुदी प्रमाणे स्थानिक मातीत मूळे असणारी सांस्कृतिक परिवर्तनाची चळवळ उभारणे, मुस्लिमांच्या अस्मितेत सुधारणा करणे, धर्मग्रंथांच्या अनिश्चिततेवर भर देणे, इस्लामवादी विचारसरणी नामोहरम करणे, बहुलतावादास समर्थन देणे, विविध पद्धतीने उदारमतवाद विकसित करणे आणि धर्मनिरपेक्ष वर्तनावर भर देणे हे पर्याय मुस्लीम समाजाने अंगीकारले तरच समाजाचे भवितव्य उज्वल होणार आहे. हा नवाझ यांचा संदेश मुस्लीम समाजासाठी असला तरी तो भारतातील सर्वधर्मीय समाजाच्या भवितव्यासाठी महत्त्वाचा आहे. या पुस्तकाच्या निमित्ताने इस्लाममुळे निर्माण झालेले सहिष्णूतेचे भवितव्य किंवा इस्लाम समोर निर्माण झालेले सहिष्णूतेचे भवितव्य समजून घेण्यासाठी 'इस्लाम अँड द फ्यूचर ऑफ टॉलरन्स' पुस्तकात संवाद करणारे माजिद नवाझ हे 'द एंड ऑफ फेथ' या ग्रंथाचे लेखक असून त्यांचे 'रॅडिकल' नावाने आत्मचरित्र प्रकाशित झाले आहे. २०१५ मध्ये हॉर्वर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाचा अत्यंत सुंदर आणि सुलभ मराठी अनुवाद मा. करुणा गोखले यांनी केला आहे. मूळ इंग्रजीत असलेल्या पुस्तकाला अनुवादकांनी उत्तम शब्दनिवड करून मराठी वाचकांपर्यंत इस्लाम आणि सहिष्णूतेचे भवितव्य पोहचवले आहे. या पुस्तिकातील

संवाद एकूणच समाजाला मानवतेच्या प्रगल्भतेकडे घेऊन जाते. सदर पुस्तक वाचत असताना हमीद दलवाई यांची पुनर्भेट झाल्याचा आनंद मिळतो. साधना आणि मुस्लीम सत्यशोधक यांच्यातील नातं विचारांचं आहे. मंडळाची स्थापना २२ मार्च १९७० मध्ये साधनेत झाली. साधनाने सातत्याने मंडळासाठी सहकार्य केले. गेल्या अर्ध दशकात दलवाई यांच्या साहित्याचे नव्या रूपात पुनर्प्रकाशन, साहित्याचे अनुवाद आणि नव्या साहित्याची निर्मिती केली. आता साधनाने मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या सुवर्णजयंती वर्षात इस्लाम आणि सहिष्णुतेचे भवितव्य पुस्तक प्रकाशित करून... सत्यशोधक चळवळीस बळ दिले आहे. पुस्तकाच्या अनुवादक मा. करुणा गोखले आणि साधनाचे संपादक मा. विनोद शिरसाठ यांना मनःपूर्वक धन्यवाद !

Islam And The Future Of Tolerance : A Dialogue
- Sam Harris - Majid Nawaz
Publication : Harward University Press, Londan

इस्लाम आणि सहिष्णुतेचे भवितव्य - एक सुसंवाद
अनुवादक : करुणा गोखले
प्रकाशन : साधना प्रकाशन, पुणे.

(लेखक मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष आहेत.)

■ ■

क्विलिअम - ही संघटना मूलतत्त्ववादी विचारांपासून परावृत्त करण्यासाठी कार्य करते. भिन्न धर्मियांशी संवाद करून एकमेकांच्या मनातील जळमटे दूर करते. उदारमतवाद, बहुलतावाद, सेक्युलॅरिझम, स्त्री-पुरुष समानता आणि आधुनिकतावादाच्या प्रचारार्थ संघटना कार्यरत आहे. समाजाचे ऐहिक प्रश्न सोडविण्याचे मार्ग सांगत मानवता - व्यक्तिस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांच्या बाजूने असणारी ही संघटना म्हणजे अनाहूतपणे दलवाई विचार आंतरराष्ट्रीय पातळीवर घेऊन जाणारी संघटना आहे. नजिकच्या काळात मुस्लीम सत्यशोधक मंडळ या संघटनेबरोबर संवाद करण्याचा नक्की प्रयत्न करेन.

मानवजातीला इस्लामचा खतरा ?

● पन्नालाल सुराणा

'इस्लाम आणि सहिष्णुतेचे भवितव्य' हे पुस्तक साधना प्रकाशनने मार्च २०२०मध्ये प्रकाशित केले आहे. अमिरेकेतील विविध धर्मांचे एक अभ्यासक सॅम हॅरिस यांचे 'स्पिरिच्युअॅलिटी विदाउट रिलीजन' हे गाजलेले पुस्तक आहे. माझीत नवाज हे पाकिस्तानी पितामातेचे पुत्र ब्रिटनचे नागरिक आहेत. त्यांना हिझब-उत तहरीर या इस्लामवादी संघटनेचे कार्यकर्ते असताना तुरुंगवास घडला. त्यांच्या हातून कोणाचीही हत्या झालेली नव्हती म्हणून ॲम्नेस्टी इंटरनॅशनलच्या प्रयत्नांमुळे त्यांची मुक्तता झाली. मुस्लीम माणसाने हिंसा करू नये या भूमिकेचा प्रसार करण्यासाठी क्विलिअम या संस्थेची स्थापना केली. काफिराची हत्या करावी, तसे करणाराला लगेच स्वर्गात प्रवेश मिळतो व सुंदर युवती भोगायला मिळतात, असे वचन कुराणात आहे. यावर बोट ठेवून हॅरिस म्हणतात की, जो मुसलमान कुराणातील ही आज्ञा प्रमाण मानत नाही, असे म्हणत नाही तोपर्यंत माजिद यांचे म्हणणे मान्य करणार नाही. व्यक्तिस्वातंत्र्य व लोकशाही हे मुसलमानाने स्वीकारणे सगळ्या मानवजातीच्या हितासाठी आवश्यक आहे कारण जगात त्यांची लोकसंख्या १६० कोटी आहे. कुराणातील आज्ञा प्रमाण मानायची नाही, असे सर्वसाधारण मुसलमानाला पटवून देणे अशक्य आहे, ही फार मोठी अडचण आहे; पण मार्ग निघू शकतो, असे माजिद यांना वाटते. या मुद्यावर जी प्रदीर्घ चर्चा इंग्रजीत झाली, तिचा झुंजार कार्यकर्त्या करुणा गोखले यांनी केलेला अनुवाद म्हणजे हे पुस्तक आहे.

२०१५ मध्ये दायेश ही संघटना सगळ्या जगावर इस्लामची सत्ता स्थापन करायची आहे, या उद्देशाने काम करू लागली. इस्लामिक स्टेट ऑफ सिरिया अँड इराक-इसिस या नावाने तिने सिरिया या देशातील काही प्रदेश ताब्यात घेतला. त्यांच्याकडे शस्त्रे भरपूर होती व खंडणी आणि तेलाचा पैसाही भरपूर मिळत होता. वेगवेगळ्या देशातले मुस्लीम तरुण विशेषत: संगणक तज्ज्ञ त्या संघटनेकडे जाऊ लागले, त्यामुळे सगळ्या मानवजातीलाच इस्लामचा खतरा आहे, अशी चिंता अनेकांना वाटायला लागली होती; पण मुसलमान झाले तरी ती माणसेच आहेत आणि बेछूट हिंसाचार करणे हे माणसाला शोभणारे नाही, असे आवाहन

अनेकजण करू लागले. माजिद हा त्यांपैकी एक होय.

त्याची मांडणी पुढीलप्रमाणे आहे - शस्त्राच्या जोरावर सगळ्या जगावर इस्लामची सत्ता कायम करावी, असे म्हणणारांना त्याने जिहादी म्हटले आहे. ते अगदी छोटे वर्तुळ आहे. त्यांच्यापेक्षा मोठे वर्तुळ इस्लामवाद्यांचे आहे. आम्ही कुराण प्रमाण मानतो; पण त्यासाठी लगेच सगळ्यांनी हातात तलवार घेतली पाहिजे, असे आम्हाला वाटत नाही अशी त्यांची भूमिका असते. ज्या मुसलमानाचे विचार कडवे नसून उदारमतवादी आहेत, त्यांचे वर्तुळ सगळ्यात मोठे आहे. माजिद याचे म्हणणे असे की, ते सगळे लोक इस्लाम धर्म हा आपल्या अस्तित्वाचा भाग आहे असे ढोबळमानाने मानतात. इतर धर्मांचे लोकही वेगवेगळ्या देशांत आहेत, त्यांना जगण्याचा अधिकार आहे आणि आपल्याला त्यांच्या बरोबर सहअस्तित्व टिकवून जगायला पाहिजे, असे त्यांचे मन सांगत असते. तुमचा जिहादी गटाला पाठिंबा नाही काय ? असे कोणी त्यांना विचारले तर ते गप्प बसणे हा मार्ग स्वीकारतात. त्यांना लोकशाहीचा विचार मनापासून मान्य करायला लावणे शक्य आहे, असे माजिदला वाटते. त्याने असे म्हटले आहे की, इजिप्त या मुस्लिमबहुल देशातील २०१९ निवडणुकांत इस्लामवादी पक्षाला - मुस्लीम ब्रदरहुडला जेमतेम २४ टक्के मते मिळाली होती. ट्युनिशीया देशातही तसेच झाले होते. माजिद हे जरूर मान्य करतो की, देशात शरियत कायदा लागू करावा का ? यावर मतदान घेतले तर ते ६० टक्क्यांच्या वरही जाईल. तशा मूल्यभूत प्रश्नावर चर्चा न करणे व मतदान न घेणे चांगले.

हॅरिसचे असे म्हणणे की, कुराण या धर्मग्रंथात धर्मप्रसारासाठी शस्त्राचा वापर करावा, असे म्हटले असताना तुझे शांततेचे व लोकशाहीचे आवाहन मुसलमान लोक स्वीकारणारच नाहीत. यावर माजिद म्हणतो की, धर्मग्रंथात जे लिहिले आहे ते जसेच्या तसे स्पष्ट नाही आणि विरोधी मतही मांडलेले आढळते. निरपराध माणसाची हत्या करू नये, असेही कुराणात म्हटले आहे. काफीर या शब्दाचा अर्थ कुराणात दिला आहे तो म्हणजे ज्याने अल्ला एकच आहे, असे प्रथम मान्य केले; पण नंतर तो धर्म सोडून दिला असा माणूस होय. फितुर किंवा द्रोही (renegade). जो पहिल्यापासून दुसऱ्या धर्माचा आहे तो काफिर नव्हे. आज घडीला आपण धर्मग्रंथाचे नेमके काय म्हणणे आहे हे अन्वयार्थानेच ठरवावे लागते. इस्लामी परंपरेत इज्तिहाद म्हणजे चर्चा करून सर्वसहमती बनवणे यालाही स्थान मिळालेले आहे. कुराण, हादिथ आणि त्यापुढे इज्तिहाद. येथे या आधारे आपल्याला मुसलमानाने मूलतत्त्ववाद किंवा कर्मठपणा सोडावा असे पढवून द्यायला वाव आहे.

हॅरिसलाही हे मान्य आहे; पण तो मार्ग खडतर आहे असे त्याला वाटते. तरीही लोकशाही, स्त्री-पुरुष समता, व्यक्तिस्वातंत्र्य ही मूल्ये मुसलमानांनी स्वीकारावीत, त्याला कुराणाची आडकाठी येत नाही असे मानायला जागा आहे.

माजिदने याचाही उल्लेख केला आहे की, जवळपास ४४ मुस्लिमबहुल देशांनी युनोचे सभासदत्व स्वीकारले आहे. त्यामुळे शांतता, मानवी हक्क या बाबतचा युनोचा जाहीरनामा स्वीकारण्याचे त्यांनी कबूल केले आहे, असे आपण मुसलमानाला सांगू शकतो. मूलतत्त्ववाद हा थोडेच लोक कर्मठपणाने पाळण्याचा आग्रह ठेवतात.

हॅरिसला उद्देशून माजिद असेही म्हणाला की, मुस्लीम अतिरेकीवादाची हवा जेवढी युरोपात गरम आहे तेवढी ती अमेरिकेत नाही. दोन मनोरे विमानाने उडवून देण्यापलीकडे अमेरिकेत अतिरेकी कृत्ये झालेली नाहीत. युरोपात १७ व्या शकतापर्यंत मुसलमानांचा वरचष्मा होता. त्या काळात झालेल्या धार्मिक युद्धात ख्रिश्चनांचे पराभव झाले होते. त्यानंतर झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे ख्रिश्चन देशांचे सामर्थ्य वाढले. त्यांनी साम्राज्यविस्तार करताना मुस्लीम देशांवर अत्याचार केले. काळ्या तेलाचा शोध लागून त्याचा उपयोग वाढू लागल्यावर युरोपियन व नंतर अमेरिकन भांडवलदारांनी त्यावरही कब्जा केला. एवढेच नव्हेतर १९४८ साली पॉलिस्टीनची जमीन तोडून ज्यू लोकांना इस्रायल देश स्थापायला मदत केली. त्यामुळे त्या भागातल्या मुसलमानांचा पाश्चात्त्य देशांवर राग वाढला. अमेरिकेने अफगाणिस्थान व इराकवर विनाशकारी हल्ले केले. या सगळ्या गोष्टींमुळे मुसलमानांचा ख्रिश्चन देशांवरील राग वाढला. लेब्यानन व गाजापट्टीत मुसलमान लोक हल्ले करतात. तसेच चार्ली हेब्दो अर्कचित्रावरून मुसलमानांनी त्या प्रेसवर केलेला हल्ला किंवा लंडनमधील बॉंबस्फोट अशा घटना तनातनी कायम ठेवत आहेत. तर त्यावरून मुसलमान हे खतरनाक आहेत व याला कारण त्यांचा धर्म आहे, असे युरोपातल्या व अमेरिकेतल्या लोकांना वाटते. ख्रिश्चन व मुस्लीम लोकांच्यात संवाद वाढवणे गरजेचे आहे, असे म्हणणारे अनेक लोक आहेत.

जगात मुसलमानांची संख्या १६० कोटी आहे. एवढ्यावरून त्या सगळ्यांची मानसिकता सारखी आहे, असे मानायला जागा नाही. इंडोनेशिया हा सगळ्यात मोठा मुस्लीम देश आहे व त्या खालोखाल बांगला देश आहे; पण तेथील लोकांनी इसिसला पाठिंबा दिला नव्हता. अन्यधर्मिय शेजारी देशांशी गुण्यागोविंदाचे संबंध ते दोन देश जोपासत आहेत. सगळ्या जगावर इस्लामची सत्ता कायम करावी अशी भाषा तिथे ऐकू येत नाही. त्या खालोखाल मोठी मुस्लीम

संख्या आहे ती भारत व पाकिस्तान या देशांत. भारतातून इसिस संघटनेत जेमतेम ६०-७० तरुण गेले होते, मात्र जमाते इस्लामीने देवबंद येथे देशभरातल्या मौलानांचा जो मेळावा भरवला होता. येथे इसिस विरोधी ठराव मंजूर करण्यात आला होता. भारतातील मुस्लीम बुद्धिजीवी लोक हे तर आपण संविधानाच्या आधारे देशाच्या मूळ राजकीय प्रवाहात सहभागी झाले पाहिजे, असे म्हणत आहेत आणि इथल्या प्रगतिशील मुस्लीम महिलांनी तलाक व चार बायका करण्याची परवानगी या विरुद्ध आवाज उठवला आहे. पाकिस्तानला भारताशी मित्र म्हणून वागणे आवघड जात आहे हे खरे; हजार वर्षे युद्ध खेळू, असे म्हणणारे इतिहासजमा झाले आहेत. त्या देशातला एक छोटा बुद्धिजीवी वर्ग भारताशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवावेत असे म्हणतो आहे. हे खरे आहे की, पाकिस्तान सरकार हे काश्मीरवर हल्ले करायला अतिरेकी गटांना मदत करत आहेत, पण ते जमिनीचे भांडण आहे, धर्माचे नाही.

हॅरिस व माजिद यांच्या चर्चेतून हे स्पष्ट होत आहे की, व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, स्त्री-पुरुष समानता आदि मूल्ये रुजवणे सोपे नसले तरी अशक्य नाही व त्याचे मुख्य कारण मुस्लीम लोक ही माणसेच आहेत हे स्पष्ट आहे.

अतिशय गंभीर चर्चेचा अनुवाद मराठी भाषेत करणे हे अवघड कार्य करुणा गोखले यांनी समर्थपणे पार पाडले आहे. व्यंगचित्र याला अर्कचित्र हा प्रतिशब्द योजून करुणाबाईंनी आपली विषयावरील तसेच भाषेवरील पकड सिद्ध केली आहे. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

(लेखक ज्येष्ठ समाजवादी नेते व कार्यकर्ते आहेत.)

■ ■

मंडळाचे कार्यक्रम

संकलन - **डॉ. बेनझीर तांबोळी**

२२ मार्च २०२० - मुस्लीम सत्यशोधक मंडळाचा सुवर्णजयंती वर्धापनदिन. कार्यक्रमातील पुरस्कार, परिसवांद, प्रकाशन कार्यक्रम जनता कर्फ्यूमुळे, कोरोना प्रादुर्भाव लॉकडाऊनमुळे रद्द करावा लागला. यानिमित्ताने मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचा सुवर्णमहोत्सव विशेषांक प्रकाशित करण्यात आला.

मंडळाचा कार्यक्रम होऊ शकला नाही म्हणून मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आपापल्या घरी-कुटुंबियांसमवेत मुस्लीम प्रश्नांवर आधारित तसेच हमीद दलवाई, पुरोगामी लेखकांचे, मंडळाच्या प्रकाशित साहित्याचे वाचन, अभिप्राय कार्यक्रम घेतला. कार्यकर्त्यांनी मंडळाचा लोगो डीपी म्हणून वॉटस्‌अप स्टेटस ठेवला. साधना साप्ताहिकात मा. संपादकांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची चोहोबाजूंनी होणाऱ्या कोंडीवर संपादकीय लिहिले. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी वर्तमानपत्रात लेख लिहिले.

२४ मार्च २०२० - देशभरात लॉकडाऊन जाहीर झाल्यानंतर धार्मिक स्थळांत एकत्रित प्रार्थना करू नये असे आवाहन करण्यात आले होते. महाराष्ट्रातील विविध शहरांत शुक्रवार -जुम्माहची नमाज- प्रार्थना चालू होत्या. मंडळाच्या वतीने पत्रके काढून मुस्लीम बांधवांनी मस्जिद, घराची गच्ची इ. ठिकाणे सामुदायिक नमाजासाठी वापरू नये. सामाजिक-शारीरिक अंतर बाळगण्याचे आवाहन केले. वर्तमानपत्रे, टीव्ही, समाज माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगण्याचे आवाहन केले. नंतरच्या काळात अनेक मशिदींच्या स्पीकरवरून कोरोनाबद्दल जनजागृतीचेही प्रयत्न मुस्लीम बांधवांनी केले.

शाहीनबाग आंदोलन रद्द करण्याची वेळ आली.

या काळात मंडळाने आणि मंडळाच्या काही कार्यकर्त्यांनी कोरोना काळातील गरीब-गरजू-अडचणीत सापडलेल्या सर्वधर्मीय बांधवांना-बहिणींना आर्थिक, अन्नधान्य, अत्यावश्यक वस्तू देण्यात पुढाकार घेतला.

१ एप्रिल २०२० - तबलीग जमातीच्या बेजबाबदार वर्तनामुळे कोरोना संसर्ग वाढण्यात हातभार लागतोय, असे माध्यमात याविषयी मोठ्या प्रमाणात प्रक्षेपण झाले. संपूर्ण मुस्लीम समाज लक्ष्य करण्यात येत असताना, तबलीग जमातने देशाची माफी मागावी असे ‘पत्रक’ मंडळाकडून काढण्यात आले. तसेच दैनिक लोकसत्तामध्ये मंडळाचे अध्यक्ष शमसुद्दीन तांबोळी यांनी लेख लिहून एकूण भूमिका मांडली.

२ एप्रिल २०२० - मंडळाचे मित्र, मार्गदर्शक आणि समाजवादी विचारवंत मा. भाई वैद्य यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त आदरांजली, स्मरण!

११ एप्रिल २०२० - महात्मा जोतीराव फुले जयंतीनिमित्त स्मरण.

२३ एप्रिल - २५ एप्रिल पासून रमजान हा पवित्र महिना सुरू झाला. या काळात सामूहिक नमाज पठणास महत्त्व असते. कोरोना काळाचा विचार करून समाजाने शासनाचा आदेश, सामाजिक भान, वैज्ञानिक दृष्टिकोनाचे, आचरणाचे आवाहन मंडळातर्फे पत्रक काढून केले.

२५ एप्रिल २०२० नंतर - समाज माध्यमावर प्रभावी कार्य करणारा 'कोरा' ही आंतरराष्ट्रीय मंच आहे. मंडळाचे अध्यक्ष प्रा. शमसुद्दीन तांबोळी यांना एका आठवड्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून नेमण्यात आले. मुस्लीम समाज, भारतीय संविधान, इस्लाम यांच्या संदर्भात आलेल्या अनेक प्रश्नांची प्रा. तांबोळी यांनी दीर्घ उत्तरे दिली. सामाजिक आंतरक्रिया - शंका निरसनासाठी, गैरसमज दूर करण्यासाठी हे उपयुक्त माध्यम ठरले.

२९ एप्रिल २०२० - पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केला गेलेला अनेक दर्जेदार चित्रपट देणारा, बकरी ईदला बकऱ्यांची कुर्बानी देण्यास स्पष्ट विरोध करणारी भूमिका घेणाऱ्या अभिनेता इरफान खान यांच्या निधनाची वार्ता एक आघात होता. मंडळाच्या वॉटसअॅप ग्रुपवर त्यांच्या स्मरणार्थ चर्चा करून आदरांजली अर्पण केली.

१ मे २०२० - महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिन हा कोरोनाच्या सावटात होता. मंडळाचे मार्गदर्शक ज्येष्ठ मित्र डॉ. बाबा आढाव यांनी कामगार दिनाच्या निमित्ताने कामगारांच्या हालअपेष्टांप्रती सहसंवेदना व्यक्त करण्यासाठी एक दिवस उपवास ठेवण्याचे आवाहन केले. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी त्यास प्रतिसाद देऊन उपवास केला. कामगार बांधवांच्याप्रती संवेदना व्यक्त केल्या.

३ मे २०२० - हमीद दलवाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त साहित्यिक, प्राचार्य डॉ. राजेखान शानेदिवाण यांचे 'साहित्यिक आणि सुधारक हमीद दलवाई' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. मंडळाच्या हमीद दलवाई स्टडी सर्कलच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात अनेकांनी सहभाग घेतला.

मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांचे दलवाई स्मृतिदिनानिमित्त 'हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ' या विषयावर 'महासंवाद' वाहिनीतर्फे फेसबुक लाईव्ह व्याख्यान झाले.

मंडळाचे युवा कार्यकर्ते जावेद शहा यांनी मंडळाच्या सुवर्णजयंती

वर्षानिमित्त समाजमाध्यमांवर फेसबुक, ट्वीटर, ऑनलाईन व्याख्याने या संदर्भात जबाबदारी घेतली. अनेक कार्यक्रमांच्या आयोजनात महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली आणि पाडत आहेत.

१० मे २०२० – ज्येष्ठ साहित्यिक, मंडळाचे मार्गदर्शक, साधनाचे माजी संपादक मा. यदुनाथ थत्ते यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने स्मरण.

१४ मे २०२० – मंडळाच्या पुढाकारातून 'कोरोना आणि मानवता' या विषयावर महाराष्ट्रातील विचारवंत, विविध राज्य आणि राष्ट्रांतील कार्यकर्ते एकत्र येऊन ऑनलाईन चर्चा केली. यात भिन्नधर्मीय, अधर्मीय कार्यकर्त्यांनी, साहित्यिक आणि विचारवंतांनी भाग घेतला. नंतर या मान्यवरांशी सतत चर्चा-संवाद करता यावा या दृष्टीने वॉटस्अ‍ॅप ग्रुप तयार केला. यास 'वैश्विक मानवता' असे नाव दिले आहे.

१५ मे २०२० नंतर – रमजान ईदच्या पार्श्वभूमीवर ईदचा खर्च टाळून तो पैसा सर्व समाजातील गरजूंना देण्याच्या शासनाने घालून दिलेल्या निर्देशाचे पालन करण्याचा निर्धार मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केला. त्यास माध्यमातून प्रसिद्धी देण्यात आली. मुस्लीम बांधवांनाही याच पद्धतीने ईदचा आनंद घेण्याचे आवाहन केले.

१६ मे २०२० – मंडळाच्या हमीद दलवाई स्टडी सर्कलच्या वतीने हृदयरोग तज्ज्ञ आणि समाजवादी नेते डॉ. अभिजित वैद्य यांचे 'कोव्हिड १९ आणि मानवतेसमोरील आव्हाने' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले.

मंडळाचे कऱ्हाड येथील कार्यकर्ते नौशाद शेख यांनी व्हॉटसअ‍ॅप ग्रुपवर ताबिश यांची 'इस्लाम का इतिहास' नावाची लेखमाला क्रमश: प्रसारित केली. इस्लामच्या उदय काळापासून विविध टप्प्यातील माहितीपूर्ण लेखमाला ताबिश सिद्दीकी यांच्या संशोधन कार्यावर आधारित होती.

१८ मे २०२० – दि. १७ मे रोजी 'खिलाफत चळवळी'च्या इतिहासाला १०० वर्षे झाल्याच्या निमित्ताने रामभाऊ प्रबोधिनीचे रवींद्र साठे यांचा 'खिलाफत चळवळीतील फसवे हिजरात' लेख प्रसिद्ध झाला. लेख चुकीचे संदर्भ आणि मुस्लीम समाजाबद्दलचा पूर्वग्रह दर्शवणारा होता. त्यास मंडळाच्या अध्यक्षांनी आक्षेप नोंदवणारे पत्र लोकमानसमध्ये प्रसिद्ध केले.

२० मे २०२० – हमीद दलवाई स्टडी सर्कलच्या वतीने आरंभिलेल्या वेबिनारमध्ये 'कोव्हीड १९ आणि मानवतेसमोरील आव्हाने' सदरात डॉ. गोपाल अय्यंगार, मा. मेहरू कोतवाल, डॉ. आशुतोष भूपटकर यांचा प्रमुख सहभाग

असणारे चर्चासत्र आयाजित केले.

२५ मे २०२० – मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांचे रमजान ईदनिमित्त ‘कोरोना काळातील रमजान ईद आणि मुस्लीम समाजाची सकारात्मकता’ या विषयावर महासंवादतर्फे फेसबुक लाईव्ह करण्यात आले. याच दिवशी मंडळाच्या कार्यकारिणी सदस्या तमन्ना इमानदार यांचे ‘कोरोनातील रमजान ईद आणि सध्याची परिस्थिती’ विषयावर महासंवाद मिडिया माध्यमातून फेसबुक लाईव्ह व्याख्यान झाले.

१ जून २०२० – मंडळाचे मार्गदर्शक मित्र डॉ. बाबा आढाव यांनी नव्वद वर्षे पूर्ण करून ९१ व्या वर्षांत पदार्पण केले. या दिवशी अनेकांचे वाढदिवस असतात. सर्वांना हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. मंडळाचे अध्यक्ष शमसुद्दीन तांबोळी उपप्राचार्य पदावरून सेवानिवृत्त झाले. त्याबद्दल शुभेच्छा देण्यात आल्या.

८ जून २०२० – मंडळाच्या माजी अध्यक्षा श्रीमती मेहरून्निसा दलवाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र स्मरण.

२२ जून २०२० – मंडळाचे मार्गदर्शक, हितचिंतक मा. भाई वैद्य यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त अभिवादन !

लातूर येथील मंडळाच्या आणि अंनिसच्या कार्यकर्त्या रुक्साना मुल्ला यांचे ‘महिला आरोग्य आणि अंधश्रद्धा’ विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले.

२५ जून २०२० – हमीद दलवाई स्टडी सर्कलच्या वेबिनारमध्ये आंतरराष्ट्रीय घडामोडीचे अभ्यासक प्रा. रोहन चौधरी यांचे ‘भारताचे परराष्ट्र धोरण आणि मानवी दृष्टिकोन’ या विषयावर व्याख्यान झाले.

२ जुलै २०२० – हमीद दलवाई स्टडी सर्कल मार्फत डॉ. हमीद दाभोळकर यांचे ‘लॉकडाऊन आणि कार्यकर्त्यांचे मानसिक आरोग्य’ विषयावर गूगल मिट व्याख्यान. या व्याख्यानास मंडळ, अंनिसच्या कार्यकर्त्यांबरोबरच महाराष्ट्राच्या विविध भागांतून सहभाग नोंदवला.

४ जुलै २०२० – पुण्यातील एम. ए., बी. एड. शिक्षिकेस इंजिनिअर असलेल्या पतीने तोंडी एकतर्फी तलाक दिला. गुन्हा नोंदवला जाण्याच्या भीतीने नवऱ्याने समझोता केला. त्या महिलेचा हलाला करून पुन्हा निकाह केला आणि एका महिन्यातच पुन्हा तलाकची पहिली नोटीस पाठवली. या महिलेशी कार्यकर्त्यांनी कार्यालयात बोलावून चर्चा केली. पतीशी फोनवरून संवाद केला. कार्यालयात बोलावण्यात आले. नातेवाईकांशी चर्चा केली. मंडळाने ही केस माध्यमांसमोर आणली. आता या महिलेचे समुपदेशन करून कायदेशीर सल्ला, सहकार्य देण्यात

येत आहे.

५ जुलै २०२० – मंडळाच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या, महाराष्ट्र राज्याच्या अल्पसंख्याक विभागाच्या माजी अप्पर सचिव मा. ऐनूल अत्तार यांच्या समवेत आणि मार्गदर्शनाखाली मुस्लीम समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, शिष्यवृत्तींची माहिती आणि प्रवेश मिळवून देण्यासाठी शैक्षणिक सहाय्य मंच समूह तयार केला आहे. या मार्फत समाजातील शिक्षण प्रसाराचे आणि विद्यार्थ्यांना मदत करण्याचे उपक्रम घेतले जाणार आहेत.

९ जुलै २०२० – मंडळाचे मार्गदर्शक मित्र मा. पन्नालालजी सुराणा यांच्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा. या वयातही भाऊ मराठवाड्यात राहून राष्ट्रीय पातळीवर कार्यरत आहेत. हार्दिक शुभेच्छा.

मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांचे 'नाशिक विकासमंच' न्यूजच्या वतीने 'हमीद दलवाई आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळ' या विषयावर फेसबुक लाईव्ह व्याख्यान झाले.

११ जुलै २०२० – हमीद दलवाई स्टडी सर्कलच्या वतीने मा. श्रीराम पवार, संपादक-संचालक सकाळ माध्यम समूह यांचे 'माध्यमांना आत्मचिंतनाची गरज आहे का ?' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान घेण्यात आले.

१६ जुलै २०२० – हमीद दलवाई स्टडी सर्कलच्या वतीने लेखक, संपादक आणि राजकीय विश्लेषक मा. श्री. सुधींद्र कुलकर्णी यांचे 'जागतिक शांतता आणि वैश्विक बंधुत्वाचा गांधीमार्ग' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. मा. श्रीराम पवार आणि सुधींद्र कुलकर्णी यांच्या व्याख्यानाचे आयोजन प्रा. रोहन चौधरी आणि जावेद शहा यांनी केले.

१८ जुलै २०२० – लोकसत्तेतील बुकमार्क सदरात 'इस्लाम अँड द फ्यूचर ऑफ टॉलरन्स' या पुस्तकावर आधारित डॉ. तांबोळी यांचा 'मुस्लीम उदारमतवाद्यांपुढचं आव्हान' लेख प्रसिद्ध.

मंडळाचा युवा कार्यकर्ता समीर दिलावर शेख यांनी झी २४ मराठी वाहिनीवरील सडेतोड चर्चेत 'मोहमंद द मेसेंजर ऑफ गॉड'वरील संभाव्य बंदी विरोधात आणि या संदर्भातील धर्मांध मुस्लीम भूमिकेवर परखड विचार मांडले.

१ ऑगस्ट २०२० – मंडळ गेल्या दहा वर्षांपासून बकरी ईद रक्तदान अभियान घेऊन साजरी करत असते. यावर्षी ही ईद १ ऑगस्ट रोजी आहे. मंडळाच्या वतीने १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट दरम्यान राज्यस्तरीय रक्तदान अभियान सप्ताह आयोजित करण्यात आले. जे रुग्ण कोरोनातून मुक्त झाले त्यांना प्लाझ्मा

दान करण्याचे आवाहन केले.

पुण्यातील कार्यक्रम १ ऑगस्ट रोजी साने गुरुजी स्मारक पर्वती पायथा, पुणे येथे आयोजित करण्यात आला.

मंडळाने ५१ व्या वर्षांत पदार्पण केले असल्याने मंडळाच्या कार्यकर्त्यांनी स्वत:च्या मिळकतीतून जमा कलेले ५१ हजार रुपये मुख्यमंत्री निधीसाठी देण्यात येणार आहे. सोबत मुस्लीम समाजाच्या विविध प्रश्नांविषयी एक निवेदन मुख्यमंत्र्यांकडे देण्यात येणार आहे.

सद्यपरिस्थितीत मंडळाचा इतिहास व कार्य याच्या प्रचारासाठी प्रा. अझरुद्दीन पटेल व जावेद शहा आधुनिक माध्यमाद्वारे प्रयत्न करीत आहेत.

■ ■

बकरों की कुर्बानी से नहीं मिलेगा पुण्य : इरफान खान

जेएनएन, जयपुर : जाने माने फिल्म कलाकार इरफान खान ने कहा है कि दो बकरे खरीद कर उनका वध कर देना कोई कुर्बानी नहीं है? इससे पुण्य नहीं मिलने वाला। कुर्बानी का अर्थ है कि हम कोई अपनी प्रिय वस्तु किसी को दें।



इरफान बुधवार को यहां अपनी फिल्म मदारी के प्रमोशन के लिए आए थे। कार्यक्रम से इतर पत्रकारों से बातचीत में उन्होंने प्रचलित परंपराओं पर कटाक्ष करते हुए कहा कि बाजार से दो बकरे खरीद कर उन्हें मार देने से किसी की कौन सी प्रार्थना पूरी होगी? किसी को मारना अच्छाई का काम कैसे हो सकता है? हमें अपने आप से सवाल पूछना चाहिए कि त्योहारों का वास्तविक मतलब क्या है? अभिनेता का कहना था कि इस्लाम की छवि खराब करने वालों और आतंकवादी गतिविधियों में शामिल लोगों के खिलाफ फतवा जारी होना चाहिए। उन्होंने कहा कि यह हमारा सौभाग्य है कि हम ऐसे देश में रह रहे हैं जहां सभी धर्मों को समान सम्मान हासिल है। रमजान के दौरान व्रत रखने से अधिक जरूरी है आत्मविश्लेषण। हमने मुहर्रम को मजाक बना कर रख दिया है। यह मातम मनाने का अवसर है लेकिन ताजिया के जुलूस निकाले जाते हैं। इरफान की टिप्पणियों पर मुस्लिम धार्मिक नेताओं ने तीखी प्रतिक्रिया व्यक्त की है।

जमायते उलेमा ए हिंद के राज्य सचिव मौलाना अब्दुल वाहिद ने कहा कि इरफान खान अपना ध्यान अभिनय पर ही केंद्रित रखें, धर्म के बारे में अनापशनाप बयान न दें। इरफान यह सब प्रचार पाने के लिए कर रहे हैं। जयपुर के प्रमुख मुस्लिम धार्मिक नेता खालिद उस्मानी ने कहा कि इरफान को अपना मुंह बंद रखना चाहिए क्योंकि उन्हें धर्म के बारे में कोई ज्ञान नहीं।

हार्दिक अभिनंदन !



शेख वसिमा मेहबूब - ही जि. प्र. शाळा, जोशी सांगवी, लोहा, जि. नांदेड येथील विद्यार्थिनी. नुकत्याच जाहीर झालेल्या एमपीएस-सीच्या निकालात वसिमाने मुलींमधून महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकाचे यश मिळवून उपजिल्हाधिकारी पदावर मोहर लावली. वडील आजारी असतात. आई घरोघरी जाऊन बांगड्या विकते आणि भाऊ रीक्षा चालवतो. वसिमाने अशा प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करीत जे यश संपादन केले ते अनेकांना प्रेरणा देणारे आहे.



डॉ. समीना बागवान - समीना या भांडार कवठे, जिल्हा सोलापूर येथील आहेत. त्यांचे वडील शालेय शिक्षक आहेत. समीना सांगली येथून बीएएमएस झाल्या. एमपीएससी परीक्षा तयारी करून प्रशासकीय सेवेत येण्याची इच्छा बाळगून परिश्रम घेतले. नुकतेच त्यांनी परीक्षेत यश मिळविले. एक्साईज डिपार्टमेंटच्या डेप्युटी सुपरिंडेंट पदी त्यांची निवड झाली.

वसिमा आणि समीना या दोघींनी मराठी माध्यमातून शिक्षण घेतले आहे. मुस्लीम तरुणी मराठी माध्यमातून शिक्षण घेत, प्रशासकीय सेवेत येत आहेत, ही समाजबदलाच्या पटलावरील आनंदाची आणि आश्वासक बाब आहे.

वसीमा आणि समीना यांच्यासारखेच यश संपादन करणाऱ्या सर्वधर्मीय तरुण-तरुणींचे अभिनंदन आणि पुढील कार्यकाळातील यशस्वी कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा !

Registered with Registrar of News Papers of India, New Delhi
Book-Post containing Printed Periodical **Regd. No. 24247 / 73**

मु. स. मंडळाच्या ५० व्या वर्धापनदिनानिमित्त घोषित पुरस्कार



सुवर्णजयंती विशेष पुरस्कार

मा. डॉ. पी. ए. इनामदार

(अध्यक्ष, महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटिन एज्युकेशन सोसायटी)

मुस्लीम समाजात आधुनिक शिक्षणाचा प्रसार करून या समाजाची उन्नती केली. त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल.

समाजप्रबोधन पुरस्कार



पद्मश्री मा. डॉ. तीस्ता सेटलवाड

(सचिव, सिटिझन्स फॉर जस्टीस अ‍ॅन्ड पीस)

पत्रकारिता, न्यायालयीन संघर्ष आणि जनआंदोलनातील कार्यकर्त्या. मानवी हक्क चळवळीतील विशेष योगदानाबद्दल.



समाजप्रबोधन पुरस्कार

मा. प्रा. जहीर अली

(अध्यक्ष, सेंटर फॉर प्रमोशन ऑफ डेमॉक्रसी अँड सेक्युलॅरिझम)

धर्मनिरपेक्षता आणि लोकाही मूल्यांच्या प्रचारार्थ केलेल्या विशेष योगदानाबद्दल.

विशेष सत्कार



मा. डॉ. दिलीप भुजबळ-पाटील

(आयपीएस, पोलीस अधिक्षक, बुलढाणा)

सामाजिक स्वास्थ्य, धार्मिक सलोखा व महिला सबलीकरण प्रस्थापित करण्यासाठी केलेल्या विशेष योगदानाबद्दल.

'मुस्लीम सत्यशोधक पत्रिका' हे त्रैमासिक मुद्रक व प्रकाशक श्री. शमसुद्दीन तांबोळी यांनी मुस्लीम सत्यशोधक मंडळासाठी साई समर्थ प्रिंटर्स, दुकान क्र. ४,विठ्ठल हाईटस्, हिंगणे खुर्द, पुणे ५१ येथे छापून सी ८/२३, स्टेट बँक नगर, पंचवटी, पाषाण, पुणे ८ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.